# १

# उदारमतवाद

**घटक रचना**

1.1 उद्दिष्टे

1.2 भांडवलवाद संकल्पना

1.3 उदारमतवाद संकल्पना

1.4 नवउदारमतवाद

1.5 सारांश

1.7 आपण काय शिकलो?

1.8 संदर्भ सूची

## 1.1 उद्दिष्टे

समाज जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आणि आणि त्यांना एकत्र गुंफणारी तत्त्वप्रणाली समाजाचे संघटन, समाज जीवनाचा अर्थ, हेतू, समाजाच्या विविध घटकांची अंतर्गत संस्था बांधणी व त्यांचे परस्पर संबंध निश्चित करून व्यक्ती व समाज जीवन यांना आशय देते व त्यांच्या विकासाची दिशा हि स्पष्ट करते. त्यामुळेच समाज बांधणी मध्ये विचार प्रणालीस समन्वयक व सार्थकत्व या दोन्ही अर्थाने महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. मानवी समाजाच्या विकासात उदारमतवाद, समाजवाद, राष्ट्रवाद, समूहवाद यासारख्या तत्त्वप्रणाली चे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. या घटकांमध्ये उदारमतवाद या तत्वप्रणाली ची संकल्पना, विकास, प्रकार व नवउदारमतवादाची प्रमुख तत्वे यांची मांडणी करण्यात आली आहे. ज्या माध्यमातून उदारमतवाद व भांडवलवाद यांचा विकास, नवउदारमतवादाची प्रमुख तत्वे यांचे आपले आकलन अधिक समृद्ध होऊ होऊन उदारमतवाद व भांडवलवाद यांची मानवी विकासातील भूमिका व स्थान यांची ही मांडणी करता येईल.

## 1.2 भांडवलवाद संकल्पनात्मक अर्थ:-

भांडवल वाद ही एक अशी विचारधारा आहे जी अशी आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी आग्रही असते ज्यामध्ये उत्पादन साधनांची खाजगी मालकी व नफ्याच्या तत्त्वास प्राधान्य देते.भांडवल वादाच्या मध्यवर्ती तत्त्वांमध्ये भांडवल संचय, स्पर्धात्मक बाजार, किंमत व्यवस्था, खाजगी मालमत्ता या तत्वांचा प्रामुख्याने समावेश होतो.

इंग्रजी भाषेतील कॅपिटॅलिझम (Capitalism) या शब्दा करिता मराठी भाषेत भांडवलवाद हा शब्द योजला जातो. कॅपिटॅलिझम हा शब्द लॅटिन भाषेतील 'कॅपूट' व 'चॅटेल' या शब्दापासून सून तयार झाला आहे. आहे ज्याचा मूळ अर्थ ' डोके' व ' गुरे' असा होतो. त्याकाळी पशुधन या संपत्तीचा एक मोठा मान्यताप्राप्त प्रकार होता. यावरून त्याचा आशय आपण भांडवलाशी जोडू शकतो. पुढच्या काळात भांडवलाच्या संकल्पना व साधनांमध्ये जसा बदल घडत गेला

munotes.in

तसा भांडवल वादाचा अर्थही बदललेला दिसतो. भांडवलवाद हा शब्द पारिभाषिक दृष्ट्या 17 व्या शतकाच्या मध्यापासून वापरला जात असला तरी आधुनिक अर्थाने भांडवलवाद या शब्दांची मांडणी सर्वप्रथम 1850 साली लुई ब्लॅंक यांनी केली. ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशात या शब्दाचा अंतर्भाव 1854 साली झाला. भांडवल वादाची मूळ प्राचीन ग्रीक नगर राज्यांमध्ये व कृषी आर्थिक जीवनामध्ये आढळत असली तरी भांडवल वादाचा विस्तार व विकास खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांतीनंतर घडून आला. त्यानंतरच्या काळात वसाहतवाद काळात त्यास एक प्रकारे मान्यताप्राप्त झाली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भांडवल वादाने निर्माण केलेल्या प्रश्नांना उत्तर म्हणून लोकशाही शासन व्यवस्थेचा व विचारधारेच्या पातळीवर उदारमतवादाचा पर्याय प्रस्तुत केला गेला. उदारमतवादी विचारांचा उगम व विकास हा भांडवलशाही नाही व भांडवलवाद यांच्या साथीने व प्रभावाखाली घडून आलेला दिसतो. यादृष्टीने उदारमतवादी संकल्पनेचा विकास, तत्वे व प्रकार ही भांडवल वादाचे आकलन करून घेण्यासाठी ही अधिक उपयुक्त ठरू शकते.

## 1.3 उदारमतवाद अर्थ व संकल्पना:-

उदारमतवाद ही संकल्पना स्पष्ट करताना मॅक्गबर्न यांनी म्हटले होते, " एका राजकीय सिद्धांताच्या रूपात उदारमतवाद दोन पृथक तत्त्वांचे मिश्रण आहे. यापैकी एक लोकशाही ही तर दुसरा व्यक्ती वाद आहे." उदारमतवादाचा इतिहास हा एक प्रकारे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास मानला जातो. उदारमतवाद ही आजपर्यंतची ची सर्वाधिक प्रभावशाली विचारधारा मानली जाते. या विचारधारेने एका बाजूने अनेक सामाजिक व राजकीय या आंदोलनांना प्रेरणा दिलेली आहे आहे तर दुसऱ्या बाजूने अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक आंदोलनांना विरोधही केलेला आहे. हे उदारमतवाद या संकल्पनेच्या आशय समजून घेताना एक बाब स्पष्ट होते की, उदारमत ही अन्य राजकीय तत्व प्रणाली प्रमाणे निश्चित व क्रमबद्ध अशी विचारधारा नाही. उदारमतवाद एका व्यक्तीच्या विचारांचा परिणाम नाही वा एका विशिष्ट काळाशी ही संकल्पना निगडित नाही. तर या विचारधारेत अनेक विचारांचे मिश्रण आहे. आहे ही एक जीवनदृष्टी, जीवन क्रम व मानवी विचारांची प्रवृत्ती आहे.

**उदारमतवादाचा अर्थ :**

इंग्रजी भाषेतील Liberalism या शब्दाचे उदारमतवाद हे मराठी रूपांतर होय. Liberalism हा शब्द मूळ लॅटिन Liber शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ स्वतंत्र - free असा होतो.

**उदारमतवादाची व्याख्या :-**

उदारमतवाद ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

1) सार्टोरी :-

उदारमतवाद हा व्यक्तिगत स्वातंत्र्य, न्यायिक सुरक्षा व संविधानिक राज्याचा सिद्धांत व व्यवहार आहे.

2) हेलीवेला :-

उदारमतवाद जीवनाच्या मानसिक, सामाजिक, धार्मिक राजकीय व आर्थिक या सर्व क्षेत्रात स्वातंत्र्याच्या मागणीचे सूचक आहे.

3) हाबहाउस :-

उदारमतवादाचा संबंध या संकल्पनेशी आहे की समाजाची रचना व्यक्तीच्या स्वयंनिर्देशित शक्तीवर आधारित कुशलतापूर्वक केली जाऊ शकते तसेच स्वतंत्रता फक्त व्यक्तिचाच अधिकार नाही तर समाजाची ती गरजही आहे.

4) सेबाइन :-

उदारमतवाद हा संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी निषेधात्मक स्वातंत्र्याऐवजी सकारात्मक स्वातंत्र्याची व्यवस्था करण्याचे समर्थन करतो.

**उदारमतवादाची वैशिष्ट्ये :**

उदारमतवादी तत्वप्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

1) मानवी विवेकास प्राधान्य :

मानवी सदसद्विवेक बुद्धीवरील अढळ विश्वास हा उदारमतवादाचा आधार मानला जातो. यूरोपमध्ये मध्ययुगात चर्च व पोप यांनी मानवी विवेकास एक प्रकारे बंदिस्त केले होते. प्रबोधनाच्या चळवळीने विचारबंदी विरोधात बंड करून मानवी विवेकास चर्चच्या तावडीतून मुक्त केले. थॉमस पेन या विवेकी चळवळीचा प्रमुख प्रवर्तक मानला जातो. “ माझे स्वतःचे मनच माझे चर्चा आहे.” ही घोषणाच त्यांने दिली. अशा पद्धतीने मानवी विवेका वरील विश्वास हे तत्व उदारमतवादाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

2) इतिहास व परंपराना नकार:-

उदारमतवादाचा आधार विवेक असल्यामुळे इतिहास व परंपरा जर विवेकाच्या कसोटीवर उतरत नसतील तर उदारमतवाद त्यास स्पष्ट नकार देतो. मानवी विकास व प्रगतीमध्ये इतिहास, पर या अडथळा वा अडगळ ठरत असतील तर त्यास त्याज्य मानावे हे उदारमतवादाचे मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वाच्या आधारेच इंग्लंडमध्ये उपयोगितावादाच्या नावाखाली कार्यरत असणाऱ्या परंपरांनाही विरोध केला व बौद्धिक परिवर्तनास प्राधान्य दिले. त्यामुळेच इंग्लंडचा त्याकाळी सर्व क्षेत्रात विकास घडून आला.

3) मानवी स्वातंत्र्याचा स्वीकार:-

मानवी स्वातंत्र्याचे निर्विवाद अस्तित्व हा उदारमतवादाचे महत्त्वाचे सूत्र होय. उदारमतवाद व्यक्तीस स्वतंत्र व स्वयंपूर्ण असे स्थान देतो. उदारमतवादी

तत्वप्रणाली ची अशी श्रद्धा आहे की, ' मनुष्य निसर्गतःच स्वतंत्रपणे जन्माला आलेला आहे व त्यास काही नैसर्गिक व अहम स्वरूपाचे हक्क प्राप्त आहेत. त्यामुळे व्यक्तीस त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास करण्याचे स्वातंत्र्य कोणत्याही अटी व बंधनाशिवाय प्राप्त व्हावयास हवे. त्यामुळेच उदारमतवाद असा आग्रह धरते की, ' राज्याने व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासाच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना दूर करून व्यक्ती विकासासाठी आवश्यक पूरक परिस्थिती वा परिस्थितीचे घटक निर्माण करावेत. त्यासाठीच उदारमतवाद सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, बौद्धिक, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात मानवी स्वातंत्र्याचे निर्विवाद समर्थन करते.

4) व्यक्ती साध्य राज्य साधन:-

उदारमतवाद व्यक्तीस केंद्रीय स्थान देतो. व्यक्तीने स्व कल्याणासाठी राज्य, समाज व तत्सम संस्था, व्यवस्था निर्माण केल्या आहेत. त्यामुळे व्यक्तीसाठी या सर्व संस्था व्यवस्था आहेत, व्यक्ती त्यांच्यासाठी नाही. त्यामुळे राज्य व समाज यांनी व्यक्तीस केंद्र म्हणून कार्य करावे. जॉन लॉक या संदर्भात म्हणतात, " राज्य जनतेच्या सहमती तून निर्माण झालेले आहे. जोपर्यंत सहमती आहे तोपर्यंत राज्य टिकून राहते. राज्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नसेल तर अशा राज्यांतर्गत शासनाला बदलण्याचा अधिकार लोकांचा आहे."

5) समाज, राज्य या कृत्रिम संस्था:-

उदारमतवादी तत्व प्रणाली अस्तित्वात येण्यापूर्वी राज्यास दैवी व ईश्वरीय स्थान प्राप्त झालेले होते वा त्यास नैसर्गिक दर्जा प्राप्त होता. उदारमतवादी विचार प्रणाली मात्र समाज व राज्य संस्थेस नैसर्गिक न मानता कृत्रिम वा मानव निर्मित संस्था मानतात. उदारमतवादी तत्वप्रणाली च्या मते, " व्यक्तीने राज्यसंस्थेची निर्मिती आपल्या काही मर्यादित गरजा पूर्ण करण्यासाठी केली आहे. व्यक्ती स्वतः पूर्ण आहे. समाज आणि राज्य संस्था व्यक्तींनी निश्चित योजना नुसार निर्माण केले आहेत. त्यामुळे या व्यवस्थांमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार वा त्यात संशोधन करण्याचे अधिकार नागरिकांना प्राप्त असावयास हवे."

6) नैसर्गिक अधिकारांचा पुरस्कार:-

उदारमतवाद समाज, राज्य, धर्म या सारख्या संस्थांचे नैसर्गिक स्थान नाकारून व्यक्तीच्या हक्क व अधिकारांना नैसर्गिक दर्जा बहाल करतो. उदारमतवादी तत्त्वप्रणाली च्या मते, " व्यक्तीस जन्मताच काही नैसर्गिक व अदेय स्वरूपाचे हक्क प्राप्त होतात. ते कोणीही, कोणत्याही परिस्थितीत त्यापासून हिरावून घेऊ शकत नाही." जॉन लॉक यांनी जीवीतिचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार व मालमत्तेचा अधिकार या व्यक्तीच्या तीन नैसर्गिक हक्कांची संकल्पना मांडून हे स्पष्ट केले होते की, व्यक्तीचे हे अधिकार कोणासही काढून घेता येणार नाहीत वा त्यावर आक्रमण ही करता येणार नाही. हा अधिकार राज्यसंस्थेसही नाही. लॉकच्या मते, राज्यसंस्थेची निर्मिती या हक्कांच्या रक्षणाकरिता व संवर्धनाकरिताच झालेली आहे.

7) धर्मनिरपेक्षता तत्त्वाचा स्वीकार:-

उदारमतवाद राज्याचे धर्मनिरपेक्ष स्वरूप व प्रतिमान स्वीकारते. राज्य व चर्च या संघर्षात उदारमतवाद राज्याच्या बाजूने उभे असलेले दिसते. उदारमतवाद राज्यात कोणताही अधिकृत धर्म असता कामा नये या तत्त्वाचा पुरस्कार करते. अर्थात उदारमतवाद धर्मविहीन राज्याची कल्पना मांडत नाही. उदारमतवादी तत्त्वप्रणाली च्या मते ‘ धर्माच्या आधारावर आपल्या नागरिकात कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यात येऊ नये. व्यक्तीस धार्मिक बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य असावे. शिवाय धर्माच्या नावाखाली व्यक्तीचे शोषण होणार नाही याची काळजी राज्याने घ्यावी.’

8) कायद्याच्या राज्यास प्राधान्य:-

उदारमतवाद कायद्याचे राज्य ही संकल्पना निरंकुश शासनास विरोध व कायद्यासमोर व्यक्ती श्रेष्ठ ते ऐवजी कायद्याच्या श्रेष्ठत्वास मान्यता देते. शासनाने निरंकुश स्वरूप धारण केले तर व्यक्तींनी अशा शासनाविरोधात बंड करावे व परिवर्तन घडवून आणावे असे उदारमतवाद मान्य करत असला तरी हे परिवर्तन शांततामय मार्गाने व अराजकता व्यवस्था परिवर्तीत करणारे नसावे यासाठी आग्रही राहते. उदारमतवादी क्रांती म्हणून इंग्लंडमधील 1688 साली घडून आलेल्या वैभवशाली राज्यक्रांतीचे आदर्श उदाहरण दिले जाते.

9) लोकशाही शासन व्यवस्थेचा पुरस्कार:-

लोकशाही शासन व्यवस्था व उदारमतवाद यांचा सहसंबंध अभिन्न स्वरूपाचा मानला जातो. उदारमतवादी व्यवस्था ही लोकशाही व्यवस्थेतच विकसित होऊ शकते असे मानले जाते. जन प्रभुत्व हे उदारमतवादाचे आधारभूत तत्त्व लोकशाही शासन व्यवस्थेतच कार्यान्वित होऊ शकते. लोकशाही शासन व्यवस्था जनतेचे सार्वभौमत्व हे तत्व अंगीकारून उदारमतवादाच्या मूल्य तत्त्वांना मूर्त स्वरूप देण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

10) जागतीक शांततेचा स्वीकार :-

उदारमतवाद आंतरराष्ट्रीय राजकारणात सहकार्य व संवाद या माध्यमातून सर्व क्षेत्रात सहभागी सहजीवनाच्या विश्व रचनेचा स्वीकार करतो. याकरिता उदारमतवाद संघर्ष व युद्धाचे मार्ग न वापरता जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्यास प्राधान्य देतो. उदारमतवादी तत्त्वाप्रमाणे आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता असेल तरच प्रत्येक राष्ट्रास आपला विकास साध्य करता येऊ शकतो व राष्ट्रा राष्ट्रांमध्ये समन्वय प्रस्थापित होऊ शकतो.

11) व्यक्तीहीतास आत्यंतिक महत्व:-

उदारमतवादी विचारधारेचा केंद्रबिंदू व्यक्तिहित आहे हे पदोपदी जाणवते. कारण एकूणच उदारमतवादात व्यक्ती, तिचे व्यक्तिमत्व, तिचे स्वातंत्र्य, व्यक्तिविकास यास महत्त्वाचे स्थान आहे. उदारमतवाद व्यक्तीच्या सृजनशीलतेवर दृढ विश्वास व्यक्त

करतो. उदारमतवादी तत्वप्रणाली चे महत्त्वाचे गृहीतक म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी सृजनशीलता असते व प्रत्येक व्यक्तीस स्वहित कळते. व्यक्ती आपल्या विवेकाच्या आधाराने व्यक्ती या क्षमतांचा वापर करून स्वतःच्या हिताची पूर्तता करते. एकंदरीत चांगुलपणा व नैतिकतेच्या दृष्टीने माणसांचा विचार झाला पाहिजे यावर उदारमतवाद भर देतो. व्यक्ती जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अंगाचा उदारमतवादातून परिपोष होईल यावर उदारमतवाद विश्वास व्यक्त करतो.

**उदारमतवादाचा विकास:-**

उदारमतवाद ही संकल्पना स्पष्ट करताना उदारमतवादाच्या विकासाचा आढावा घेणे ही क्रमप्राप्त ठरते. उदारमतवादाचा विकास घडून येण्यास कारणीभूत घटकांच्या आधारे उदारमतवादाचा विकास पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

1) ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

साधारणतः 17 व्या शतकापासून 20 व्या शतकापर्यंत उदारमतवादाचा विकासाचा प्रवास मानला जातो. युरोप खंडात प्रामुख्याने राष्ट्र राज्य व्यवस्था स्थिरस्थावर होत असतानाच ज्या अनेक घडामोडी व उलथापालथी घडवून आणणाऱ्या चळवळी, आंदोलने झाली, तत्व वैचारिक मंथन झाले त्यातूनच उदारमतवादाची तत्वे व विचारसरणी ही मांडली गेली. सनातन राजकीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ही उदारमतवादाची मुळे शोधली जातात. प्राचीन ग्रीक गणराज्य, रोमन साम्राज्य यातही उदारमतवादी तत्वांची भलावण होती हे दाखवून दिले जाते. आधुनिक काळात इंग्लंडमधील घटनात्मक विकासाचा इतिहास मॅग्नाचार्ट ॲक्ट , बिल ऑफ राइट्स, वैभव शाली राज्यक्रांती यासारख्या घटना व घटकांमधून उदारमतवादाचा विकास घडून आल्याचे दिसते. तत्वप्रणाली या अर्थाने 17 व्या शतकात उदारमतवाद अविष्कृत झाला. त्याचे प्रवर्तक करण्याचे श्रेय निश्चितच जॉन लॉक यांना जाते. अनियंत्रित सत्ताधीशांच्या दाहक अनुभवातून उदारमतवादा कडे जग अधिकाधिक आकर्षित होत गेले व आज सबंध जगभर उदारमतवादी तत्त्वांचा विस्तार घडून येत असल्याचे दिसते.

2) औद्योगिक क्रांती व भांडवलदार वर्ग:-

मध्ययुगीन काळ हा सरंजामदारी व्यवस्था व चर्चच्या प्रभावाचा कालखंड होय. आर्थिक जीवनाच्या बाबतीत अनेक धार्मिक व नैतिक नियम होते ज्यामुळे व्यक्ती स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नव्हती. 18 व्या शतकात औद्योगिक क्रांतीने उत्पादन क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणले. पारंपरिक उत्पादन साधनांची जागा आधुनिक तंत्रज्ञानाने घेतली. उत्पादन क्षमता व वेग प्रचंड प्रमाणात वाढला. उत्पादनाच्या या वेग व विस्ताराने आर्थिक बंधने गळून पडली व नवीन भांडवलदार वर्ग उदयास आला. भांडवलदार वर्गाने आर्थिक क्षेत्रावरील हस्तक्षेपास प्रखर विरोध केला. भांडवलदार हा वर्ग समाजातील प्रस्थापित वर्ग म्हणून लवकरच स्थिरस्थावर झाला व या वर्गाने राज्यसंस्थेला व्यक्तीच्या आर्थिक,राजकीय,

सामाजिक व नैतिक क्षेत्रात हस्तक्षेप करण्यास प्रखर विरोध केला. अशा पद्धतीने आर्थिक स्वातंत्र्याची भावना उदारमतवादाचा प्रमुख स्त्रोत बनली.

3) पुनर्जागरण चळवळ:-

प्राचीन काळात ज्या वैभवशाली संस्कृती मानवी जीवनाने अनुभवल्या त्यात ग्रीक नगर राज्य संस्कृतीचा आवर्जून उल्लेख केला जातो. परंतु भारतात जसे बौद्ध गणराज्य नंतर एक दीर्घ अंधार युग आले तसेच ग्रीक नगर राज्यांच्या संस्कृती नंतर युरोपाने ही अंधारयुग अनुभवले. मध्ययुगीन काळात पारलौकिक दृष्टिकोनाचा अति स्वीकार हा एकूण समाजाच्या प्रगती व विकासातील महत्त्वाचा अडथळा होता. कॉन्स्टँटिनोपल च्या पाडावानंतर मात्र जगास आधुनिक युगाची चाहूल मिळाली. आधुनिक युगाच्या प्रारंभी लोकांची दृष्टी परत ग्रीक चिंतनाकडे आकृष्ट झाली. यातूनच युरोप मध्ये पुनरुज्जीवन वादाचे आंदोलन सुरू झाले. ज्यास पुनर्जागरणाची चळवळ असेही संबोधले जाते. या चळवळीने बुद्धिप्रामाण्य वाद, अनुभव वाद व वैज्ञानिक दृष्टिकोन यास प्राधान्य दिले व त्यामुळे समाजात सर्व क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडून आले. हे सर्व बदल उदारमतवादाच्या विकासाच्या दृष्टीने पोषक ठरले. कारण पुनर्जागरणाच्या चळवळीने व्यक्तीच्या दृष्टिकोनाला लौकिक बनवले. व्यक्ती आणि त्याचे व्यक्तित्व यास सर्वोच्च महत्त्व प्राप्त झाले. सारांश, पुनर्जागरण चळवळीने व्यक्ती स्वातंत्र्यास प्रतिष्ठा व प्राधान्य प्राप्त करून दिल्यामुळे उदारमतवादाच्या विकासाचा मार्ग सुकर झाला.

4) धर्मसुधारणा चळवळ:-

मध्ययुगीन काळात व्यक्ती जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पोप व चर्च चे नियंत्रण प्रस्थापित झालेले होते. राजा व चर्च या संघर्षात ही चर्च चे पारडे जड राहत आले होते. धर्म या संस्थेवर तर पोपचे अनिर्बंध स्वरूपाचे नियंत्रण प्रस्थापित झालेले होते. पोप सांगतील तोच आणि तेवढाच धर्माचा अर्थ या तत्त्वास अतिरेकी स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले होते. या विरोधातील बंड धर्मसुधारणा चळवळीच्या या माध्यमातून घडून आले. 16 व्या शतकात धर्मसुधारणा चळवळ पुढे आली. या चळवळीचे नेतृत्व मार्टिन ल्युथर किंग, ज्विगली यासारख्या धर्म सुधारकांनी केले. या धर्म सुधारकांनी अनिष्ठ परंपरा, प्रथा, अंधश्रद्धा नाकारून अध्यात्मिक स्वातंत्र्याचा मार्ग सुकर केला. मार्टिन ल्युथर किंग यांनी स्पष्ट शब्दात जाहीर केले की, " व्यक्ती व ईश्वरा मध्ये संबंध प्रस्थापित करण्याकरिता मध्यस्थांची आवश्यकता नाही. व्यक्ती स्वतः स्वप्रयत्नाने ईश्वर कृपा प्राप्त करू शकतो." धर्म सुधारकांनी अशा पद्धतीने धर्म सुधारणा घडवून आणून व्यक्तीस धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. जे पुढे उदारमतवादाच्या विकासाच्या दृष्टीने सर्वाधिक फलदायी ठरले.

5) निरंकुश शासन व्यवस्थेविरोधातील बंड:-

निरंकुश शासन व्यवस्थेच्या विरोधातील प्रतिक्रिया म्हणूनच उदारमतवादाचा आविष्कार झाला असे मानले जाते. 16 व 17 व्या शतकानंतर युरोप खंडामध्ये निरंकुश शासन व्यवस्थेने कळस गाठला होता असे म्हणावे लागेल. अनेक राजांनी

स्वतः ईश्वरी अवतार जाहीर करून निरंकुश शासनास एकप्रकारे दैवी स्वरूप बहाल केले होते. या निरंकुश शासन व्यवस्थेच्या जाचास कंटाळून अनेक देशांमध्ये बंड, क्रांत्या झाल्या. इंग्लंड, फ्रान्स याचे पडसाद प्रामुख्याने उमटले. या राजकीय क्रांत्याना तत्त्वज्ञानात्मक आधार देण्याचे कार्य जॉन लॉक, रुसो, मिल, स्पेन्सर, ग्रीन यांनी केले व त्यातूनच उदारमतवादाची तत्त्व वैचारिक पायाभरणी झाली.

## 1.4 उदारमतवादाचे प्रकार

उदारमतवाद ही संकल्पना काळाच्या ओघात बदलत व विकसित होत आली आहे. उदारमतवादाचे प्रमुख प्रकार पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येतील.

### 1) अभिजात उदारमतवाद:-

बेथॉब, ॲडम स्मिथ, रिकार्डो व जेम्स मिल हे अभिजात उदारमतवादाचे प्रमुख प्रवर्तक मानले जातात. तर अभिजात उदारमतवादाच्या दृष्टीने जे. एस. मिल यांचे स्थान हे संक्रमण कालीन विचारक असे मानले जाते. 'हस्तक्षेपविरहिततेचे तत्व' (Laisses fair) हा अभिजात उदारमतवादाचा प्रमुख आधार मानला जातो. ॲडम स्मिथ या तत्त्वाचा प्रमुख पुरस्कर्ता होय. रिकार्डो हा या तत्त्वाचा दुसरा प्रवर्तक ज्याने शासन व अर्थ रचना या भिन्न बाबी असून त्या आपापल्या क्षेत्रात असाव्यात असे प्रतिपादन केले. रिकार्डोचे असे प्रतिपादन होते की, ' शासन व अर्थ रचना या एकमेकांपासून भिन्न असतात व त्यांचे संबंध असलेच तर अप्रत्यक्ष असतात. कारण त्यांच्यात मानसिक जवळीकता नाही. माणसाच्या प्रेरणा महत्त्वपूर्ण असतात व त्यांचा फायदा समाजात होतो, असे अभिजात उदारमतवादाचे प्रतिपादन आहे.

औद्योगिक क्रांती व भांडवलदार वर्गाचा झालेला उदय यातून नवीन समाजव्यवस्थेचा प्रारंभ झाला. ही नवीन समाजव्यवस्था उदारमतवादाचा आग्रह धरत होती. त्यास ॲडम स्मिथ, रिकार्डो, बेथॉम, जेम्स मिल यासारख्या तत्त्ववेत्त्यांनी तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. या कालखंडात ' स्वातंत्र्य' हा उदारमतवादाचा मुख्य आधार होता.

अभिजात उदारमतवादाची राजकीय सिद्धांताच्या स्वरूपात उभारणी करण्यात इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या देशातील परिस्थिती व तत्त्ववेत्यांचे चिंतन यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. राजकीय सिद्धांताच्या दृष्टीने उदारमतवादाचा आरंभ थॉमस हॉब्ज या सामाजिक करार वादी विचारवंता पासून मानला जातो. हॉब्ज यांनी असे प्रतिपादन केले की, ' राज्य एक उपयोगिता वादी संस्था आहे. राज्याच्या स्थापनेची मुख्य कारण व्यक्तीची सुरक्षा आहे. आहे मनुष्य स्वभावत:च स्वहिताने प्रेरित असतो. समाज व्यक्तीने निर्माण केलेला समूह आहे. हे राज्याचा आधार ईश्वराची इच्छा नसून मनुष्याची सहमती आहे.' अभिजात उदारमतवादास स्पष्टता देण्याचे महान कार्य जॉन लॉक यांनी केले असे मानले जाते. जॉन लॉक यांनी उदारमतवादाची व्यापक मांडणी केल्यामुळेच उदारमतवादी विचारांची पितामह किंवा आद्यप्रवर्तक म्हणून जॉन लॉक यांना गौरविले जाते. जॉन लॉक यांनी मर्यादित संवैधानिक शासनाचे जोरदार समर्थन केले व राज्याच्या सार्वभौमत्वाला व्यक्तीच्या अधिकारा द्वारे मर्यादित केले. शिवाय लॉक शासनाचा आधार सहमती, बहुमत शासन पद्धती, सत्ता विभाजन, कायद्याचे शासन, धार्मिक सहिष्णुता व

धर्मनिरपेक्षता या तत्त्वांचा ही स्वीकार करतो. उदारमतवादाची संपूर्ण तत्वे जॉन लॉक यांच्या मांडणीत आल्याकारणाने त्यांना उदारमतवादी विचारांचा जनक असे संबोधले जाते.

18 व्या शतकात उदारमतवादास विकसित करण्यात वॉल्टेअर व मॉटेस्क्यू या दोन विचारवंतांचे ही योगदान महत्त्वाचे आहे. मॉटेस्क्यूने आहे सत्ता विभाजनाच्या या सिद्धांताची मांडणी करून नियंत्रित शासन व्यवस्थेचा स्वीकार केला तर वॉल्टेअर यांनी नागरी स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. 18 व्या शतकाचा शेवट व 19 व्या शतकाचा प्रारंभ या काळात इंग्लंड मध्ये उपयोगिता वादी विचारवंतांनी अभिजात उदारमतवादाच्या विस्तारात महत्त्वाचे योगदान दिले. त्यामध्ये जॉन बॅथॉम, जेम्स मिल व जे. एस. मिल यांचे कार्य महत्वाचे आहे आह. या सर्व विचारवंतांच्या विचार व कार्यातूनच व्यापार, औद्योगिक क्षेत्र, राजकीय व आर्थिक रचना, ना सामाजिक जीवन यात अभिजात उदारमतवादाची तत्वे जगातील विकसित राष्ट्रांनी अंगीकृत केल्याचे दिसते.

**अभिजात उदारमतवादाची प्रमुख तत्वे:-**

प्रा. हॉब हाऊस यांनी उदारमतवाद (Liberalism) या ग्रंथात अभिजात उदारमतवादाची प्रमुख नऊ तत्वे प्रतिपादित केली आहेत ती पुढील प्रमाणे -

i) **नागरी स्वातंत्र्य:-**

नागरी स्वातंत्र्य हे शासनाच्या निरंकुशतेस प्रतिबंध करते. अभिजात उदारमतवादी विचारवंतांनी हे स्पष्ट केले की, ‘ की समाजावर व्यक्तीचे वर्चस्व नसून ते कायद्याची असावे. सरंजामशाही शासन व्यवस्थेमध्ये काही वर्गांना विशेष अधिकार बहाल करण्यात आले होते. सर्वसामान्य जनतेला मात्र मूलभूत स्वरूपाची स्वातंत्र्यही नाकारण्यात आली होती. त्यामुळेच अभिजात उदारमतवादाच्या पुरस्कर्त्यांनी नागरिक स्वातंत्र्याच्या तत्वाचे प्रतिपादन करून ‘स्वेच्छाचारितेचा’ विरोध केला व प्रत्येक व्यक्तीस आपल्या इच्छेनुसार जीवन जगण्याचा अधिकार असावयास हवा हे जाहीर केले.

ii) **वित्तीय स्वातंत्र्य:-**

वित्तीय स्वातंत्र्याचे समर्थन हे अभिजात उदारमतवादाचे एक प्रमुख तत्त्व होय. निरंकुश शासन व्यवस्थेमध्ये राज्यकर्त्यांवर कर लावण्यासंदर्भात यात कोणतीही बंधन नसतात. मात्र अभिजात उदारमतवादात शासनाच्या कर लावण्याच्या अधिकारास नियंत्रित केले व प्रसंगी नाकारलेले ही दिसते. जॉन लॉक यांनी मालमत्ता प्राप्त करण्याचा हक्क नैसर्गिक हक्क असून शासनाने व्यक्तीच्या परवानगीशिवाय कोणताही ही कर लावू नये हे असे स्पष्ट केले होते. अभिजात उदारमतवाद संपत्ती हा व्यक्तीचा पवित्र अधिकार मानतात जात व त्यामुळे वित्तीय दृष्ट्या तो स्वतंत्र असावा व शासन मात्र उत्तरदायी व मर्यादित राहावे असे प्रतिपादन करतात.

iii) **आर्थिक स्वातंत्र्य:-**

वित्तीय स्वातंत्र्याबरोबरच अभिजात उदारमतवादी व्यक्ती विकासाकरिता आर्थिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा पुरस्कार करतात. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीचे आर्थिक जीवन व त्याच्या द्वारे संचलित उद्योग व व्यापार हस्तक्षेप करू नये अशी अभिजात उदारमतवादाची भूमिका आहे. अभिजात उदारमतवादाच्या मते व्यक्तीस आर्थिक बाबींसंदर्भात निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार असावा. समाज, राज्य व इतर दुय्यम घटकांचा अडथळा येता कामा नये. कारण प्रत्येक खास आपले हित अहित काय हे समजते. त्यामुळे व्यक्तीस आर्थिक दृष्ट्या संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे व राज्याची भूमिका अहस्तक्षेपाची असावी.

iv) **व्यक्तिगत स्वातंत्र्य:-**

अभिजात उदारमतवाद व्यक्ती स्वातंत्र्यास सर्वोच्च स्थान व प्राधान्य देतो. अभिजात उदारमतवादाच्या मध्ये, ‘ व्यक्तीस जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वनिर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार असावा. राज्य व समाजाने त्यात कोणताही हस्तक्षेप करू नये. जे. एस. मिल या संदर्भात म्हणतात, “ व्यक्तीला आपल्या जीवनासंदर्भात नवनवीन प्रयोग करण्याचे ही स्वातंत्र्य असले पाहिजे. जे फक्त त्याच्या प्रयोगाचा विपरीत परिणाम समाजावर पडता कामा नये.” एकंदरीत अभिजात उदारमतवाद व्यक्तिगत स्वातंत्र्याचे तत्व अनिर्बंध स्वरूपात मान्य करतात.

v) **सामाजिक स्वातंत्र्य:-**

अभिजात उदारमतवादाने सामाजिक स्वातंत्र्याचा ही विचार व्यापक स्वरूपात मांडलेला आहे. अभिजात उदारमतवादाच्या दृष्टीने सामाजिक स्वातंत्र्य म्हणजे जन्म, संपत्ती, वर्ण, जाती वा लिंग या आधारावर व्यक्तींमध्ये, समाजामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये. अभिजात उदारमतवाद समाजातील सर्व नागरिकांना यांना विकासाची समान संधी उपलब्ध असावी याचा आग्रह धरतो. वंशपरंपरागत कोणासही विशेष संधी ही पुरवली जाऊ नये हे ही अभिजात उदारमतवाद स्पष्ट करतो.

vi) **कौटुंबिक स्वातंत्र्य:-**

अभिजात उदारमतवादाच्या दृष्टीने कौटुंबिक स्वातंत्र्य म्हणजे सर्व व्यक्तींना आपल्या कुटुंबाचे संघटन व परिवारिक जीवन जगण्याचे स्वातंत्र्य प्राप्त असले पाहिजे. शिवा स्त्रियांना विवाह व संपत्तीच्या बाबतीत पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार असावेत. अभिजात उदारमतवादी कौटुंबिक स्वातंत्र्य मध्ये बालकांना आई-वडिलांच्या, पालकांच्या दुर्व्यवहारापासूनचे स्वातंत्र्य, बालकांचे मानसिक, शारीरिक व नैतिक विकासाचे स्वातंत्र्य यांचाही अंतर्भाव करतात.

munotes.in

### vii) जातीय व राष्ट्रीय स्वातंत्र्य:-

अभिजात उदारमतवाद धर्मनिरपेक्ष राज्याचे प्रतिमान स्वीकारतात. अभिजात उदारमतवादाच्या दृष्टीने धार्मिक, वांशिक जातीय भेदभाव न करता सर्वांना समान स्वातंत्र्य असावयास हवे. अभिजात उदारमतवाद प्रशासकीय व भौगोलिक अशा दोन्ही आधारावर स्व शासनाच्या सिद्धांताचे प्रतिपादन करतात.

### viii) आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य:-

अभिजात उदारमतवाद आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्याच्या तत्त्वास प्राधान्य देतात. त्यामुळेच अभिजात उदारमतवाद संघर्ष, बल प्रयोग, युद्ध यासारख्या बाबींना प्रखर विरोध करतो. अभिजात उदारमतवादी आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात सर्व राष्ट्रांनी जवळीकता साधावी, प्रत्येक राष्ट्रास स्वनिर्णयाचा व परराष्ट्र धोरण ठरविण्याचा अधिकार असावा व इतर राष्ट्रांनी याचा आदर करावा असे अभिजात उदारमतवादात अंतर्भूत आहे.

### ix) राजकीय स्वातंत्र्य:-

अभिजात उदारमतवादाची सर्वोच्च दिन म्हणून स्वातंत्र्याच्या बाबीचे हॉब हाऊस प्रतिपादन करतात. अभिजात उदारमतवाद राजकीय स्वातंत्र्य मध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव करतो -

1) नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असावा.

2) निवडणूक लढविण्याचा अधिकार

3) सार्वजनिक पद ग्रहण करण्याचा अधिकार

4) राजकीय कार्यासंदर्भात योग्य माहिती मिळविण्याचा अधिकार

या चार बाबींची मांडणी करून राज्याच्या कार्यात सक्रिय रुपाने भाग घेणे म्हणजेच राजकीय स्वातंत्र्य होय अशी मांडणी अभिजात उदारमतवाद करतो.

अशा पद्धतीने अभिजात उदारमतवाद राजकीय स्वातंत्र्य लोकशाहीची मूल्ये तत्वे यांचे प्रतिपादन करणारी विचारधारा म्हणून विकसित झाली. मात्र अभिजात उदारमतवादाची स्वातंत्र्याची एक विचारधारा ही नकारात्मक स्वरूपाची दिसते.

## 2) आधुनिक उदारमतवाद:-

19 व्या शतकाच्या मध्यापर्यंत चा कालखंड अभिजात उदारमतवादाचा कालखंड मानला जातो. नंतरच्या काळात बदलत्या परिस्थितीत अभिजात उदारमतवादाची तत्त्वप्रणाली अपुरी व असमाधानी ठरू लागली. त्याचे नकारात्मक स्वरूप सातत्याने स्पष्ट होऊ लागले. नव्याने निर्माण झालेले प्रश्न व विचारधारा यांनी अभिजात उदारमतवादाच्या मर्यादा अधिक स्पष्ट करावयास सुरुवात केली. अभिजात उदारमतवादाने अनिर्बंध स्वातंत्र्य व अहस्तक्षेपाच्या या धोरणास अतिरेकी महत्त्व दिल्याने सामान्य कष्टकरी एका बाजूने उपास

munotes.in

मार ओढवली होती तर दुसऱ्या बाजूने कार्ल मार्क्स ने साम्यवादाची मांडणी करून अभिजात उदारमतवादास हादरा दिला होता. ा पार्श्वभूमीवर अभिजात उदारमतवादास सकारात्मक स्वरूप देणे अनिवार्य होते. त्यातूनच आधुनिक व सकारात्मक उदारमतवाद ही विचारधारा पुढे आली.

उदारमतवादी विचारधारेचे हे सकारात्मक रूप थॉमस हिल ग्रीन यांच्या पुढाकाराने सुरू झाले असे म्हटले जाते. सैद्धांतिक दृष्ट्या कार्लाइल, रस्किन, स्पेन्सर, जे. एस. मिल यांनी त्यात महत्त्वाचे योगदान दिलेले दिसते. आधुनिक उदारमतवाद हा व्यक्तीहिताबरोबरच सामाजिक हितास ही प्राधान्य देतो. प्रागतिक कायदे निर्माण करून सामाजिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करणे हा ही आधुनिक उदारमतवादाचा महत्त्वाचा घटक आहे. आधुनिक उदारमतवादाच्या मते, ' राजकीय स्थैर्य व सामाजिक सुरक्षितता यांना मुक्त व्यापार, औद्योगिकीकरण यासारख्या घटकांमुळे धोका निर्माण झाला असून त्यातील अनिष्ट घटकांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. हे अभिजात उदारमतवादाने व्यक्ती वादास आत्यंतिक महत्त्व दिले होते. आधुनिक उदारमतवादाने मात्र व्यक्तिवादा ऐवजी समुदाय वादाचे तत्व अंगिकारले. व्यक्तिवादाऐवजी मानवतावादाची प्रेरणा आधुनिक उदारमतवादाने प्रस्तुत केली. सामाजिक कल्याणासाठी आधुनिक उदारमतवादाने अधिक व्यापक स्वरूप ही धारण केले.

**आधुनिक उदारमतवादाचा विकास:-**

अभिजात उदारमतवादाच्या मर्यादा उघड झाल्यानंतर उदारमतवादास नवीन स्वरूप देण्याची व नव्याने त्यास समाज मान्यता मिळावी याकरिता उदारमतवादास नवीन स्वरूप देण्याचा जो प्रयत्न झाला त्यातूनच आधुनिक उदारमतवादाचा विकास घडून आलेला दिसतो. यामध्ये जे. एस. मिल, टी. एच. ग्रीन, जी. डी. रिशे, हॉक्सन, हॉब हाऊस यांचे योगदान या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आधुनिक उदारमतवादाचा विकास प्रामुख्याने दोन विचारवंतांच्या प्रभावातून घडून आलेला दिसतो. त्यातील एक प्रवाह हा जे. एस. मिल यांचा असून दुसरा प्रवाह हा टी. एच. ग्रीन यांचा आहे.

जे. एस. मिल स्वातंत्र्यवादी व उदारमतवादी विचारांचे कट्टर पुरस्कर्ते म्हणून सर्व परिचित आहेत. जे. एस. मिल यांनी उदारमतवाद आस भौतिकता, उपयोगिता वादी संकीर्णता व शासनाच्या कर्तव्याच्या संदर्भात नकारात्मक दृष्टीकोनातून मुक्त करण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. जे. एस. मिल यांच्या तत्व वैचारिक मांडणीचा प्रवास जॉन बेथॉम यांच्या उपयोगिता वादी तत्वज्ञानाच्या प्रभावापासून झाली आली असली तरी बदलत्या परिस्थितीत त्यांनी उपयोगिता वादास सुधारित स्वरूप धारण करावयास भाग पाडले. जे. एस. मिल यांची अशी भूमिका होती की, ' प्रत्येक व्यक्तीस विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य प्राप्त असले पाहिजे तसेच त्यास याचीही जाणीव असावयास हवी की, त्याच्या स्वातंत्र्यामध्ये व्यक्ती किंवा राज्य यांच्याद्वारे हस्तक्षेप केला जाणार नाही. व्यक्तीला जर पूर्ण स्वातंत्र्य वर्गा द्वारे अल्पसंख्यांक वर्गाच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण केले तर राज्यसंस्थेने अल्पसंख्यांकांच्या स्वातंत्र्याची रक्षण केले पाहिजे. अशा पद्धतीने जे. एस. मिल यांनी आपल्या विचारांची मांडणी पारंपारिक उदारमतवादाच्या प्रभावातून सुरू केली असली तरी त्यांनी अल्पावधीतच आपल्या विचारांमध्ये क्रांतिकारी बदल घडवून आणले. जे. एस. मिल यांच्या पुढील

विधानातून याची प्रचिती येते, " व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण तेव्हाच होऊ शकते की जेव्हा सर्वसामान्यांसाठी योग्य प्रकारची सामाजिक स्थिती विद्यमान असेल, तो म्हणतो की, राज्याची निर्मिती व्यक्ती व समाजहितासाठी झालेली आहे. तेव्हा राज्याचे कर्तव्य बनते की व्यक्तीच्या नैतिक व बौद्धिक विकासासाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी. राज्यसंस्थेने असा मुक्त समाज निर्माण करावा की ज्यात सर्व मनुष्य शांततामय मार्गाने आपला विकास करतील. शिक्षण, आरोग्य, भयमुक्त जीवन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्यसंस्थेची आहे." एकंदरीत जे. एस. मिल यांनी राज्याच्या कार्यक्षेत्रास मान्यता देऊन अभिजात उदारमतवादाची आधुनिक स्वरूप प्रधान केलेले दिसते.

अभिजात उदारमतवादास आधुनिक उदारमतवादाचे सकारात्मक स्वरूप देणारा दुसरा विचार प्रवाह टी. एच. ग्रीन यांच्या पुढाकाराने कार्यान्वित झालेला दिसतो. टी. एच. ग्रीन तो हे इंग्लंडमधील एक महत्त्वाचे विचारवंत होत. त्यांनी Lectures on the Principles of Political obligations या ग्रंथात आदर्शवादी सिद्धांताची मांडणी केली. या सिद्धांताच्या माध्यमातून ग्रीन यांनी नकारात्मक उदारमतवाद्यांनी मांडलेल्या राज्याच्या अहस्तक्षेपाचा सिद्धांत तसेच राज्यात दैवी स्तर प्रदान करणारा हेगेल चा आदर्शवादी सिद्धांत यांचे खंडन करून औद्योगिक क्रांतीने उत्पन्न परिस्थितीला समोर ठेवून लोकतंत्रात्मक उदारमतवादाची मांडणी केली आहे.

टी. एच. ग्रीन हे हे आदर्शवादी विचारवंत होते शिवाय ते उदारमतवादाचे ही पुरस्कर्ते होते. ग्रीन यांनी राज्यात साध्य न मानता साध्याची प्राप्ती करण्याचे एक महत्त्वाचे साधन मात्र मानले. ग्रीन यांच्या मते, " राज्य एक नैतिक व जैविक सत्ता मात्र आहे तेव्हा राज्यातंर्गत राहणाऱ्या नागरिकांच्या नैतिकतेच्या विकासाची जबाबदारी राज्याची आहे. त्यामुळे व्यक्तीच्या नैतिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची निर्मिती राज्याने करणे आवश्यक आहे. ग्रीन यांच्यामध्ये व्यक्तीच्या नैतिक विकासात गरीबी, मागासलेपण, धर्मांधता, अशिक्षितपणा, अंधविश्वास, विषमता, शोषण यासारख्या समस्या घटक प्रमुख अडथळे ठरतात. अशा परिस्थितीत या घटकांना दूर करून व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी पूरक परिस्थिती राज्य निर्माण करू शकते. ग्रीन अशा पद्धतीने राज्याच्या सकारात्मक पैलूवर भर देऊन राज्याने न्याय, समता व मानवता या घटकांना कायदा करताना प्राधान्य द्यावे. ग्रीन यांच्या मते उदारमतवादी धोरणांमधून सकारात्मक प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे हे कारण लोक मध्ये स्वभावताच संवेदनशील असते. टी. एच. ग्रीन यांनी नैतिकता व सामाजिकता या घटकांना प्राधान्य देत आधुनिक उदारमतवादाची सकारात्मक मांडणी केली. वेपर यांनी ग्रीन यांचे योगदान स्पष्ट करताना म्हटले आहे " ग्रीन ने उदारमतवादाला स्वार्थातून अजून बाहेर काढून आस्थेच्या तत्वावर प्रतिष्ठित केले आणि व्यक्ती वादास नैतिकता व सामाजिक एक बाजू प्रदान केली व आदर्श वादास सभ्य तथा निरपराध बनवले."

टी. एच. ग्रीन यांच्यानंतर आधुनिक उदारमतवादी विचार प्रवाहामध्ये हॉबहाउस या विचारवंताने आणि महत्त्वाचे योगदान दिले. हॉबहाउस यांनी उदारमतवाद व समाजवाद यात समन्वय साध्य करणाऱ्या घटकांची मांडणी केली. हॉबहाउस यांचे आधुनिक उदारमतवाद विषयीची विचार 1922 साली प्रकाशित झालेल्या एलिमेंट्स ऑफ सोशल जस्टिस या ग्रंथात प्रामुख्याने आहेत. हॉबहाउस या ग्रंथात असे प्रतिपादन करतात की," सामाजिक बंधनांची अध्यात्मिक एक प्रकृती व सामूहिक हित हीच स्वातंत्र्याची ची आधारशिला आहे." हॉबहाउस

ची भूमिका वाद्यांशी जवळीक साधणारी दिसते. वैयक्तिक हित सामूहिक हिताशी जोडलेले आहे व सामूहिक हिताचा आधार वैयक्तिक हित आहे हे हे वाद्यांचे तत्व हॉबहाउस ही स्वीकारताना दिसतात. राज्याच्या अधिकार क्षेत्राबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना हॉबहाउस म्हणतात " राज्याची परम पवित्र नाही नाही व निरंकुश सुद्धा नाही. तर राज्याची आधार शिला नैतिक अधिकार आहे. त्यामुळे राज्य स्वयं साध्य होऊ शकत नाही नाही तर राज्य साध्याचे साधन आहे. जीवनाची सिद्धी करणे हे राज्याचे महत्त्वाचे साध्य आहे." एकंदरीत हॉबहाउस यांनी सार्वजनिक हिताचे गंठण करण्या करिता राज्य आपल्या सदस्यांना स्वस्थ व कुशल नागरी जीवनाकरता परिपूर्ण परिस्थिती उपलब्ध करून देते. या परिस्थितीमध्ये राहून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेणे हे व्यक्तीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे अशी भूमिका हॉबहाउस यांच्या विचारांमधून प्रकर्षाने व्यक्त होते.

आधुनिक उदारमतवादाच्या उभारणीत हेराल्ड लास्की यांचे स्थानही महत्त्वाचे आहे. प्रो. लास्की यांनी 20 व्या या शतकाच्या पूर्वार्धामध्ये राज्याच्या उदारमतवादी सिद्धांतामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. प्रो. लास्की यांनी ही उदारमतवाद व समाजवाद या दोन तत्त्वांमध्ये सुवर्णमध्य साधून उदारमतवादी प्रक्रियेच्या सहाय्याने ही समाजवादी उद्दिष्टे साधली जाऊ शकतात असे प्रतिपादन केले. प्रो. लास्की यांनी आधुनिक उदारमतवादाची ची मांडणी करणारे विचार प्रामुख्याने ' लिबर्टी इन द मॉर्डन स्टेट' या आपल्या ग्रंथात मांडले आहेत. या ग्रंथात प्रो. लास्की म्हणतात, " स्वातंत्र्याची परिभाषा ग्रीनने दिली आहे ती वर्तमान काळात स्वातंत्र्याच्या नकारात्मक संकल्पने पेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहे. कारण ग्रीन ची परिभाषा ही स्वातंत्र्याच्या सार तत्त्वास केंद्रीभूत मान प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रो. लास्की यांनी कल्याण कारी राज्य संकल्पनेचा स्वीकार करून राज्याचे कार्य सर्वांच्या मूलभूत गरजांची पूर्तता व मनुष्याच्या नागरी जीवनाशी संबंधित असलेल्याभुताचे संरक्षण करणे आहे हे हे स्पष्ट केले. एकंदरीत आधुनिक उदारमतवादाने लोकशाही परिप्रेक्षातून सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांना महत्त्वाचे स्थान दिले आहे हे स्पष्ट होते.

आधुनिक उदारमतवादाची प्रमुख तत्त्वे:-

आधुनिक उदारमतवादाची तत्त्वे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील-

1) **मुक्त मानव व मुक्त समाजाचा स्वीकार:-**

आधुनिक उदारमतवादाने मानवी स्वातंत्र्य व अधिकारांचा स्वीकार करून मुक्त माने व मुक्त समाजाची कल्पना मांडलेली दिसते.

2) **सकारात्मक स्वातंत्र्य:-**

आधुनिक उदारमतवादास सकारात्मक स्वातंत्र्य असेही संबोधले जाते. आधुनिक उदारमतवादाने सकारात्मक स्वातंत्र्याची कल्पना मांडली. आधुनिक उदारमतवादाच्या दृष्टीने स्वातंत्र्य राज्याच्या नियंत्रणापासून मिळविण्यासाठी नसून राज्याच्या माध्यमातून ते प्राप्त होते. राज्याच्या मार्फतच स्वातंत्र्यासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण केली जाऊ शकते. शिवाय स्वातंत्र्याच्या मार्गात येणारे अडथळे दूर करण्याची क्षमता ही राज्याकडेच असते.

3) **लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार :-**

आधुनिक उदारमतवाद लोकशाही शासन व्यवस्थेच्या स्थापनेस प्रमुख स्थान देतो. स्वातंत्र्य, समता, न्याय यासारख्या आधुनिक मानवी मूल्यांची उभारणी लोकशाही शासन व्यवस्थेच्या स्वीकारा शिवाय होऊ शकणार नाही ही आधुनिक उदारमतवादाची भूमिका आहे.

4) **कल्याणकारी राज्याचा स्वीकार:-**

अभिजात उदारमतवादाने राज्याचे कार्यक्षेत्र एक प्रकारे शांतता व सुव्यवस्था एवढ्यापुरते मर्यादित करून ठेवले होते. आधुनिक उदारमतवादाने मात्र व्यक्ती विकासाकरिता राज्याचा सकारात्मक हस्तक्षेप आवश्यक मानला. आहे त्याकरिता आधुनिक उदारमतवाद राज्याच्या कल्याणकारी स्वरूपाचा स्वीकार करतात.

6) **निरंकुश शासनव्यवस्थेस नकार:-**

आधुनिक उदारमतवादाने व्यक्ती विकासाकरिता राज्याच्या सकारात्मक हस्तक्षेपास मान्यता दिली असली तरी राज्याने अवाजवी हस्तक्षेप करू नये व राज्यास निरंकुश स्वरूप प्राप्त होऊ नये यासाठी आधुनिक उदारमतवाद सतर्क असल्याचे प्रत्ययास येते. त्यामुळेच आधुनिक उदारमतवाद वेळोवेळी हे स्पष्ट करतो की राज्य हे साध्य नसून ते व्यक्ती विकास साध्य करण्याचे एक साधन मात्र आहे. ्यामुळे कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीची अवहेलना राज्याकडून होता कामा नये.

6) **आर्थिक क्षेत्रात राज्याच्या हस्तक्षेपास मान्यता:-**

अभिजात उदारमतवादाने आर्थिक बाबींमध्ये राज्यासाठी कटाक्षाने अहस्तक्षेपाचे धोरण आखून दिलेले होते. आधुनिक उदारमतवाद मात्र आर्थिक क्षेत्रात अहस्तक्षेपाच्या धोरणास बाजूला ठेवून लोकोपयोगी कार्याकरिता राज्याच्या हस्तक्षेपास मान्यता देतात.

7) **समता तत्त्वास प्रतिष्ठा:-**

अभिजात उदारमतवादाने स्वातंत्र्याच्या मूल्यास अतिरेकी महत्त्व दिल्याने समतेचे तत्व काहीसे झाकोळले गेले. आधुनिक उदारमतवादाने मात्र स्वातंत्र्याच्या तत्वा बरोबरीनेच समतेच्या तत्त्वासही प्राधान्य व प्रतिष्ठा दिली. संमती शिवाय लोकशाहीची प्रस्थापना होऊ शकत नाही व लोकशाही शिवाय स्वातंत्र्य अबाधित राहू शकत नाही असे आधुनिक उदारमतवादाने स्पष्ट करून स्वातंत्र्य व समता ही मूल्ये परस्परविरोधी नसून परस्परपूरक असल्याचे दाखवून दिले.

8) **राज्यापासून स्वातंत्र्य ऐवजी राज्याद्वारे स्वातंत्र्य:-**

अभिजात उदारमतवादाने राज्यास एक बंदिस्त स्वरूप प्रदान करून व्यक्तीस राज्यापासून स्वातंत्र्य असे समीकरण पुढे आणले होते. आधुनिक उदारमतवाद मात्र राज्यापासून स्वातंत्र्य ऐवजी राज्याद्वारे स्वातंत्र्य या तत्त्वाचा अंगीकार

करतो. आधुनिक उदारमतवादाची अशी धारणा आहे की, “ अधिकार व स्वातंत्र्य ही नैसर्गिक नसतात तर त्यांचे स्वरूप हे प्रामुख्याने सामाजिक असते. सामाजिक संदर्भाशिवाय व्यक्तीच्या स्वातंत्र्य व हक्कांना कोणताही अर्थ नसतो. त्यामुळे संपूर्ण समाज कल्पना विरोधात व्यक्ती अधिकार उपभोगत असेल तर अशा प्रसंगी राज्याने हस्तक्षेप करणे आवश्यक ठरते.

9) **संविधानवादाचा स्वीकार :-**

आधुनिक उदारमतवादाने मर्यादीत शासन व्यवस्थेचा स्वीकार करत संविधान वादाच्या तत्त्वास मान्यता दिली. आधुनिक उदारमतवादाच्या दृष्टीने राज्य व्यक्तीच्या जीवनात एका विशिष्ट घटका पुरताच हस्तक्षेप करतात की ज्याचा संबंध व्यक्तीचे स्वातंत्र्य व समाज कल्याण यामध्ये सामंजस्य स्थापित करण्यापुरता मर्यादित असतो. शासनाच्या निरंकुश तेवर नियंत्रण ठेवण्याकरिता संविधानाची निर्मिती करण्यात आलेली असते व या संवैधानिक चौकटीतच शासनास आपले अधिकार वापरणे बंधनकारक असते. या तत्त्वाच्या आधारे आधुनिक उदारमतवाद संविधानाचा स्वीकार करते.

10) **लोकशाही समाजवादास मान्यता:-**

स्वातंत्र्य व समतेचा समन्वय जसा आधुनिक उदारमतवादात घडून आला तसाच समन्वय लोकशाही व समाजवाद या दोन तत्त्वांमध्ये आधुनिक उदारमतवाद घडवून आणतो. आधुनिक उदारमतवादाच्या मते समाज वादाशिवाय लोकशाही शासनव्यवस्था अपूर्ण ठरतो. त्यामुळे लोकशाही समाजवादाचे प्रतिमान स्वीकारावयास हवे.

11) **वर्ग समन्वयास प्राधान्य :-**

आधुनिक उदारमतवाद समाज हा अनेक हितसंबंधी गटांचा मिळून बनलेल्या समूह आहे असे मानतो. आधुनिक उदारमतवादाच्या दृष्टीने राज यांचे कार्य विभिन्न समुदायांचे हित साधणे तसेच विभिन्न वर्गात समन्वय प्रस्थापित करणे होय.

12) **व्यक्ती हित व समाजिक यातील फरक अमान्य:-**

आधुनिक उदारमतवादास व्यक्तीचे हित व सामाजिक हित अशी विभागणी तत्वतः अमान्य आहे. त्यातही प्राधान्यक्रम द्यावयाचा असेल तर आधुनिक उदारमतवाद सामाजिक हितास अधिक प्राधान्य देते.

13) **क्रांतिकारक परिवर्तनास नकार :-**

आधुनिक उदारमतवाद क्रांतिकारक परिवर्तन याची कल्पना त्याज्य मानतो. त्याऐवजी कायदेशीर व शांततामय समाजपरिवर्तनाचा विचारआधुनिक उदारमतवाद प्रस्तुत करतो. अशा पद्धतीच्या सामाजिक परिवर्तनामध्ये माझ्यातील सर्व वर्ग, समूह व संस्थांचा सहयोग असणे आवश्यक असल्याचे आधुनिक

उदारमतवाद प्रतिपादन करतो. अशा पद्धतीने सामाजिक परिवर्तन झाले तरच त्यातून नाईक समाज निर्माण होऊ शकेल असे अभिजात उदारमतवादास वाटते.

14) **सहभागी व पारदर्शक शासनाचा स्वीकार:-**

आधुनिक उदारमतवादा मध्ये सहभागी व पारदर्शक शासनाच्या घटकांवर भर दिला जातो. राज्यातील सर्व नागरिकांना सहभागी पद्धतीने शासन व्यवहारात कार्यकर्ता यावे, शासनाच्या धोरणांवर निर्भीडपणे टीका करता यावी, सार्वभौम प्रौढ मताधिकार असावा निवडणूका नि:पक्षपाती व मुक्त वातावरणात पार पाडल्या जाव्यात, अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपले जावे यासारख्या तत्वांना आधुनिक उदारमतवाद प्राधान्य देऊन सहभागी व पारदर्शक शासनाचा स्वीकार करते.

### 3) समतावादी उदारमतवाद :-

उदारमतवादी विचार प्रवाहाच्या इतिहासात समतावादी उदारमतवादाचे स्थानही महत्त्वाचे आहे. Equalitarian हा शब्द फ्रेंच भाषेतील equl व equal या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ समता असा होतो. उदारमतवादी विचारधारे समोर साम्यवादाने जे आव्हान उभे केले होते त्यास पडतो लावण्यासाठी समतावादी उदारमतवादाचा विचार प्रवाह पुढे आला.

समतावादी उदारमतवादाची मूलभूत तत्वे :-

समतावादी उदारमतवादाची मूलभूत तत्वे पुढील प्रमाणे मांडता येतील.

1) **कायदेशीर समतावाद :-**
समतावादी उदारमतवाद कायदेशीर समानतेच्या तत्त्वाचा अंगीकार करते.

2) **व्यक्ती व्यक्ती मधील समानता:-**
समतावादी उदारमतवाद व्यक्ती व्यक्ती मधील समानता वादास सर्वोच्च स्थान देतो.

3) **स्त्री पुरुष समानता:-**
अधिकार व जबाबदारीच्या दृष्टीने स्त्री-पुरुष समानतेस समतावादी उदारमतवाद प्राधान्य देतो.

4) **सामाजिक समतावाद:-**
समतावादी उदारमतवाद सामाजिक समता वादाची मांडणी करतो.

5) **धार्मिक व आध्यात्मिक समतावाद:-**
समतावादी उदारमतवादाने धार्मिक व अध्यात्मिक समता वादास ही मान्यता दिली आहे.

अशा पद्धतीने समतावादी उदारमतवादाने समतेच्या तत्त्वास उदारमतवादी तत्वज्ञानात महत्त्वाचे स्थान दिले.

## 1.5 नवउदारमतवाद :-

20 व्या या शतकाच्या पूर्वार्धात सर्वच ठिकाणी राज्याचे कार्यक्षेत्र सातत्याने वाढत गेले. कल्याणकारी राज्याच्या वाढत्या विस्ताराबरोबर लोकांमध्ये सामाजिक सुरक्षेची भावना वाढीस लागली. मात्र आर्थिक विकासाचा वेग मात्र मंदावला. कारण सर्वसामान्य जनतेत सामाजिक सेवांचा घेऊन आरामदायी जीवन जगण्याची भावना वाढीस लागली. त्यामुळे श्रमापासून विन्मुख होण्याची प्रवृत्तीही बळावली. याचा बोजा समाजातील प्रतिभाशाली व कष्टकरी समूहावर प्रचंड स्वरूपात पडला व आत्यंतिक श्रमाचा परिणाम म्हणून हे समूह श्रमा पासून विन्मुख होण्यास सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर आर्थिक विकासाच्या गतीस चालना देण्याचे आव्हान उदारमतवादी विचार समुहा पुढे होते. या आव्हानाचा सामना करण्यासाठी नव-उदारमतवादी विचार प्रवाह पुढे आला.

नवउदारमतवादाचा उदय व विकास हा सर्वाधिकारवादी निरंकुशतेपासून मानवाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने झाला. आधुनिक उदारमतवादाने राज्याचे कार्यक्षेत्र प्रचंड स्वरूपात वाढवले. त्यामुळे राज्याचा व्यक्ती जीवनातील हस्तक्षेप वाढला होता. या हस्तक्षेपापासून व्यक्तीचे संरक्षण करण्याच्या हेतूने नवउदारमतवाद पुढे आला. नवउदारमतवादाने व्यक्ती व सामाजिक समूहाच्या व्यक्तित्वावर भर दिला आहे. उदारमतवाद राज्यास सामाजिक समूह व समुदायांचा संघ मानतो. नवउदारमतवादाच्या दृष्टीने राज्य समुदायानी मिळून बनते. याचाच अर्थ राज्य हे समुदायापेक्षा मोठे नाही. त्यामुळे विभिन्न समुदायांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे हे राज्याचे कार्य होय.

नवउदारमतवादाच्या उभारणीत इसाचा बर्लिन, शुंपिटर, रॉबर्ट ढॉल, एफ. ए. हायेक, फिल्टर फ्रीडमन, चापमॅन, रॉल्स, रॉबर्ट नॉजिक, जॉन डिव्ही, मॉरिस रफीएल कॉटन इत्यादींची योगदान महत्त्वाचे आहे. जॉन डीव्ही व मॉरिस रफीएल कॉटन यांनी नवउदारमतवादास एक प्रवृत्ती व एक कार्यक्रम या स्वरूपात मांडले. हे विचारवंत नवउदारमतवादास प्रवृत्तीच्या रूपाने हा विवेक व वैज्ञानिक पद्धतीस सामाजिक क्रियाकलापाचा निर्देशक मानते. समकालीन समाजातील समस्यांच्या समाधानाच्या संदर्भात ही प्रवृत्ती उदार बनते व खुल्या वातावरणात काम करण्याचे स्वातंत्र्य देते.

**नवउदारमतवादाची प्रमुख तत्वे:-**

डेव्हिड जी. स्मिथ यांनी नवउदारमतवादी तत्त्वज्ञानाची प्रमुख तत्वे पुढील प्रमाणे नमूद केली आहेत.

1. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वतंत्र अभिव्यक्तीचे मूल्यांकन

2. व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वतःकरिता व समाजा करिता उपयोगी बनविण्याकरिता व्यक्तीच्या योग्यते मध्ये विश्वास निर्माण करणे.

3. स्वतंत्र अभिव्यक्ती व स्वातंत्र्य यात विश्वासाला सुरक्षित ठेवणारी संस्था व धोरणांना कायम राखणे.

**नवउदारमतवादाच्या मान्यता:-**

नवउदारमतवादाने उदारमतवादाच्या काही मूळ मान्यतांना परत चालना दिली तर काही मान्यता नव्याने प्रस्थापित केल्या. त्यातील प्रमुख घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल-

1) **राज्याची माघार:-**

अभिजात उदारमतवादाची मुख्य मान्यता अशी होती की राज्याने व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांमध्ये कमीत कमी हस्तक्षेप करावा. या आधारेच नवउदारमतवाद राज्याच्या दूर दूर पर्यंत पसरलेल्या कार्य क्षेत्रास पुन्हा सीमित करण्याचे समर्थन करतात. यालाच राज्याची माघार असे संबोधले जाते. या पद्धतीची विचारधारा प्रामुख्याने 1980 च्या दशकात अमेरिका व इंग्लंड मध्ये रूढ झाली. 1990 च्या दशकात सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर यूरोपमध्ये निर्माण झालेल्या या आर्थिक संकटाने ही धारणा अधिक बळकट झाली. सोव्हिएत रशियाच्या पतनाने यास दुजोरा मिळाला की अल्पविकसित क्षेत्रामध्ये राज्य प्रणित विकासाच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेस दूर नेले जाऊ शकत नाही.

2) **बाजार व्यवस्थेला चालना:-**

उदारमतवादाच्या मते, 'व्यक्तींची उत्पादनक्षमता व अर्थव्यवस्थेची कार्यकुशलता यास चालना देण्याकरिता बाजाराच्या शक्तींना आपले कार्य करू दिले पाहिजे.' नवउदारमतवादाचे समर्थक स्वेच्छेने प्रेरित व्यवस्थेस उत्तम व्यवस्था मानतात. त्यांच्या मते मुक्त बाजार अशा व्यवस्थेस चालना देत असतो जी मानवी गरजांच्या निश्चित ज्ञानाचा दावा करते. नवउदारमतवादाची अशी धारणा आहे की, मानवी गरजा मुक्त समाजात विभिन्न व्यक्ती मधील परस्पर व्यवहाराच्या रूपाने व्यक्त होत असतात. त्यासाठी सामाजिक जीवनाचे काही निर्णय बाजारावर सोडून दिले जाऊ शकतात ते अवश्य सोडून द्यावयास हवे असे नवउदारमतवादी स्पष्ट करतात.

3) **बाजारव्यवस्थेतूनच वास्तव लोकशाहीची अभिव्यक्ती:-**

नवउदारमतवादाची अशी धारणा आहे की, बाजार विभिन्न व्यक्तींना आपापल्या पसंतीप्रमाणे व्यवहार करण्याची अधिकाधिक संधी उपलब्ध करून देत असतो. त्यामुळे खऱ्या लोकशाहीची व्यावहारिक अभिव्यक्ति होते. नवउदारमतवादी म्हणतात औपचारिक लोकशाही स्वयम् एका राजकीय बाजाराचे स्वरूप धारण करीत असते. यामध्ये नागरिक आपले मत देऊन त्या बदल्यात विविध प्रकारच्या हितांचे लाभ व सेवा मिळवत असतात. बाजारात सर्व लोकांना आपापल्या क्षमतेनुसार व आपापल्या संसाधनानुसार सर्वोत्तम कामाची प्रेरणा व प्रोत्साहन देत असतो. त्यामुळे राज्याने बाजारव्यवस्थेत पूरक भूमिका पार पाडली पाहिजे. एकंदरीत नवउदारमतवादाच्या दृष्टीने राज्याचे उपयुक्त कार्य बाजार व्यवस्थेला संरक्षण देणे आहे. त्याच्या स्वाभाविक कामकाजामध्ये अडथळा निर्माण करणे नाही.

munotes.in

सारांश, नवउदारमतवाद हा अभिजात उदारमतवादाचेच नवीन स्वरूप होय. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर भांडवलशाही विचारसरणीचा प्रभाव अधिकच वाढला. राज्य नियंत्रित अर्थव्यवस्थांच्या मर्यादा जगाने अनुभवल्या. त्यातून राज्याचा हस्तक्षेप कमीत कमी असावयास हवा या मतास चालना मिळाली. राज्याचे कार्यक्षेत्र जेवढे मर्यादित असेल तेवढा आर्थिक विकास अधिक हे नवउदारमतवादाचे महत्वाचे सूत्र होय.

## 1.6 सारांश:-

उदारमतवाद ही जगाने अनुभवलेली सर्वाधिक प्रभावी तत्त्वप्रणाली होय. कालसुसंगत स्वतःमध्ये बदल करून ही विचारधारा वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत आजतागायत आपला प्रभाव कायम राखून असल्याचे दिसते. त्यामुळेच उदारमतवाद ही इतर विचारधारांप्रमाणे निश्चित व क्रमबद्ध अशी विचारधारा नाही. उदारमतवाद ही एका व्यक्तीची विचारधारा नसून ही अनेक व्यक्तींच्या विचारांचे मिश्रण आहे. त्यामुळे उदारमतवाद ही एक जीवन दृष्टी, जीवन क्रम व मानवी विचारांची प्रवृत्ती आहे.

## 1.7 आपण काय शिकलो?

प्र. 1 ला उदारमतवाद म्हणजे काय? उदारमतवादाचा विकास सविस्तर लिहा.

प्र. 2 रा उदारमतवादाचे प्रमुख प्रकार लिहा.

प्र. 3 रा अभिजात उदारमतवादाची मुख्य तत्वे व विकास स्पष्ट करा.

प्र. 4 था आधुनिक उदारमतवादी संकल्पना स्पष्ट करून आधुनिक उदारमतवादात भर टाकणारे विचार प्रवाह लिहा.

प्र. 5 वा नवउदारमतवादावर निबंध लिहा.

प्र. 6 वा टिपा लिहा

1. समतावादी उदारमतवाद
2. नवउदारमतवाद
3. उदारमतवादाचा विकास
4. अभिजात उदारमतवाद
5. उदारमतवादी तत्वे
6. आधुनिक उदारमतवाद

munotes.in

## 1.8 संदर्भसूची :-


1) डॉ. वैकुण्ठ नाथ सिंह - राजनीतिक सिद्धांत

2) ओम प्रकाश गाबा - राजनीतिक सिद्धांत की रूप रेखा

3) दियोल - उदारमतवाद व मार्क्सवाद

4) डॉ. एस. एल. दुभाषी - आधुनिकता एवं उत्तर आधुनिकता

5) डॉ. एस. एस बी. फड - उच्चतर आधुनिक राजकीय सिद्धांत.


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# २

# समाजवाद

**घटक रचना**


२.१ उद्दिष्टये

२.२ समाजवाद संकल्पना

२.३ मार्क्सवाद

२.४ लोकशाही समाजवाद

२.५ लॅटिन अमेरिकन समाजदवाद

२.६ सारांश

२.७ आपण काय शिकलो?

२.८ संदर्भ सूची


## २.१ उद्दिष्टये

समाजवाद ही राजकीय तत्वज्ञानातील एक आधूनिक तत्वप्रणाली म्हणून मान्यताप्राप्त झाली असली तरी समाजवादी विचार हे प्राचीन काळापासून सातत्याने मांडले गेल्याचे संदर्भ ही आढळतात. परंतु आधूनिक अर्थाने समाजवाद ही विचारधारा १८ व्या व १९ व्या शतकामध्ये मांडली गेली. समाजवाद ही तत्वप्रणाली लोकशाहीतील अतिरेकी व्यक्तिवाद व भांडवलशाहीतील सर्वकष शोषण या दोहोंची प्रतिक्रिया मानली जाते. समाजवाद अतिरेकी व्यक्तिवादास विरोध करतो. समाजवादाची अशी धारणा आहे की, व्यक्तिवादाच्या अतिरेकामुळे शासनाने समाजजीवनात निर्हस्तक्षेप नीती स्वीकारावी ही भूमिका मांडली जाते. परिणामत: अनिर्बंध स्वातंत्र्य शोषण व विषमता यांचा पुरस्कार होतो. समाजात अन्याय, संघर्ष व अशांतता याचे वातावरण निर्माण होते. हे सर्व दोष टाळण्याकरीता व्यक्ती पेक्षा समाज, व्यक्तिहीतापेक्षा समाजहित यास महत्व दिले जावे हा समाजवादाचा आग्रह आहे या अर्थाने समाजवाद व्यक्विादा विरोधी प्रतिक्रया मानली जाते. शिवाय समाजवाद हे भांडवलशाही विरूद्धचे ही बंड ठरते कारण भांडवलशाहीतील मूलभूत तत्वांना समाजवाद त्याज्य ठरवतो. या दृष्टीने या घटकामध्ये समाजवाद या तत्वप्रणालीची संकल्पनात्मक मांडणी करून समाजवादाच्या विकास व समाजवादाचे प्रमुख प्रकार यांची मांडणी करण्यात आली. ज्यामुळे समाजवाद विषयक आपले आकलन अधिक प्रगल्म होण्यास मदत होऊ शकेल.

## २.२ समाजवाद संकल्पात्मक अर्थ

समाजवाद ही संकल्पना पुढील काही घटकांच्या आधारे आपणांस अधिक समजून घेता येईल.

## १) समाजवाद अर्थ :-

समाजवाद संकल्पना समजून घेण्याकरिता 'समाजवाद' या शब्दाचा अर्थ समजून घेणे आवश्यक ठरते. Socialism या इंग्रजी शब्दाकरिता मराठी भाषेत 'समाजवाद' हा पारिभाषिक शब्द योजला जातो. Socialism हा शब्द फ्रेंच भाषतील Socious या शब्दापासून तयार झालेला असून त्याचा अथ 'समाज' असा होतो. याचा अर्थ समाजवाद ही विचारधारा ही समाजाशी संबंधित वा समता असलेला समाज निर्माण करण्यासंबंधीचा विचारप्रवाह व त्यानुसार केलेली कृती म्हणजे समाजवाद होय. फ्रेंच विचारवंत फेबूब यांनी सर्वप्रथम 'समाजवाद' हा शब्द वापरला असे म्हटले जाते. काही विचारवंत हे श्रेय रॉबर्ट ओवेन यांना देतात. इग्लंड मध्ये 'Poor Man's Guardian' या वृत्तपत्रिकेत १८३७ साली 'समाजवाद' हा शब्द वापरण्यात आला तर १८३५ साली रॉबर्ट ओवेन प्रणित 'An Association of all Classes of all Nations' या संघटनेच्या चर्चा सत्रात हा वापरला गेला. १९व्या शतकात एक तत्वप्रणाली म्हणून समाजवाद हा शब्द प्रचलित झाला.

## २) समाजवाद व्याख्या

समाजवाद ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**रोशरा –** "समाजवाद ही संपत्तीच्या समान हक्कासंबंधी आधि उपयोगासाठी केलेली मागणी होय"

**हॅडन गेस्टने –** स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात स्पर्धेऐवजी सहयोगाची भावना निर्माण करणे म्हणजे समाजवाद होय."

**हयूगन –** "समाजवाद ही श्रमिक वर्गाची राजकीय चळवळ आहे. त्या चळवळीचे उद्दिष्ट आर्थिक उत्पादनाच्या साधनावर सामुदायिक मालकी प्रस्थापिने व कामगारांची पिळवणूक नष्ट करणे हे आहे."

**बेबेल –** समाजवाद हा वस्तूत: एक दार्शनिक विचार आहे. धार्मिक क्षेत्रात नास्तिकता, राजकीय क्षेत्रात लोकतंत्रिय गणराच्याच्या व्यवसाय क्षेत्रात सार्वजनिक समाप्तीवादाचा नैत्रिक क्षेत्रात अंतहीन आशावादाचा, अध्यात्मिक क्षेत्रात प्राकृतिक भौतिकवादाचा परिचारिक क्षेत्रात परिवार व वैवाहिक संबंधाचा प्रतिक म्हणजे समाजवाद होय."

**वेबस्टर –** "समाजवाद हा सामाजिक संघटनेचा आर्थिक व राजकिय सिध्दात आहे. स्पर्धेच्या ऐवजी सहकार्य व आर्थिक कार्यावर शासकीय नियंत्रण निर्माण करणे हे समाजवादाचे प्रमुख वैशिष्टये आहे. समाजवादामध्ये संधी आणि फळाची समान विभागणी होते.

**एलिएट –** "ज्या सिंध्दातानुसार उत्पादन, विभाजन व विनिमयाची साधने जनतेच्या अथवा समाजाच्या मालकीची व्हावीत, त्या साधनांवर समाजाचे नियंत्रण प्रस्थापित व्हावे. प्रत्येक व्यक्तीस आपल्या गुणांची जोपासना करण्याची समानसंधी दिली जावी

आणि समाजाची संपत्ती न्याय्य पद्धतीने वाटली जावी असे सुचविले जाते. तो राजकीय व सामाजिक सिद्धांत म्हणजे समाजवाद होय.''

**कामगार चळवळीचा ज्ञानकोश –** ''समाजवाद ही कामगार वर्गाची विचारप्रणाली व चळवल असून वर्ग संधार्नच्या मार्गाने राजकीय वय्वस्थेवर कब्जा करून सामाजिक नियंत्रणाद्वारे उद्योगधंद्याच्या क्षेत्रात स्वायत्त कारभार स्थापन करण्याचे त्या चळवळीचे उद्दिष्य असते.''

**समाजवादाची गृहीत तत्वे :-**

समाजवादी तत्वप्रणालीची प्रमुख गृहीत तत्वे पुढील प्रमाणे आहेत.

१) सर्वसामान्य व्यक्तिस हित म्हणजे काय? आपले हित कशात आहे? याचे आकलन नसते.

२) व्यक्तीस यदाकदाचित आपले हित समजले तरी ते प्राप्त करण्याची क्षमता वा पात्रता त्या व्यक्तीजवळ याची शाश्वती नसते.

३) व्यक्तहीत व समाजहित यात भिन्नता असू शकते व त्यात संघर्ष ही उद्‌भवू शकतो.

४) व्यक्तिहित साध्य झाले म्हणजे समाजहित साध्य होईलच याची शाश्वती नाही. समाजवादाची अशी धारणा आहे की, 'समाज हा व्यक्ती गणिती पद्धतीने एकत्र आल्याने निर्माण होत नाही. समाजालाही व्यक्ती प्रमाणेच स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तित्व व समाजमानस असते.

एकदंरीत वरील गृहनिकांच्या आधारावर समाजवादी तत्व प्रणाली व्यक्विादास प्रतिवाद करते. समाजवादी तत्वप्रणाली असे प्रतिपादन करते की, व्यक्तीहित निश्चिती, अविष्करण व प्रस्थापना समाजाने करावी. शासनााने हितसंवर्धनात व्यक्तीला येणारे अडथळे दूर करावेत. त्याकरिता व्यक्तिची क्षमता, पात्रता व कौशल्य वाढेल असे पाहावे. हितसंघर्ष टाळण्याकरिता शासनाने हस्तक्षेप करावा. व्यक्तीपेक्षा समाज व्यापक असल्याने समाजहित साध्य केले तर व्यक्तीहित सहज साध्य होते असे समाजवादाचे वैचारिक अधिष्ठान आहे.

**समाजवादाची प्रमुख तत्वे :-**

समाजवाद या तत्वप्रणालीची प्रमुख तत्वे पूढील प्रमाणे मांडता येतील.

**१) सामाजिक हितास महत्व :-**

समाजवादी विचारधारा व्यक्ती व व्यक्तीहीत यापेक्षा समाज व सामाजिक हित यास अधिक प्राधान्य देते. सामाजिक हितापुढे व्यक्तिगत हितास गौण स्थान घ्यावे ही समाजवादाची धारणश आहे.

**२) भांडवलशाहीस विरोध**

समाजवादी तत्वप्रणाली भांडवलशाही विरोधी आहे. भांडवलशाहीत श्रमिकांना त्यांच्या श्रमाच्या योग्य मोबदला मिळत नाही. भांडवलदारवर्ग सांपत्तिक सभेच्या

बळावर बहुसंख्य श्रमिकांचे शोषण करतो. श्रमिकांना न्याय्य मोबदला दिला जात नाही. त्यामुळे भांडवलशाही नष्ट करणे हे समाजवादाचे प्रधान उद्दिष्ट आहे.

**३) अनिर्बंध आर्थिक स्पर्धेस विरोध :-**

भांडवलशाही व्यवस्था मुक्त अर्थव्यवस्था व अनिर्बंध आर्थिक सभेस प्राधान्य व प्रोतसहन देते. अशा पद्धतीच्या प्रक्रियांना समाजवाद विरोध करतो. यादृष्टीने अनिर्बंध स्पर्धा नष्ट करणे हा समाजवादाचा एक महत्वाचा हेतू ठरतो. समाजवाद्यांच्या मते यामुळे आर्थिक तेजी मंदीचे अरिष्ठ ही टळते. बेकारी व रोजगार अनिश्चितताही संपते.

**४) विषमतेस विरोध :-**

समाजवाद समस्येच्या तत्वास विशेषत: आर्थिक समतेस प्राधान्य देतो. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये संपत्तीचे समाजात होणारे विषम वितरण व त्यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता सामाजिक न्याय प्रस्थापनेस अडथळा ठरतो. दुर्बल घटकास विकासाची समान संधी मिळत नाही. त्यामुळे समाजवाद प्रत्येक व्यक्तीस विकासाची समान संधी मिळावी याकरिता प्रयत्नशील राहतो. त्याकरीता आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता समाजवाद प्राधान्य देतो. त्याकरिता समाजवाद संपत्तीचे सामाजिकरण, आर्थिक नियोजन इत्यादी मार्गाचा आग्रह धरतात.

**५) संपत्तीचे सामाजिकरण –**

समाजवाद शोषन व्यवस्थेचे निर्मूलन करण्याकरिता खाजगी संपत्तीचा हक्क नाकारणे आवायक मानतात. संपत्ती उत्पादन साधनावर समाजाची सामूदायकि मालकी प्रस्थापित होणे समाजवादास आवश्यक आहे. याकरिता समाजवाद उत्पादन प्रक्रियेवर समाजाचे नियंत्रण प्रस्थापित करून ‘ना नफा ना तोटा’ या तत्वावर समाजोपयोगी व जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनास अग्रक्रम दिला जातो. याकरिता समाजवाद संपत्तीच्या उत्पादन साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित करताना राज्य नियंत्रण, राष्ट्रीयकरण, सहकार इत्यादी साधनांचा आग्रह धरतो.

**६) प्रतिनिधिक तत्वाचा स्वीकार –**

लोकाही शासन व्यवस्थेतील प्रतिनिधित्वाचे तत्व समाजवाद राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ही लागू करण्याचा आग्रह धरतात.

**७) राज्याचे कार्यक्षेत्र**

समाजवाद राज्यसंस्थेकडे व्यापक अधिकार क्षेत्र म्हणून पाहतो. समाजवादी विचारधारा राज्याच्या निर्हस्तक्षेप नीतीचा राज्याने त्याग करून समाजहितासाठी मानवी जीवन क्षेत्राच्या प्रत्येक क्षेत्रात हस्तक्षेप करावा. राज्याने आपले कार्यक्षेत्र केवळ शांतता, कायदा व सुव्यवस्था व संरक्षण या पुरते मर्यादित ठेवू नये. राज्याने सर्वांगीण विकासात येणारे अडथळे दूर करावेत यामुळे समाजवादी व्यवस्थेत राज्याचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक ठरते.

**समाजवादाचा विकास –**

समाजवाद ही विचारधारा आधूनिक समाजात १७५० मध्ये इंग्लंडमध्ये प्रथम उद्यास आली. त्यानंतर इतर युरोपिय देशांमध्ये ही विचारधारा प्रसारात आली. औद्योगिक क्रांतीने जी नवी भांडवलशाही अर्थ व समाजव्यवस्था निर्माण केली त्यात श्रमिक वर्गाची दुरावस्था झाली होती. तो वर्ग आर्थिकदृष्ट्या विपन्नवस्थेत होता. दारिद्रय, दु:ख, दैन्य, अज्ञान, अनारोग्य, उपासमार इत्यादिंनी पिचला होता. या विपन्नावस्थेतून समाजास कसे सावरावे यावर विचारमंथन चालू झाले. यासंदर्भात सरंजामशाही व भांडवलशाही अवस्थेत पदार्पण करणाऱ्या संक्रमण काळातील समाजात सर्वप्रथम लिस्मॉंडी यांनी भांडवलशाहीतील व्यक्तिवाद विरोधी विचारांची मांडणी केली. वास्तविक लिस्मॉंडी हे समाजवादी विचारधारेचे नव्हते तरीही त्यांच्या विचारांचा प्रभाव टनेंट सायमन पासून कार्लमार्क्स पर्यंत सर्व समाजवादी विचारवंतावर आढळून येतो.

१८५० पर्यंत सेंट सायमन व त्याच्या अनुयायांनी मांडलेला ख्रिश्चन समाजवाद प्रभावी होता. त्यानंतर रॉबर्ट ओवेन, चार्ल्स, फोरिमरल लुई ब्लँक इत्यादींनी स्वप्नाळू व सहकारी समाजवादाची मांडणी केली. या समाजवादामध्ये आदर्शवादावर अधिक भर होतो. त्यामुळेच त्यास स्वप्नाळू समाजवाद असे संबोधन वापरले जाते. त्यानंतर सेंय प्रधाँ यांनी अराजकवाद व समाजवाद यात समन्वय साधणारी विचारधार प्रस्तूत केली. तर रॉड बर्टल व लॅसाली यांनी राज्यनियंत्रित समाजवाद व राज्यसमाजवादी विचारधारा मांडळी. या सर्व विचारधारांना 'मार्क्सपूर्व समाजवाद' असे संबोधले जाते.

कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एजंल्स यांनी शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली. त्यालाच साम्यवाद, मार्क्सवाद असे ही संबोधले जाते. कार्ल मार्क्सच्या नंतर नव-मार्क्सवाद, लोकशाही समाजवाद, लेनिनवाद, स्टॅलिनवाद, माओवाद, फेवियन, समाजवाद, श्रमिक संघवाद, व्यवसाय संघवाद, लॅटिन अमेरिकन समाजवाद इत्यादी समाजवादी प्रवाह विकसित झालेले दिसतात.

## २.३ मार्क्सवाद

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात कार्ल मार्क्सने समाजवादास नवे वळण देणारे क्रांतीकारक विचार प्रस्तूत केले. १८४१ साली लंडन येथे युरोप मधील सर्व साम्यवादी गटांनी एकत्रित येऊन विचारांची देवाण-घेवाण करण्याकरिता 'इंटरनॅशनल कम्यूनिस्ट लिग' ची स्थापना झाली. याचे प्रथम सचिव म्हणून फ्रेडरिक एजंल्स यांची निवड करण्यात आली होती. फ्रेडरिक एजंल्स व कार्लमार्क्स यांनी १८४८ साली 'साम्यवादी जाहीरनामा' प्रसिद्ध करून आपल्या विचारांची गाभा तत्वे प्रस्तूत केली.

काल मार्क्स यांनी आपला समाजवाद विषयक विचार आजपर्यंत मांडल्या गेलेल्या समाजवादी विचारांपेक्षा केले आहेत. हे दर्शविण्याकरिता त्यास 'साम्यवाद' वा 'शास्त्रीय समाजवाद' अशी शब्दरचना केली. साम्यवादी जाहिरनामा, राज्य व संपत्ती, दास कॅपिटल या ग्रंथामधून प्रामुख्याने साम्यवादाची तत्वप्रणाली स्पष्ट होते. कार्ल मार्क्स ने साम्यवादी तत्वज्ञानातील गाभा तत्वे मांडली असल्यामुळे त्यास 'मार्क्सवाद' असे ही संबोधले जाते. कार्ल मार्क्स व इतर समाजवादी विचारप्रवाह विशेत: मार्क्सपूर्व समाजवादी प्रवाह यामद्ये महद अंतर

असल्याचे स्पष्ट होते. मार्क्सपूर्व समाजवादी विचार प्रवाहांनी प्रामुख्याने समाजवादी समाजरचनेचे कल्पनारम्य चित्रण करताना आदर्श समाजव्यस्थेचे केवळ काल्पनिक सिद्धांतन केले होते. त्यांच्या मते, भांडवलशाही व्यवस्थेवर समाज व राज्याचे नियंत्रण प्रस्थापित करून क्रमाक्रमाने समाजवादी समाज प्रस्थापित करता येऊ शकेल. कार्ल मार्क्स ने मात्र या विचारांना नाकारले. मार्क्सच्या मते या पद्धती समाजवादी समाज निर्माण करण्यात असमर्थ आहेत. क्रांतीच्या मार्गानेच हे परिवर्तन साध्य करता येऊ शकते. याकरिता मार्क्सने इतिहासाचा आधार घेत भांडवलशाही मध्ये भविष्यात होणाऱ्या समाजवादी परिवर्तनाचे चित्र रेखाटले. मार्क्सच्या मते, परिवर्तन हा विश्वाचा अटळ नियम असून समाजव्यवस्था व त्यातील अर्थ व्यवस्थेतही परिवर्तन होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे भांडवलशाहीचे परिवर्तन भविष्यात समाजवादी समाजरचनेत होणे अपरिहार्य आहे. या मार्क्सच्या विचार मांडणीमध्ये कल्पनारम्यतेस कोणतेही स्थान नव्हते तर त्यात तर्कसिद्ध व शास्त्रीय मीमांसा होती. म्हणूनच मार्क्सच्या विचारांना 'शास्त्रीय समाजवाद' असे ही संबोधन वापरले जाते.

**मार्क्सवादाची प्रमुख तत्वे –**

मार्क्सवादाची प्रमुख तत्वे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) भौतिक परिस्थितीत मध्यवर्ती स्थान –**

मार्क्सवाद आपल्या तत्वज्ञानात्मक मांडणीमध्ये कल्पनांपेक्षा भौतिक घटकांना मध्यवर्ती स्थान आहे. मार्क्सवादी धारणे प्रमाणे बाह्य भौतिक जगाचा परिणशम मानवाच्या मनावर होतो. नैसर्गिक व सामाजिक वातावरणाच्या अवलोकनातून मानवी मनात अनेक कल्पना व्यक्त होतात. मार्क्सवादी विचारधारे प्रमाणे आपल्या भोवतालचे जग बदलून आपले जीवन सुकर करण्यास मानव या कल्पनांचा उपयोग करून घेतो.

**२) द्वदांत्मक भौतिकवाद –**

Dialectic हा शब्द ग्रीक भोषतील 'डायलॉग' या शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा मूळ अर्थ 'वाद-विवाद' असा होतो. द्वंदवादाची तत्वज्ञानात्मक पातळीवर मांडणी करण्याचे श्रेय हेगेल यांना दिले जाते. कार्ल मार्क्स यांनी हेगेल पासूनच द्वंदात्मक पद्धती स्वीकारली आहे मग हेगेल यांच्या मांडणीतील चिद्वाद नाकारून त्यास भौतिक स्वरूप प्रदान केले आहे. वाद-प्रतिवाद, सुंसंवाद ही समाजातील परिवर्तनाची जी चाल हेगेल यांनी द्वंदवादातून प्रस्तूत केली होती तेवढीच मार्क्सने स्वीकारली व त्यास भौतिकवादाची जोड दिली. त्यामुळेच मार्क्स हेगेल संदर्भात बोलताना म्हणतात, 'माझा गुरू डोक्यावर उलटा उभा होता मी त्यास पायावर उभे केले.'

हेगेलच्या द्वंदवादाच्या पायावर भौतिकवादाची मांडणी करताना मार्क्सने स्पष्ट केले की, 'सामाजिक व आर्थिक परिस्थिती ह्याच्या परस्पर संघर्षातून मानवाचा विकास झाला व आज ही तो होत आहे. प्रत्येक वस्तू गतिमान असून काल परत्वे वस्तूत परिवर्तन होत असते. त्याचाच परिणाम म्हणून समाजाचेही परिवर्तन होते.

सारांश, मार्क्स असे मानतात की, समाजाचा विकास हा भौतिक वस्तूंच्या संघर्षातून होतो. भौतिक जगाच्या विकासाचे टप्पे वाद-प्रतिवाद-संवाद असे आहेत. मानवी जीवनाचा विकास हा गुंतागुंतीच्या व जटिल स्वरुपाच्या प्रक्रियेतून झाला आहे.

**३) ऐतिहासिक भौतिकवाद –**

मार्क्सने द्वंदात्मक भौतिकवादाच्या आधारे ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी केली आहे. मार्क्सच्या मते, आर्थिक व्यवस्था ही समाजाच्या विकासाची दिशा निश्चित करते. इतिहासकालीन घडलेल्या घटनांच्या मुळाशी ‘आर्थिक’ कारण असते. त्या आधारावरच इतिहासाचे मूल्यमापन व्हावयास हवे. उत्पादनाच्या साधनात होणाऱ्या बदलांमुळे इतिहासाचा विकास होतो. अशा पद्धतीने भौतिक परिस्थितीत फरक झाला म्हणजे मानवी इतिहासात बदल घडून येतो. मार्क्सच्या मते, भौतिक जग व भौतिक पदार्थ हेच शाश्वत असतात. अन्न, वस्त्र व निवारा ह्या प्राथमिक गरजांची पुर्तता करणे ही गोष्ट मानवास राजकारण, धर्म व तत्सम घटकांपेक्षा अधिक महत्वाची वाटते. उत्पादनांची पद्धती वाटणी व विनिमय ह्या गोटी समाजाच्या राजकीय सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक विकासाची दिशा निश्चित करतात. संपत्तीची निर्मिती करणे हेच मानवाचे प्रमुख कार्य आहे. संपत्तीच्या वाटणी, उपभोग, विनिमय व निर्मिती इत्यादी पध्दतींमध्ये बदल घडून आला म्हणजे समाजात परिवर्तन होते. ह परिवर्तन आदिम अवस्था, शेती अवस्था, संरजामदारी अवस्था भांडवलशाही अवस्था, कामगारांची हुकूमशाही व साम्यवादी समाज रचना या क्रमाने घडून येईल व साम्यवादी समाजरचना नियोजन इत्यादी मार्गाचा आग्रह धरतात.

**४) संपत्तीचे समाजीकरण –**

समाजवाद शोषण व्यवस्थेचे निर्मूलन करण्याकरिता खाजगी संपत्तीचा हक्क नाकारणे आवायक मानतात. संपत्ती उत्पादन साधनावर समाजाची सामूदायिक मालकी प्रस्थापित होणे. समाजवादास आवश्यक आहे. याकरिता समाजवाद उत्पादन प्रक्रियेवर समाजाचे नियंत्रण प्रस्थापित करून ‘ना नफा ना तोटा’ या तत्वावर समाजोपयोगी व जीवनावायक वस्तूंच्या उत्पादनास अग्रक्रम दिला जातो. याकरिता समाजवाद संपत्तीच्या उत्पादन साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित करताना राज्य नियंत्रण, राष्ट्रीयकरण, सहकार इत्यादी साधनांचा आग्रह धरतो.

**५) प्रतिनिधिक तत्वाचा स्वीकारा –**

लोकशाही शासन व्यवस्थेतील प्रतिनिधित्वाचे तत्व समाजवाद राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ही लागू करण्याचा आग्रह धरतात.

**६) राज्याचे कार्यक्षेत्र –**

समाजवाद राज्य संस्थेकडे व्यापक अधिकार क्षेत्र म्हणून पाहतो. समाजवादी विचारधारा राज्याच्या निर्हस्तक्षेप नीतीचा राज्याने त्याग करून समाजहितासाठी मानवी जीवन क्षेत्राच्या प्रत्येक क्षेत्रात हस्तक्षेप करावा. राज्याने आपले कार्यक्षेत्र केवळ शांतता, कायदा व सुव्यवस्था व संरक्षण या पुरते मर्यादित ठेवू नये. राज्याने सर्वांगीण

विकासात येणारे अडथळे दूर करावेत यामुळे समाजवादी व्यवस्थेत राज्याचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक ठरते.

**समाजवादाचा विकास –**

समाजवाद ही विचारधारा आधूनिक समाजाला १७५० मध्ये इग्लंडमध्ये प्रथम उदयास आली. त्यानंतर इतर यूरोपिय देशांमध्ये ही विचारधारा प्रसारीत झाली. औद्योगिक क्रांतीने जी नवी भांडवलशाही अर्थ व समाजव्यवस्था निर्मार केली त्यात श्रमिक वर्गाची दुरावस्था झाली होती. तो वर्ग आर्थिकदृष्ट्या विपन्नवस्थेत होता. दारिद्रय, दु:ख, दैन्य, अज्ञान, अनारोग्य, उपासमार इत्यादींनी पिचला होता. या विपन्नावस्थेतून समाजास कसे सावरावे यावर विचारमंथन चालू झाले. यासंदर्भात सरंजामशाही व भांडवलशाही अवस्थेत पदार्पण करणाऱ्या संक्रमण काळातील समाजात सर्वप्रथम लिस्माँडी यांनी भांडवलशाहीतील व्यक्तिवाद विरोधी विचारांची मांडणी केली. वास्तविक विस्माँडी हे समाजवादी विचारधारेचे नव्हते तरीही त्यांच्या विचारांचा प्रभाव सेंय जायमन पासून कार्ल मार्क्स पर्यंत सर्व समाजवादी विचारवंतात आढळून येतो.

१८५० पर्यंत सेंय सायमन व त्याच्या अनुयायांनी मांडलेला ख्रिचन समाजवाद प्रभावी होता. त्यानंतर रॉबर्ट ओवेन, चार्ल्स फोरियर, लुई ब्लँक इत्यादींनी स्वप्नाळू व सहकारी समाजवादाची मांडणी केली. या समाजवादामध्ये आदर्शवादावर अधिक भर होता. त्यामुळेच त्यास स्वप्नाळू समाजवाद असे संबोधन वापरले जाते. त्यानंतर सेंट प्रधाँ यांनी अराजकवाद व समाजवाद यात समन्वय साधणारी विचारधारा प्रस्तूत केली. तर रॉड बर्टल व लॅसाली यांनी राज्यनियंत्रित समाजवाद व राज्यसमाजवादी विचारधारा मांडली. या सर्व विचारधारांना 'मार्क्सपूर्व समाजवाद' असे संबोधले जाते.

कार्ल मार्क्स व फ्रेडरिफ एजंल्स यांनी शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली. त्यालाच साम्यवाद, मार्क्सवाद असे ही संबोधले जाते. कार्ल मार्क्सच्या नंतर नव-मार्क्सवाद, लोकशाही समाजवाद, लेनिनवाद, स्टॅलिनवाद, माओवाद, फेवियन, समाजवाद, श्रमिक संघवाद, व्यवसाय संघवाद, लॅटिन अमेरिकन समाजवाद इत्यादी समाजवादी प्रवाह विकसित झालेले दिसतात.

## २.३ मार्क्सवाद

१९ व्या शकतकाच्या उत्तरार्धात कार्लमार्क्सने समाजवादास नवे वळण देणारे क्रांतीकारक विचार प्रस्तूत केले. १८४१ साली लंडन येथे युरोप मधील सर्व साम्यवादी गटांनी एकत्रित येऊन विचारांची देवाण-घेवाण करण्याकरिता 'इंटरनॅशनल कम्यूनिस्ट लिग' ची स्थापना झाली. याचे प्रथम सचिव म्हणून फ्रेडरिक एजंल्स यांची निवड करण्यात आली होती. फ्रेडरिक एजंल्स व कार्लमार्क्स यांनी १८४८ साली 'साम्यवादी जाहीरनामा' प्रसिध्द करून आपल्या विचारांची गाभातत्वे प्रस्तुत केली.

कार्ल मार्क्स यांनी आपला समाजवाद विषयक विचार आजपर्यंत मांडल्या गेलेल्या समाजवादी विचारांपेक्षा वेगळे आहेत हे दर्शविण्याकरिता त्यास 'साम्यवाद' वा 'शास्त्रीय समाजवाद' अशी शब्द रचना केली. साम्यवादी जाहिरनामा, राज्य व संपत्ती, दास कॅपिटल या ग्रंथामधून

प्रामुख्याने साम्यवादाची तत्वप्रणाली स्पष्ट होते. कार्ल मार्क्स ने साम्यवादी तत्वज्ञानातील गाभा तत्वे मांडली असल्यामुळे त्यास 'मार्क्सवाद' असे ही संबोधले जाते. कार्ल मार्क्स व इतर समाजवादी विचारप्रवाह विशेषत: मार्क्सपूर्व समाजवादी प्रवाह यामध्ये महदअंतर असल्याचे स्पष्ट होते. मार्क्सपूर्व समाजवादी विचार प्रवाहांनी प्रामुख्याने समाजवादी हा मानवी विकासाला अंतिम बिंदु असेल. या अवस्थेत 'प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे व प्रत्येकाकडून त्याच्या क्षमते प्रमाणे हे तत्व प्रत्यक्षात येईल व वर्गविहीन, संघर्ष विहीन, राज्यविहीन साम्यवादी समाज प्रत्यक्षात येईल.

### ४) अतिरिक्त मूल्य सिध्दांत

वस्तू मूल्य निश्चितीचा मागणी व पुरवठा सिध्दांत नाकारून मार्क्स श्रमावर आधारित मूल्य सिध्दांताचे समर्थन करतो. मार्क्स रिकार्डोच्या श्रममूल्य सिध्दांताच्या पुढे जाऊन हे स्पष्ट करतो की, 'निर्मित वस्तू किती प्रमाणात उपयोगी आहे त्यानुसार वस्तुमूल्य ठरत असते. निव्वल श्रमाद्वारे वस्तुमूल्य ठरत नाही तर ते तिच्या उपयोगितेच्या आधारावरही निश्चित होत असते. वस्तू प्राप्त करण्यासाठी आपर कोणती किमंत घ्यावयास तयार असतो ह्यालाच मार्क्स विनिमय मूल्य म्हणतात. त्याद्वारेच वस्तूची किमंत ठरत असते. ही वस्तूची किमंत बाजारात त्या वस्तूची होणारी मागणी व तिचा पुरवठा ह्यानुसार बदलत असते. अशा पद्धतीने वस्तूमूल्य व वस्तूची किमंत ह्यामध्ये फरक आहे. वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूवर होणाऱ्या श्रमावरच आधारलेले असते.

कार्ल मार्क्स यांनी कामगारांचे शोषन कसे होते याचे स्पष्टीकरण देण्याकरिता 'अतिरिक्त मूल्य सिध्दांत' मांडला आहे. त्याच्यामते वस्तूचे मूल्य ती वस्तू निर्माण करण्यासाठी कामगाराचे जे श्रम खर्ची पडतात त्यावरून ठरते. परंतु वस्तूचे मूल्य व कामगारास दिला जात असलेला श्रमाचा मोबदला यामध्ये फार मोठी तफावत असते. ही तफावत म्हणजे अतिरिक्त मूल्य किंवा नफा. नफा फक्त भांडवलदार घेतो. त्यात कामगारांना वाटा मिळत नाही. त्यामुळे कामगारास श्रम करूनही अल्प मोबदला मिळतो व श्रम न करणाऱ्या भांडवलदारास नफा रूपाने सतत संपत्ती प्राप्त होत जाते. त्यामुळे श्रीमंत हा अधिक श्रीमतं होत जाते व गरीब अधिकच गरीब होत जातो. श्रम करणारा कामगार उपासमार, रोगराई, अज्ञान, अन्याय यांनी पिडला जातो. तर श्रमाचे शोषण करणारा भांडवलदार वर्ग सुखासीन चैनी जीवन जगतो.

एकंदरीत, मार्क्सच्या मते भांडवलदारांनी असे अतिरिक्त मूल्य स्वत:च हडप करणे हा अन्याय आहे. गुलामगिरीपेक्षा ही प्रथा फारसी वेगळी नाही. श्रमिकांजवळ श्रम ही एकच वस्तू असते जी श्रमिक विकतात व भांडवलदारांना अतिरिक्त नफा गिळकृत करण्याची संधी देतात. त्यामुळेच कामगारांनी आपले संघटन करून भांडवलदारां विरोधात लढा उभारला पाहिजे.

### ५) वर्ग संघर्ष –

'मानवी समाजाचा इतिहास व वर्गसंघर्षाचा इतिहास होय' हे मार्क्सचे प्रसिद्ध विधान आहे. मार्क्सच्या मते, मानवी समाजाच्या प्रत्येक टप्प्यावर समाजात आहे रे व नाही रे या दोन वर्गामध्ये हितसंबंधाचा संघर्ष निरंतर चालत आला आहे. वर्गसंघर्षाचे कारण उत्पादन साधनांची खाजगी मालकी हेच आहे. आजही भांडवलदारांकडे उत्पादनाची

साधने असतात. मजुरंची वाढती बेकारी व मजुरांचे असंघटन याचा गैर फायदा घेऊन धनिक वर्ग मजुरांची पिळवणूक करतो. त्यातून कामगारांचे शोषण होते. या शोषराच्या विरोधात कामगार वर्ग क्रांती करतो व संपूर्ण सत्ता आपल्या हाती घेऊन साम्यवादी समाज रचनेच्या मार्गातील अडथळे दूर करतो अशी मार्क्स यांची मांडणी आहे.

**६) भांडवलशाहीचा विनाश –**

मार्क्सची अशी धारणा होती की, प्रत्येक वस्तू व व्यवस्थेत आत्मनाशाची बीजे असतात. भांडवलशाहीत भांडवलदार नफा, व्याज, खंड व भाडे या मार्गाने आपल्या हाती संपत्तीचे केंद्रिकरण करतो. तीच संपत्ती परत उद्योग व व्यवसायात मूंनवतो कालांतराने भांडवलदारांची मक्तेदारी प्रस्थापित होते. उत्पादनाकरिता भांडवलदार नवे तंत्र, यंत्रे याचा मोठया प्रमाणावर उपयोग करतात, कामगार कपात करतात. त्यामुळे कामगार वर्गात बेकारी वाढते. कामगार वर्गाचे उत्पन्न कमी-कमी होत जाते व दुसऱ्या बाजुस यांत्रिकी करणामुळे उत्पादन वाढते. कामगार वर्गाची खरेदी शक्ती कमी झाल्यामुळे वाढीव उत्पादनास मागणी राहत नाही. ते पडून राहिल्याने भांडवलदारांना उत्पादन थांबविणे भाग पडते. आर्थिक मंदी व आरिष्टये यांनी भांडवलशाही जर्जर होऊन कोलमडून पडते. तिचा विनाश होतो. अशी मार्क्सवादाची धारणा आहे.

**७) साम्यवादी समाजरचना व राज्याचा विलय –**

मार्क्स साम्यवादी समाजरचनेस मानवी विकासाचा अंतिम बिंदु मानतो तर राज्यास शोषितांच शोषन करण्याच हत्यार म्हणून प्रस्तुत करतो. वर्ग संघर्षाच्या एकूण प्रक्रियेमध्ये भांडवलदार व कामगार वर्ग यातील संघर्ष ज्यावेळी तीव्र होतो त्यावेळी राज्ययंत्रणा ही भांडवलदार वर्गाच्या बाजूने उभी असते. कामगार वर्गाच्या संघर्षात विजय झाल्यानंतर कामगारवर्ग संपूर्ण राज्यव्यवस्था ताब्यात घेतो यालाच मार्क्स कामगारांची हुकूमशाही असे संबोधन वापरतात. कामगारांची हुकूमशाही समाजवादी समाजरचना स्थापित करण्याच्या मार्गातील सर्व अडथळे दूर करते. या कालखंडास मार्क्स संक्रमणकाळ असे संबोधतात. साम्यवादी समाज रचना स्थापित झाल्यानंतर खाजगी संपत्ती नष्ट होते. खाजगी संपत्तीचे निर्मूलन झाल्यामुळे वर्गरचना मोडीत निघते. वर्ग रचनाच नसल्यामुळे वर्ग संघर्ष असत्तित्वात राहत नाही. वर्ग संघर्ष नसल्यामुळे पोलिस, तुरूंग या सारख्या राज्याच्या यंत्रणाची आवश्यकता राहत नाही व हळूहळू राज्य ‘सुकलेल्या फुलांप्रमाणे गळून जाते’.

अशा प्रकारे भांडवलशाहीचा अंत करून स्वयंस्फूर्त श्रम, परस्पर सहकार्य व सेवाभाव ह्यांनी युक्त असलेला नवसमाज म्हणजेच राज्यविहीन व वर्गविहीन समाज होय. अशा नव समाजाची निर्मिती करणे हेच साम्यवादाचे अंतिम ध्येय होय.

## २.४ लोकशाही समाजवाद

लोकशाही समाजवाद हा समाजवादातील आधूनिक व महत्वाचा प्रकार होय. लोकशाही समाजवादाची वैचारीक बैठक नव आदर्शवाद व नैतिक समाजवाद यावर आधारलेली आहे. लोकशाही समाजवाद कोणत्याही एका ग्रंथातून मांडला गेलेला नाही. इग्लंड व इतर यूरोपिय देशांच्या मजूरपक्षांचे अथवा समाजवादी पक्षांचे जाहीनामे, विचारवंताचे लेखन व १९५१

मध्ये फ्रँकफर्ट येथे संपन्न झालेल्या 'आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेस' च्या जाहीरनाम्यातून लोकशाही समाजवादाची मांडणी झालेली आहे.

**लोकशाही समाजवाद उदय व विकास –**

साम्यवादाची मांडणी इग्लंडमध्येच कार्ल मार्क्सने केली. सर्वप्रथम साम्यवादी क्रांती इग्लंडमध्येच घडून येईल असे भाकित मार्क्सने केले होते. मात्र मार्क्सवादाची जहाल तत्वे सौम्य प्रवृत्तीच्या जनतेस मानवली नाहीत. शिवाय इग्लंडमधील संसदीय शासन पध्दतीच्या चौकटीत शांततामय, सनदशीर आणि कायद्याच्या ?????? मार्गाने कामगार वर्गाने आपले हित सुरक्षित ठेवले होते. इग्लंडच्या साम्राज्यामुळे सर्व मार्गाने देशात संपत्ती येत होती. देशात समृध्दी होती व त्यातच इग्लंडमधील भांडवलदार वर्गाने देखील बदलल्या परिस्थितीशी जुळवून घेऊन कामगारांना व योग्य वेतन व सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध करून दिल्या होत्या. या सर्व परिस्थितीमुळे इंग्लडमधला कामगार वर्ग सुखी, समाधानी व संपन्न असल्यामुळे तो संघटित असूनही क्रांतिवादी न बनता लोकशाही समाजवादाचा पुरस्कर्ता बनला. रॉबर्ट ओवेन, आर.एच. टोनी, जी.डी.एच कोल, पिॲट्रिस व सिडने वेब, जॉर्ड बर्नाड शॉ, प्रो. लास्की यांनी लोकशाही समाजवादाचे प्रभावी समर्थन केले. हे सर्व विचारवंत जागकि किर्तीचे होते त्यामुळे त्यांचा प्रभाव इंग्लंडमधील जनतेवर पडने ही स्वाभाविक होते. यातील काही विचारवंत हे राजकीय पक्षाशी निगडीत होते तर काही राजकीय मुत्सदी होते. काही सदस्यांचा मजूर पक्षाशी थेट संबंध होता. त्याचाच परिणाम म्हणून मजूर पक्षाने त्यांच्या धोरणात्मक दस्ताऐवजात समाजवादी कार्यक्रमाचा समावेश केला, व सत्तास्थापन झाल्यानंतर त्याची अमंलबजावणी करण्याचा ही प्रामाणिक प्रयत्न केला. या सर्वाचा परिपाक म्हणून इंग्लंडमध्ये लोकशाही समाजवादी विचार धारेचा उदय व विकास घडून आला. त्यानंतर युरोपमधील अन्य राज्यांमध्ये व अमेरिकेतही लोकशाही समाजवादाची विचारधारा लोकप्रिय झाली. इंग्लंडच्या वसाहती जगभर पसरलेल्या होत्या. दुसऱ्या महायुद्धानंतर या वसाहती राज्यांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर त्यांनीही 'लोकशाही समाजवादाचाच स्वीकार केला. भारत, इजिप्त, चिली, टांझानिया, घाना ही याची काही महत्वाची उदाहरणे होत. या देशांनी आपआपल्या सामाजिक परिस्थितीनुसार लोकशाही समाजवादाचे प्रतिमान अंगिकृत केले.

**लोकशाही समाजवादाची मुलभूत तत्वे –**

**लोकशाही समाजवादाची मुलभूत तत्वे पुढील प्रमाणे सांगता येतील**

**१) लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार –**

लोकशाही समाजवाद, समाजवाद प्रस्थापनेचे उद्दिष्ट पूर्ती करीता लोकशाही व्यवस्थेचे साधन म्हणून वापर करण्याचा आग्रह धरतात. त्याच्या मते स्वातंत्र्याशिवाय म्हणजेच लोकशाही शिवाय समाजवाद साध्य होऊ शकणार नाही. मात्र लोकशाही व्यवस्था समाजात व्यापक व्हायला हवी. राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या उत्पादन व वितरण क्षेत्रात लोकशाही मूल्यांची प्रस्थापना व्हावयास हवी. यासाठी लोकशाही समाजवाद आग्रही असतो.

### २) सामाजिक प्रबोधनास महत्वाचे स्थान –

लोकशाही समाजवादाची अशी धारणा आहे की, समाजवादी समाजरचना निर्मिती ही एक नैतिक बाब आहे. त्याकरिता समाजाचे समाजवादी प्रबोधन होणे अत्यंत आवश्यक आहे. लोकशाही समाजवादी विचारवंताच्या मते केवळ राजकीय लोकशाहीचा, निवडणुकांचा व राजकीय पक्ष स्थापन करण्याचा मार्ग नवसमाज निर्मिती करीता पुरेसा नाही. त्याकरिता जनमताचा, जनआंदोलनाचा व पाठपुराव्याचा दबाव शासनावर सतत राहणे आवश्यक आहे. हा दबाव निर्माण करण्याकरिता जनतेस समाजवादी विचारांचे दर्शन घडविण्याकरिता लोकशाही समाजवाद सामाजिक प्रबोधनाची गरज प्रतिपादन करतो.

### ३) सामाजिक हितास प्राधान्य –

भांडवलशाही व्यवस्थेने अत्यंतिक व्यक्तिवाराचा पुरस्कार केला होता. त्यामुळे व्यक्तिहिताच्या नावाखाली एकूण समाजाची मोठया प्रमाणात वाताहात होत होती काही व्यक्तींच्या स्वाथी प्रवृत्तीने एकूण समाजाचे हित धोक्यात येत होते. त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर समाजहिताच्या दृष्टीने काही बंधने, मर्यादा असणे यास लोकशाही समाजवाद मान्यता देतो. अर्थात लोकशाही समाजवाद यामाध्यामतून व्यक्तिस्वातंत्र्याचा विरोध करत नाहीत तर व्यक्तिहितापेक्षा सामाजिक व राष्ट्रीय हित यास प्राधान्य देतात. लोकशाही समाजवाद व्यक्तिस्वातंत्र्य मर्यादित करण्याची जबाबदारी राज्यावर सोपवतात. त्यामुळे जनकल्याण कार्यक्रम राबवितांना व्यक्त त्यात अडथळे उत्पन्न करणार नाहीत व सबलांबरोबच दुर्बलांचेही कल्याण साधले जाऊ शकेल अशी लोकशाही समाजवादाची धारणा आहे.

### ४) भांडवलशाही अर्थव्यस्थेस विरोध –

भांडवलशाही व्यस्थेची प्रमुख तत्वे म्हणून मुक स्पर्धेस, मक्तेदारीस, कामगार शोषणास, संपत्तीच्या भांडवलदारांच्या हाती केंद्रिकरणास व आर्थिक विषमता निर्मितीस संधी देतात. शिवाय भांडवलदार वर्ग आपला नफा मोठया प्रमाणावर मिळावा म्हणून समाजहितास अपायकारक वस्तू व सेवांचेही उत्पादन करतात. भांडवलशाहीमुळे सामाजिक अन्याय, वर्ग संघर्ष, अशांतता व असंतोष यांचे वातावरण समाजात निर्माण होते त्यामुळे एकूण समाजस्वास्थ्य धोक्यात येते.

भांडवलशाही व्यवस्थेतील या दोषांमुळे लोकशाही समाजवाद भांडवलशाही व्यवस्थेचे प्रतिमान नाकारतो. भांडवलशाहीस क्रांतीच्या मार्गाने नष्ट करण्याऐवजी लोकशाहीतील शांततामय व सनदशीर मार्गाने समाजवादी योजना अंमलात आणून भांडवलशाहीचे विसर्जन करणे इष्ट आहे. याकरिता समाजवादी कार्यक्रमामध्ये बेकारी निर्मूलन, वाढीव उत्पादन, गरीबांचे जीवनमान उंचावणे, त्यांना सामाजिक सुरक्षा प्राप्त करून देणे, संपत्तीचे समाजात न्याय्य वितरण करणे यासारख्या योजनांचा समावेश लोकशाही समाजवादात केला जातो.

**५) समाजसेवी राज्याची मांडणी –**

'राज्य हे श्रमिकांचे शोषण करण्याचे एक हत्यार आहे ही मार्क्स यांची मांडणी लोकशाही समाजवादास मान्य नाही. लोकशाही समाजवाद राज्यास इष्ट आपत्ती असेही संबोधन वापरत नाहीत. लोकशाही समाजवादाच्या दृष्टीने राज्य हे लोक कल्याणकारी व समाज सेवा सेवा उपलब्द करणारी संघटना आहे असे मानतात. समाजाचा विश्वस्त म्हणून राज्य शांतता व सूव्यवस्था संरक्षण या बरोबरच सामाजिक परिवर्तन व आर्थिक विकास साध्य करणारे उपयुक्त साधन आहे असे समजतात. एकदंरीत लोकशाही समाजवादाने कल्याणकारी राज्याची संकल्पना अधिक व्यवहार्य बनवली आहे असे म्हणता येईल.

**६) वर्गसहकार्याची भूमिका –**

'मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे हे मार्क्सवादाचे मूलभूत तत्व लोकशाही समाजवादास मान्य नाही. तर लोकशाही समाजवाद वर्ग सहकाराचा आग्रह धरतात. सर्वच वर्गांनी एकमेकांना सहाय्य करून राष्ट्रीय उत्पादनात वाढ घडवून आणावी व या वाढीव राष्ट्रीय संपत्तीचे न्याय्य वितरण समाजात होण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी असे लोकशाही समाजवादी सूचवितात. लोकशाही समाजवाद साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित करावी, उत्पादन प्रक्रियेवर सामाजिक नियंत्रण असावे. 'ना नफा ना तोटा' या पध्दतीने उत्पादन व्हावे, उत्पादन समाज उपयुक्त असावे यासाठी आग्रह धरतो. नफा ही संकल्पना नष्ट केली की समाजात न्याय्य संपत्ती वितरण शक्य होईल व सामाजिक न्याय प्रस्थापित होईल असा विश्वास लोकशाही समाजवादास वाटतो.

**७) कामगारांच्या हुकूमशाहीस विरोध –**

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी करताना मानवी विकासाचा अंतिम बिंदु म्हणून साम्यवादी समातर रचनेची कल्पना मांडली होती. साम्यवादी समाजरचना प्रत्यक्षात आणण्यासाठी भांडवलशाहीच्या विनाशानंतर कामगारवर्गाची हुकूमशाही योजना मांडली होती. त्यास मार्क्स साम्यवादी समाजरचना स्थापित करण्याचा संक्रमण काळ असे संबोधले होते. यास लोकशाही समाजवाद मात्र मान्यता देत नाही. त्याऐवजी लोकशाही समाजवाद असा पर्याय सुचवतात की, समाजाने जागृतपणे नवसमाज निर्मिती प्रक्रियेत सहभागी व्हावे व नव्या व्यवस्थेत सर्व समाजच सत्ताधारी असेल. राज्याचे अथवा राजकीय सभेचे स्वरूप वर्गीय असणार नाही.

**८) मर्यादित स्वरूपात राष्ट्रीयकरणाचा स्वीकार –**

मार्क्सवाद खाजगी संपत्तीची कल्पना त्याज्य ठरवून साधन संपत्तीच्या संपूर्ण राष्ट्रीयकरणाची कल्पना मांडतात. ही कल्पना ही लोकशाही समाजवादास मान्य नाही. तर लोकशाही समाजवादाच्या मते, संपत्तीचे केंद्रिकरण व त्यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता टाळण्याकरिता महत्वाचे मूलभूत उद्योगधंदे व सेवा यांचेच केवळ राष्ट्रीयकरण व्हावे व अन्य उद्योगधंद्यावर फक्त समाजहिता करीता राज्याचे नियंत्रण असावे. या व्यवस्थेमुळे कामगारांचे शोषण ही थांबेल व उत्पादन आणि ग्राहक

यांच्या सहकारी संस्थाही निर्माण करणे राज्य होईल. एकंदरीत लोकशाही समाजवाद मर्यादित प्रमाणात राष्ट्रीय करणाच्या तत्वास मान्यता देतात.

**९) मर्यादित स्वरूपात खाजगी संपत्तीचे तत्व मान्य –**

लोकशाही समाजवाद व्यक्तीच्या खाजगी संपत्तीस मर्यादित स्वरूपात मान्यता देतांना दिसतात. लोकशाही समाजवाद व्यक्तीच्या भौतिक विकासाकरीता मर्यादित प्रमाणात समाजहितास धक्का न लावता संपत्तीचा अधिकार असावा अशी मांडणी करतात. लोकशाही समाजवादाच्या मत, व्यक्तीचे खाजगी घर, शेती, व्यवसाय व उद्योग असावेत. मात्र इतरांचे शोषण करण्याची त्यास मुभा नसावी. सारांश, व्यक्तीस एवढीही खाजगी संपत्ती संग्रही करण्याचा अधिकार असू नये की ज्यातून इतरांचे जो शोषण करू शकेल यावर लोकशाही समाजवादाचा कटाक्ष दिसतो.

**१०) आर्थिक नियोजनाचा स्वीकार –**

लोकशाही समाजवादी आर्थिक नियोजन या तत्वास मान्यता देतात. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याकरिता व राष्ट्रीय विकासासाठी लोकशाही समाजवादी आर्थिक नियोजनाचा स्वीकार आवश्यक असल्याचे मान्य करतात. लोकशाही समाजवादाची अशी धारणा आहे की, नियोजनबद्ध आर्थिक विकासामुळे लोकांचे जीवनमान उंचावता येईल, सर्वांना व्यवसाय-काम प्राप्त करून देता येईल. यामाध्यमातून न्याय व समता समाजात स्थापित होईल. लोकशाही समाजवादी आर्थिक नियोजनाची शासकीय वा केंद्रात असण्याऐवजी ते उद्योग – घटक स्तरावर विकेंद्रीत स्वरूपाचे असेल. एकंदरीत आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण लोकशाही समाजवाद्यांना अपेक्षित आहे. तसेच या नियोजन प्रक्रियेत जनेतचा उस्फूर्त सहभाग व सहकार्य असावे अशीही कल्पना त्यात अंतर्भूत आहे.

**११) समतेच्या तत्वास मान्यता –**

लोकशाही समाजवाद समता तत्वाच्या दृष्टीने अधिक वास्तवादी दृष्टीकोन स्वीकारतात. परिपूर्ण स्वरूपाची समता प्रस्थापित करणे शक्य नाही. तसा आग्रह धरणे आवायक आहे याची जाणीव लोकशाही समाजवाल्यांकडे प्रकर्षाने आढळते. लोकशाही समाजवादी आर्थिक समतेच्या तत्वास प्राधान्य देतात. समाजामध्ये टोकाची आर्थिक विषमता निर्माण होऊ नये व श्रीमंत व गरीब ही दरी अधिक रूंदावू नये यासाठी राज्याने सतत खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे लोकशाही समाजवाद स्पष्ट करतो. राज्याने प्रत्येक व्यक्तीस आर्थिक न्याय देण्याचा प्रयत्न करावा, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना त्यांच्या कल्याणाकरिता सर्व प्रकारचे ???? करावे यासाठी लोकशाही समाजवाद आग्रही असतो.

लोकशाही समाजवादाच्या दृष्टीने विकासाची समान संधी सर्वांना प्राप्त होणे आवश्यक आहे. याकरिता समाजात समता व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने शासनाने खाजगी उद्योगांच्या समाजविघातक कृतीवर नियंत्रण ठेवण्याचा आग्रह लोकशाही समाजवाद धरतो. लोकशाही समाजवाद समतेच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने

कायदेविषयक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, प्रादेशिक व वांशिक या सर्व प्रकारचे भेद नष्ट करण्याचा ही विचार मांडतात.

**१२) मानवतावादी राष्ट्रवाद –**

लोकशाही समाजवादास आक्रमक व संकूचित राष्ट्रवाद मान्य नाही. लोकशाही समाजवाद मानवतावादी राष्ट्रवादाचा पुरस्कार करतात. लोकशाही समाजवादाच्या मत राष्ट्रा-राष्ट्रात सामाजिक सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक भिन्नता असली तरी सर्व राष्ट्रांनी शांततामय सहजीवन आंतरराष्ट्रीय समाजात निर्माण केले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.

**१३) आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार**

लोकशाही समाजवाद आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य भावनेचा विकास यास जागतिक राजकारणात आवश्यक तत्व म्हणून प्रस्तूत करतात. संपूर्ण मानव समाजाचे कल्याण होणे करिता जागतिक स्तरावरील नैसर्गिक साधन संपत्तीचे सर्व राष्ट्रात न्याय्य वितरण व्हावे यासाठी आंतरराष्ट्रीय विकासाची तत्वे स्वीकारून आर्थिकदृष्ट्या दुर्बल राष्ट्रांना त्यांचे राष्ट्रीय उत्पादन व उत्पन्न वाढविण्याकरिता बाध्य केले पाहिजे असे सूचवितात. याकरीता लोकशाही समाजवाद राष्ट्रीय स्वातंत्र्यास मान्यता व महत्व देतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व स्वास्थ निर्माण होऊ शकणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रस्थापने करीता लोकशाही समाजवाद सर्व प्रकारच्या साम्राज्यवादास विरोध करतो.

**लोकशाही समाजवाद मूल्यमापन –**

लोकशाही समाजवाद या संकल्पनेचे गूण-दोष या आधारे लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन करता येईल.

**लोकशाही समाजवादाचे गुण –**

लोकशाही समाजवादाच्या जमेच्या बाजू वा गूण पुढील सांगता येतील.

**१) मानवी व्यक्तिमत्वास प्रतिष्ठा –**

लोकशाही समाजवादाचा महत्वाचा गूण म्हणजे लोकशाही समाजवाद मानवी व्यक्तिमत्वास प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी तत्व प्रणाली आहे. लोकशाही समाजवाद मानवी व्यक्तिमत्वास जी प्रतिष्ठा प्रदान करतो तशी प्रतिष्ठा भांडवलशाही प्रधान लोकशाही व साम्यवादी व्यवस्थेत ही प्राप्त होत नाही.

**२) वास्तविक व्यक्तिस्वातंत्र्यास मान्यता –**

व्यक्तिवादी विचारधारेत आत्यंतिक व्यक्तिवादाचा आग्रह धरला जातो तर साम्यवादी विचारधारा समाजहिताच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्य चिरडते असा अनुभव सार्वत्रिक होता. या पार्श्वभूमीवर लोकशाही समाजवाद व्यक्तिस मर्यादित आर्थिक व राजकीय हक्क व परिपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक अधिकार प्राप्त करून देतो.

### ३) समाजहितास प्राधान्य –

लोकशाही समाजवाद व्यक्तिहिन व समाजहित यातील भेद मान्य करून समाजहितास प्राधान्य देतो. लोकशाही समाज वादाची अशी धारणा आहे कि समाजातील सर्वांचे हित हे एका व्यक्तिच्या हितापेक्षा निश्चितच महत्वाचे आहे त्यामुळे समाजहितास प्राधान्य घ्यावयास हवे. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने लोकशाही समाजवादाचे 'सामाजिक हित प्राप्ती' हे मूल्य महत्वाचे ठरले व लोकप्रिय झाले.

### ४) समता तत्वास प्राधान्य –

समता विशेषत: आर्थिक समतेच्या मूल्य प्रस्थापनेस लोकशाही समाजवादात सर्वश्रेष्ठत्व देण्यात आलेले आहे. त्याची प्रस्थापना करताना स्वातंत्र्य देखील जपावयाचे आहे. समता व स्वातंत्र्य यांचा सूयोग्य समन्वय लोकशाही समाजवादी विचारप्रणालीत घातला गेला.

### ५) भांडवलशाहीचे दोष दूर करण्याचा प्रयत्न –

लोकशाही समाजवादाने आर्थिक व नैतिक शोषण, संपत्तीचे केंद्रिकरण, गळे कापू स्पर्धा, मक्तेदारी, अन्याय, अतिरिक्त उत्पादन, तेजीमंदीचे दुष्ट चक्र व जाहीरातबाजीतील फसवणूक व संपत्तीचा अपव्यय हे दोष दूर करून जनसामान्यांना सुरक्षित, स्वस्थ्य व समाधानी जीवनमान लोकशाही समाजवादाने प्राप्त करून दिले.

### ६) मालमत्तेचा समाज उत्थानाकरिता विनियोग –

भांडवलशाहीतील ही परान्तपुष्ठता टाळण्याकरिता लोकशाही समाजवादात मर्यादित प्रमाणात खाजगी मालमत्तेचा हक्क दिला जातो. धनिक वर्गाकडील अतिरिक्त संपत्ती कायदेशीर मार्गाने सुधारित चढत्या श्रेणीचे कर श्रीमंतावर बसवून त्या करांचे उत्पन्न शासकीय लोककल्याणकारी योजना राबविण्याकरिता वापरावे असे लोकशाही समाजवाद सूचवितो. यामुळे समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांचे उत्थापन करणे शक्य झाले. सर्वांना सामाजिक-आर्थिक न्याय सनदशीर व शांततामय मार्गाने प्राप्त करणे शक्य झाले. त्यामुळे लोकशाही समाजवाद सर्वकरात लोकप्रिय झाला.

### ७) साधनशूचिता –

लोकशाही समाजवादास रक्तरंजित क्रांती मान्य नाही. समाजवाद अंहिसक, शांततामय व लोकशाहीच्या सनदशीर मार्गाने प्रस्थापित करण्याचे ध्येय आहे. उच्च व उदात्त ध्येय प्राप्तीची साधने ही तितकीच शुध्द असली पाहिजेत अशी नैतिक भूमिका या लोकशाही समाजवादाने स्वीकारली. त्यामुळेच 'मतपेटी द्वारा समाजपरिवर्तन' लोकांनी स्वीकारले.

## लोकशाही समाजवादाचे दोष –

लोकशाही समाजवादातील दोषांची मांडणी पुढील प्रमाणे केली जाते.

**१) सर्वकष व्यवस्थेस प्रोत्साहन –**

लोकशाही समाजवादावर टिका करतांना टिकाकार सर्वकष व्यवस्था निर्माण होण्यास लोकशाही समाजवादाची तत्वे पूरक ठरतील अशी भीती व्यक्त करतात. टिकाकारांच्या मते 'समाज कल्याणाच्या नावाखाली प्रशासनकीय अधिकारी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा टाकतात. व्यक्तिस्वातंत्र्य व शासकीय हस्तक्षेप यातील सीमारेषा हळूहळू पूसट होत जाते. सर्वत्र शासकीय नियंणि प्रस्थापित होऊन सर्वकष व्यवस्था समाजात मागील दाराने प्रवेश करते.

**२) उत्पादन वाढीस मर्यादा –**

लोकशाही समाजवाद उद्योगधंद्याच्या राष्ट्रीयकरण व शासकीय नियंत्रणास उत्तेजन देतो. लोकशाही समाजवाद आर्थिक क्षेत्रात उत्पादनाबरोबरच वितरणावरही नियंत्रण प्रस्थापित होते. टिकाकार म्हणतात. कुशल व कार्यक्षम कामगार तसेच आळशी व अकुशल कामगार यांना एकाच मापाने मोजले जाते. त्यामुळे कार्यक्षम कामगारातील उद्यमशीलता हळूहळू घसरणीस लागते. उत्पादन घसरते. सार्वजनिक उद्योग प्रत्यक्षात कुणाच्याही आस्थेचा राहत नाही. बेशिस्त, अकार्यक्षमता व बेजाबदार प्रवृत्ती वाढीस लागते. त्यातच मजूर संघटनांची अरेरावी वाढते. एका बाजूस शासन नियंत्रण व दुसऱ्या बाजूस मजुरांची उदासिनता व सुखासिनता या दुहेरी संकटात उद्योग-व्यवस्थापन सापडत उद्योग क्षेत्रात अशांतता, असुरक्षितता व अस्थिरता निर्माण होते व त्याचा अनिष्ट परिणाम राष्ट्रीय उत्पन्नावर होतो.

**३) अकार्यक्षमतेस आमंत्रण**

राष्ट्रीयकरण व औद्योगिक क्षेत्रावर शासकीय नियंत्रणे बसविल्यामुळे प्रत्येक गोष्ट शासनाने करावी ही भूमिका निर्माण होऊन उद्योगाचे व्यवस्थापन व कामगार उदासीन बनतात. परिणामत: औद्योगिक क्षेत्रात अकार्यक्षमता वाढत जाते. कारखान्यातील उत्पादकता घसरते, खर्च वाढतो, उत्पादन क्षेत्रात सार्वजनिक उद्योगांची मक्तेदारी वाढल्यामुळे स्पर्धा संपते. स्पर्धाच अस्त्तिात न राहिल्यामुळे उत्पादनाच्या संख्यात्मक बाजूस महत्व येते त्यामुळे उत्पादनातील गुणवत्ता व नाविन्यनिर्मिती नष्ट होते.

**४) दफ्तर दिरंगाई व भ्रष्टाचारास वाव –**

उद्योगांचे धोरणात्मक निर्णय शासन घेत नसल्या कारणाने ते लवकर घेतले जात नाहीत. शासकीय यंत्रणेतील दफ्तर दिरंगाईच दोष औद्योगिक क्षेत्रात शिरतो. जे निर्णय खाजगी उद्योगात स्थानिक स्तरावर त्वरीत घेतले जातात त्यासाठी शासकीय आदेशाची दिर्घकाळ वाट पाहावी लागते. त्याचा एकूण दुष्परिणाम उत्पादनावर होतो. त्यातूनच शासकीय यंत्रणेतील लाचलुचपत, भ्रष्टाचार व ???गिरी असे दोष औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करतात. परिणामी सर्व यंत्रणा खिळखिळे होते व देशाची अर्थव्यस्था उध्वस्त होण्याची शक्यता अधिक वाढते.

### ५) व्यक्ती व राष्ट्रीय पारिज्यास हानिकारक –

राष्ट्रीयकरण व नियंत्रने यापुढे जवळ-जवळ प्रत्येक निर्णय शासकीय असल्यामुळे व्यक्तीचा पुढाकार व स्वयंकर्तुत्वास वाव राहत नाही. त्यातच व्यक्तिस्वातंत्र्याचा समाजहिताच्या नावाखाली संकोच केला जातो. सर्वत्र भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशिलेबाजी व पूतणेगिरी यांचे साम्राज्य निर्माण झाल्यानंतर 'भ्रष्टाचार हाच शिष्टाचार' बनतो. व्यक्तिगत चारित्र्याचा ऱ्हास होण्याची रास्यता निर्माण होते व परिणामत: राष्ट्रीय चारित्र्य देखील धोक्यात येते.

### ६) ग्राहक हिताय बाधा –

उत्पादन क्षेत्रातील शासकीय नियंत्रणे व हस्तक्षेपामुळे उत्पादन खर्च वाढतो. सार्वजनिक उद्योगातील संघटित कामगारांच्या मागण्यांची पूर्तता करता करता व्यवस्थापनाच्या नाकीनऊ येतात. उत्पादनाचा वाढता खर्च व घसरते उत्पादन यामुळे उदयोग अडचणीत येतात. नुकसान होऊ नये म्हणून उत्पादनाच्या किमंतीत सतत वाढ केली जाते. उत्पादनातील मक्तेदारीमुळे तेच महाग उत्पादन ग्राहकांना खरेदी करावे लागते. त्यातच कामगार संप घडून आल्यास वस्तूंची टंचाई निर्माण होते. ग्राहकांचे हाल वाढतात. एकाच प्रतीचे उत्पादन वस्तूंचे केल्याने ग्राहकांच्या आवड-निवड यास वाव राहत नाही. यातून ग्राहकांचे सतत नुकसान होते व क्लेशही सहन करावे लागतात.

### ७) अति भौतिकवादाची समस्या –

लोकशाही समाजवादावर प्रामुख्याने अशी टिका केली जाते की, लोकशाही समाजवाद नैतिक बाजुकडे दुर्लक्ष करून भौतिकवादास अधिक प्राधान्य देतो. त्यामध्ये वस्तूचे उत्पादन, वितरत, विनिमय, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण या आर्थिक बाबींना अधिक महत्व देतो.

एकंदरीत लोकशाही समाजवादामध्ये तात्विक व परिस्थितीजन्य दोष अधिक निर्माण झालेले दिसतात. असे असले तरी लोकशाही समाजवादाने व्यक्ती व राष्ट्रांचे स्वातंत्र्य व विकास यास महत्व दिले. लोकशाहीतील शांततामय सनदशीर व जनपाठींब्याच्या मार्गाने समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुत्व या मुल्यांची प्रस्थापना करणारा, शोषण युक्त समाज निर्माण करण्याची दिशा देणारा लोकशाही समाजवाद अल्पावधीत लोकप्रिय झालेला दिसतो.

## २.५ लॅटिन अमेरिकन समाजवाद –

१९८० च्या दशकात लॅटिन अमेरिका हा समाजवादी विचारसरणीच्या प्रसारासाठी प्रस्थापित समाज होता. त्यावर निरंकूश व कुलीन वर्गाचे राज्य होते जे वाढत्या असंतोषी शेतकरी लोकांचे शोषण करत होते व तीव्रपण विभाजित दोन वर्गीय सामाजिक संरचना कायम ठेवत होते. या काळात वाढीव उत्पादकता व परकीय गुंतवणुकीमुळे शोषक भांडवलशाहीच्या

प्रारंभीच्या टप्प्यात यूरोपमध्ये समाजवादी व साम्यवादी चळवळींचा पुरस्कार होत असलेल्या देशांमध्ये स्थलांतराची लाट आली.

समाजवादी बिगर प्रवाह लॅटिन अमेरिकेतील साहित्य व कला विश्वाने प्रसारीत करण्यात महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. १९२० व १९३० च्या दशकामध्ये मेक्सिकन भित्तीचित्रांच्या चळवळीपासून याचा प्रभाव वाढत गेला. या चळवळीत डिएगो रिवेरा हॉसु प्रसिद्ध कलाकार नेता म्हणून मिळाला. पुढील काळात जोश कलोमेंटे ओरोझको (१८८३ ते १९४९) व डेव्हीड उनल्वारो सिक्वेरोल (१८८९ ते १९७४) यांच्या प्रभावाखाली झालेल्या म्युरल चळवळीने ही आपले मोठे योगदान दिलेले दिसते.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये लॅटिन अमेरिके मध्ये वाढलेली उत्पादकता व परकिय गुंतवणूकीच्या काळात इटालियन, जर्मन व स्पॅनिश स्थलांतरितांची आलेली लाट यातून संपूर्ण लॅटिन अमेरीका खंडात साम्यवादाचा प्रसार घडून आला. सरंजामशाही, मध्ययुगीन, कॅथॉलिक व पुरुष प्रधान संस्कृतीच्या पाठीराख्यांनी या कल्पनांचे त्याचे श्रेणीबध्द दोन वर्गीय कृषी आधारित व्यवस्थेविरूद्धच्या चळवळीत रूपांतर केले. १९३० च्या जागतिक महामंदीनंतर डाव्या राजकीय पक्षांची संख्या मोठया प्रमाणात वाढली या राजकीय पक्षांनी अमेरिका विरोधी राष्ट्रवादास मोठया प्रमाणात चालना दिली. जागतिक महामंदीनंतरची दोन दशके लॅटिन अमेरिकन देशांच्या दृष्टीने सर्वच बाबींमध्ये अस्थिरतेचा अनुभव देणार होती. कारण हुकुमशाही, लोकशाही व कम्युनिस्ट गट सतत सत्तेसाठी संघर्ष उभा करत होते. १९५४ साली अमेरिकेने ग्वाटेमाला मधील कम्युनिस्ट सरकार पाडले. पुढे चार वर्षानंतर क्यूबा मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांनी साम्यवादी क्रांती घडवून आणली व सोव्हिएट रशियाशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. अमेरिकेकडे पाठ फिरविणारा व रशियाशी उघडपणे मैत्री प्रस्थाति करणारा क्यूबा लॅटिन अमेरिकेतील पहिलाच देश ठरला. क्यूबाने लॅटिन अमेरिकेन एक नवीन मार्क्सवादी – लेनिनवादी प्रतिमान प्रस्तूत केले. क्यूबाच्या या मॉडेलचा लॅटिन अमेरिकेतील इतर देशांमध्ये प्रभाव वाढू नये वा प्रसार होऊ नये याकरिता अमेरिकेने साम्यवाद विरोधी उघड व छूप्या अशा दोन्हीं पातळ्यावर आघाडया उघडल्या. त्यासाठी अमेरिकेने लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवणाऱ्या लष्करी राजवटींना पाठींबा व बळ दिले. क्यूबा मधील साम्यवादी सरकार पाडण्यासाठी ही अमेरिकेने मोठया प्रमाणात प्रयत्न करावयास प्रारंभ केला. '१९६१ चे बे ऑफ पिग्सि' ही मोहीम सर्वाधिक चर्चेची ठरली. या मोहिमेअंतर्गत सीआयए ने १४०० क्यूबन निर्वासितांना प्रशिक्षण व विमापुरवठा करून फिडेल कॅस्ट्रोची सत्ता उलथवून टाकण्यासाठी प्रयत्न केले. परंतु दिर्घ प्रयत्नानंतरही अमेरिकेस फिडेल कॅस्ट्रोचे वर्चस्व नष्ट करता आले नाही.

लॅटिन अमेरिकन अंतर्गत कम्यूनिस्ट विरोधी चळवळींनी ही जोर धरला. चिली हे त्याचे एक महत्वाचे उदाहरण होय. १९७३ मध्ये चिलीच्या लष्कराचे प्रमुख जनरल ऑगस्टो पिनोशे यांनी लोकशाही पध्दतीने निवडून आलेले मार्क्सवादी साल्वाडोर अलेंडे यांचे सरकार पदच्यूत करून कम्यूनिस्ट डाव्या पक्षांतर बंदी घातली व लष्करशाहीचा अंमल सुरू केला. अर्थात यामागे अमेरिकेचा हात होता म्हणून त्यास अमेरिकेचा 'चिली प्रयोग' असे म्हटले जाते. निफाराग्वामध्ये सॅडिनिष्टा लिबरेशन फ्रंट या नावाने परिचित असलेल्या मार्क्सवादी गुरिल्ला चळवळीत १९७० च्या दशकात जागतिक समर्थन प्राप्त झाले. या चळवळीने सोमोझा

कुटूंबास सजेवसन पायउतार करून साम्यवादी सरकारची स्थापना केली. लॅटिन अमेरिकेन साम्यवादी सरकार स्थापन करणारे हे दुसरे राष्ट्र होते.

लॅटिन अमेरिकेत साम्यवादाचे विविध प्रकार विकसित झाले. हे प्रकार त्या-त्या देशाचे इतिहास, समाज व विकासाचे स्तर एक प्रकारे प्रतिबिंबत करत होते. साम्यवादाच्या दृष्टीने त्यामुळे ती एक समस्या म्हणून पुढे आली होती. उदा. पेरू मध्ये समाजवादी अप्रिष्टा व कडवे कम्युनिस्ट गट यांच्यात अनेक दशके शत्रुत्व होते. निकारम्बामध्ये ख्रिश्चन समाजवादी व स्वतंत्र मार्क्सवादी, लेनिनवादी असे गट कार्यरत होते. कोलंबिया मध्ये चार वेगवेगळ्या गटांमध्ये यांच्या वैचारिक व सत्ता संघर्ष होता.

२० व्या शतकाच्या शेवटच्या दशकामध्ये, विशेषत: सोव्हिएट रशियाच्या विघटनांतर लॅटिन अमेरिकेन ही साम्यवादी विचार प्रवाह व प्रतिमाने क्षीण होऊ लागले व लोकशाही, उदारमवाद यांचे संक्रमण या देशांमध्ये वाढले. क्यूबामध्ये ही साम्यवादा पासून अपूर्व लोकशाहीकडे प्रवास सुरू झाला. चीन, उत्तर कोरिया, व्हिएटनाम या देशांमध्ये नव्या विचारांना प्रतिसाद प्राप्त होत होता या पार्श्वभूमीवर लॅटिन अमेरिकेत लोकशाही शासनप्रणालीस मान्यता प्राप्त होत गेली. क्यूबा वगळता १९ राष्ट्रे लॅटिन अमेरिकेत लोकशाही शासनाच्या अंगिकार करू लागली.

एकंदरीत १९व्या शतकाच्या प्रारंभ समाजवादी विचारधारेची जी लाट आली त्यातून लॅयिन अमेरिकेतील कला, संस्कृती व राजकारणास मोठी गती प्राप्त झाली. २० व्या शतकामध्ये लॅटिन अमेरिकेन साम्यवादी चळवळीचे विविध प्रवाह उद्यास आले. २०व्या शतकाच्या शेवटच्या दशकात लॅटिन अमेरिकेत लोकशाही शासन व्यवस्थेस चालना मिळाली. तरीही लॅटिन अमेरिकेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया आजही मोठे पेच प्रसंग कामय असलेले दिसतात.

**आपण काय शिकलो?**

प्र. १. समाजवाद ही संकल्पना स्पष्ट करताना समाजवादाचा विकास लिहा.

प्र. २. समाजवादाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

प्र. ३ रा. समाजवादाची प्रमुख तत्वे लिहा

प्र. ४. मार्क्सवादाची प्रमुख तत्वे लिहा

प्र. ५. लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन करा.

प्र. ६. लोकशाही समाजवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**टिपा लिहा**

१) समाजवाद

२) लोकशाही समाजवाद

३) लॅटिन अमेरिकन समाजवाद

४) समाजवादाचा विकास

**संदर्भ सूची**


१) गर्गे स. मा. – समाजशास्त्रीय कोश

२) घारे पा. श्री. – राजकीय विचारांचा इतिहास

३) डोळे ना. य. – राजकीय विचारांचा इतिहास

४) दाभोळकर देवदत्त – लोकशाही समाजवाद

५) दाभोळकर सूमन – समाजवाद

६) कुलकर्णी अ. ना. – आधूनिक राजकीय विचारप्रणाली


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ३

# समुदायवाद

**घटक रचना**


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ अधिकार विरुद्ध चांगले जीवन

३.४ सदगुण नितीमुल्ये (अलास्डेयर मॅकइन्टायर)

३.५ समारोप

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ संदर्भ


## ३.१ उद्दिष्ट्ये

उदारमतवाद व्यक्तीच्या वैयक्तिक अधिकारांना सर्वोच्च स्थान देतो. या व्यक्तीअधिकारांच्या अतिरेकी महत्वास समुदायवादाने आव्हान दिले असून उदारमतवादी विरुद्ध समुदायवादी असा संघर्ष १९८०-९० च्या दशकात प्रबळ दिसून येतो.

## ३.२ प्रस्तावना

उदारमतवादातील मूलभूत तत्वांचा ठळकपणे उल्लेख करत स्टुअर्ट हॅम्पशायर याने असे म्हटले आहे की उदारमतवादी नैतिकतेचा सार हा कोणत्याही अंतिम आणि अधिकृत अधिसत्तेला नाकारणे आणि अधिसत्ता व निर्बंध यांची अंमलबजावणी करणे हा आहे. उदारमतवादी नैतिकता व्यक्तिगत स्वातंत्र्याला सर्वश्रेष्ठ स्थान देते. उदारमतवादाने व्यक्तिगत स्वातंत्र्यास दिलेला अवाजवी महत्त्वामुळे १९८०-९० च्या दशकात राजकीय सिद्धांतात समुदायवाद (Communitarianism) हा नविन प्रवाह निर्माण झाला. राजकिय तत्वज्ञानाच्या क्षेत्रात या दशकात 'उदारमतवाद विरुद्ध समुदायवाद संघर्ष' उफाळून आला. यामध्ये प्रामुख्याने मायकेल सँडेल आणि मायकेल वाल्झर या समुदायवादी अभ्यासकांचा महत्वाचा वाटा आहे. समावेश आहे.

## ३.३ अधिकार विरुद्ध चांगले जीवन

अमेरिकन राजकिय तत्वज्ञ मायकेल सँडेल यांनी Liberalism and the Limits of Justice व Democracy's Discontent या आपल्या दोन पुस्तकांतून वर्तमान उदारमतवादाची (Contemporary Liberalism) चिकित्सा केली आहे. वर्तमान उदारमतवादातील 'स्व' (Self) ही संकल्पना स्पष्ट करीत असतांना सँडेल यांनी या संकल्पनेस 'निर्बंध रहित स्व' (Unencumbered Self) ची संकल्पना असे म्हटले आहे. सँडेल यांनी म्हटल्याप्रमाणे 'स्व'

चे उद्दिष्ट हे तत्वज्ञान अमेरिकेतील वर्तमान सार्वजनिक तत्वज्ञानात व्यक्त करते ज्याला प्रक्रियात्मक गणराज्य असेही म्हणता येईल.

वर्तमानकाळातील राजकीय तत्वज्ञानावर प्रामुख्याने उदारमतवादी सिद्धांताचा प्रभाव आहे. उदारमतवादी सिद्धांत हा 'नागरिकांच्या नैतिक तसेच धार्मिक दृष्टिकोनाबाबत शासनाने तटस्थ राहणे' या मध्यवर्ती संकल्पनेभोवती आकारला आहे. लोकांमध्ये चांगल्या जीवनाबाबत (Goods) एकमताचा अभाव असतो. अशावेळी राज्याने जीवन जगण्याच्या कोणत्याही पद्धतीबाबत निश्चित कायदा बनवणे चुकीचे ठरते असे मायकेल सँडेल यांना वाटते. अशावेळी त्या राज्याने 'व्यक्तिच्या मुक्त आणि स्वतंत्र जीवनाचा आदर करु शकेल व व्यक्तीला स्वतःचे मूल्य आणि उद्दिष्ट ठरवण्यात सहाय्यभूत ठरेल' अशा स्वरुपाची अधिकारांची चौकट निर्माण केली पाहिजे. परंतू उदारमतवादी राज्य हे कोणत्याही उद्दिष्टांपेक्षा 'योग्य प्रक्रिये'स (Fair Procedure) अत्याधिक महत्व देत असल्याने निर्माण होणारे सार्वजनिक जीवन हे एकप्रकारे 'प्रक्रियात्मक गणराज्य' (Procedural Republic) बनते.

मायकेल सँडेल यांच्या मते, वर्तमान अमेरिकन राजकारणासमोर दोन प्रमुख आव्हाने आहेत. यातील पहिले आव्हान 'व्यक्तिगत जीवनावर शासन करणाऱ्या यंत्रणांवरील नियंत्रण तुटण्याची भीती' हे असून दुसरे आव्हान 'समुदायातील नैतिक चौकट नष्ट होण्याची भीती' हे आहे. आजच्या अमेरिकन राजकारणातील या आव्हानांना सामोरे जाण्यात 'प्रक्रियात्मक गणराज्य' कुचकामी ठरत असल्याने 'प्रक्रियात्मक गणराज्य' ही एक ढिसाळ संकल्पना असल्याचा आरोप मायकेल सँडेल यांनी केला आहे.

मायकेल सँडेल यांच्या उदारमतवादावरील समुदायवादी टीकेचे दोन प्रमुख पैलू आहेत. सँडेलच्यामते उदारमतवाद हा 'स्व' च्या अनिर्बंधतेवर आधारलेला आहे. तर दुसरे असे कि, 'अनिर्बंध स्व' ही संकल्पना दूरगामी परिणाम करणाऱ्या सार्वजनिक तत्त्वज्ञानास चालना देणारी आहे.

मायकेल सँडेल याने आपल्या समुदायवादी समिक्षणातून उदारमतवादाच्या 'अधिकार केंद्रितते'वर आघात केला आहे. मायकेल सँडेल याने 'अधिकारां'चे महत्त्व नाकारले नसले तरीही 'चांगल्या जीवन'शिवाय 'अधिकारां'चे स्थान आणि महत्त्व सांगता येऊ शकते का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. जॉन रॉल्सने 'अधिकारां'ना 'चांगल्या जीवना'आधी ठेवले आहे. जॉन रॉल्सचा 'चांगल्या जीवनाआधी अधिकार' हा तर्क कर्तव्यशास्त्र सिद्धांताशी (Deontological Theory) निगडीत आहे. हा तर्क दोन वेगवेगळ्या पद्धतीने समजून घेता येईल. सर्वप्रथम 'न्याय हा प्राथमिक आहे'. या तर्काचा विचार करता नैतिक, राजकीय किंवा अन्य कोणताही हितसंबंधांपेक्षा न्यायाची मागणी ही तुलनेने महत्त्वाची ठरते. दुसरा तर्क असा की, न्यायास प्रथम महत्व हे केवळ नैतिक प्राथमिकता स्पष्ट करत नसून विशेषाधिकारांच्या समर्थनाची बाजूही उचलून धरते. अशावेळी 'अधिकार' हे 'चांगले जीवन' या संकल्पनेआधी आहेत हे म्हणणे पुरेसे ठरत नाहीत तर अधिकारांची तत्वे ही स्वतंत्रपणे विकसित झाली आहेत हेही येथे लक्षात घेतले पाहिजे.

मायकेल सँडेलच्या मते जॉन स्टुअर्ट मिल आणि जॉन लॉक यांच्यासारखे उदारमतवादी अभ्यासावर पहिल्या तर्काशी जोडलेले आहेत. जॉन रॉल्स हा काही ठिकाणी पहिल्या तर्काचे समर्थन करतांना दिसतो. उपयुक्ततावादावरील त्याचे समिक्षण हे नैतिकतेच्या तत्त्वांवर

आधारलेले असून त्यामध्ये रॉल्स न्यायाला प्राधान्य देतांना दिसतो. मात्र काही ठिकाणी रॉल्स हा दुसऱ्या तर्काचेही समर्थन करताना दिसतो. त्यामुळे रॉल्स याने मांडलेला उदारमतवादाचा नवीन प्रकार हा कर्तव्यशास्त्रीय सिद्धांताचा एक भाग ठरतो. कर्तव्यशास्त्रीय सिद्धांतानुसार 'अधिकारांना चांगल्या जीवनापेक्षा अधिक महत्त्व' हा भाग नैतिक मागणीपेक्षा ज्ञानशास्त्रीय (Epistemological) मागणीचा असल्याचे मायकेल सँडेल याला वाटते. या ज्ञानशास्त्रीय मागणीनुसार आपल्याला चांगल्या जीवनाशिवायही आपल्याला आपल्या अधिकारांची जाणीव होऊ शकते.

जॉन रॉल्सच्या सिद्धांताचे विश्लेषण करतांना मायकेल सँडेल यांनी असे म्हटले आहे की हा सिद्धांत 'स्व' या संकल्पनेच्या वैशिष्ट्यपूर्ण गृहीतकावर आधारित आहे.

न्याय हा सदगुण ठरण्यासाठी निसर्गावस्थेतील सर्वांना त्यांच्या पार्श्वभुमीपेक्षा तसेच सर्व प्रकारच्या सांपत्तीक जबाबदाऱ्यांपासून विभक्त करण्यात आले आहे. जॉन रॉल्सचा सिद्धांत 'अनिर्बंध  स्व या संकल्पनेवर आधारीत आहे' हे आपले म्हणणे पटवून देण्यासाठी मायकेल सँडल याने या सिद्धांतातील मूलभूत स्थिती आणि न्यायाच्या वितरणाचे तत्व या दोन घटकांचा आधार घेतला आहे. जॉन रॉल्स यांनी मांडलेल्या मूलभूत स्थितीमध्ये उपस्थित सर्व पक्ष एकमेकांविषयी निरुत्साही असतात. हा परस्पर निरुत्साह हा मानसशास्त्रीय नसून त्यामागे विशिष्ट ज्ञानशास्त्रीय मागणी आहे. ही मागणी आपण कशा विषयी सक्षम आहोत याच्या 'स्व' ज्ञानाशी निगडित आहे. कराराच्या स्थितीतील सर्वच पक्ष 'चांगले जीवन' या संकल्पनेबाबत अनिश्चित असतात. अशावेळी उद्दिष्टप्राप्तीच्या दृष्टीने 'चांगले जीवन' ही संकल्पना दीर्घकालीन योजना ठरते. दरम्यानच्या काळात व्यक्ती आपापल्या उद्दिष्टांबाबत आणि  'स्व' हितासाठी धडपडत असतात. येथे स्वहित ही संकल्पना स्वार्थ किंवा अहंभावाने भरलेली नसते. मात्र, व्यक्ती जेव्हा संपत्ती, दर्जा, प्रभाव आणि सामाजिक प्रतिष्ठा यांना आपले अंतिम उद्दिष्ट मानू लागतो तेव्हा व्यक्तीचे हितसंबंध हे स्वतः पुरते मर्यादित राहतात. जॉन रॉल्सच्या या युक्तिवादाचा आधार घेत मायकेल सँडेल याने स्पष्ट केले आहे की 'रॉल्स हा व्यक्तीच्या 'स्व' हिताला सार्वजनिक संपत्ती बनवू पाहतो'. खरेतर एखादी सवय, महत्त्वाकांक्षा यांसारख्या विशिष्ट गोष्टींचा मालक मी असेल तर त्याअर्थी ती वस्तू पूर्णपणे माझ्या मालकीची ठरते.

'स्व' संकल्पनेचे उदारमतवादी विश्लेषण हे व्यक्तीच्या रचनात्मक अंतिम उद्दिष्टांबाबत (ज्या उद्दिष्टांची निवड आपण केलेली नसली तरीही) चर्चा करत नाही. अनिर्बंध  'स्व' ही संकल्पना जॉन रॉल्स यांनी मांडलेल्या 'मूलभूत स्थान' आणि त्याच्याशी निगडीत 'अज्ञानाचा पडदा' एवढी मर्यादित नसून ती न्यायाच्या दुसऱ्या तत्त्वाशी ही निगडित आहे. रॉल्सने नैसर्गिक स्वातंत्र्य आणि समता या संकल्पनांना नाकारले असून या संकल्पना सामाजिक आणि नैसर्गिक जीवनातील वाटाघाटी करण्यासाठी अपुऱ्या आहेत असा युक्तिवाद मांडला. मायकेल सँडल याने रॉल्सच्या युक्तिवादावर आक्षेप घेतला असून त्याच्या मते, रॉल्सने प्रतिपादन केलेल्या नैसर्गिक स्वातंत्र्य ते लोकशाहीत समता या स्थलांतरणात व्यक्ती स्वतःपासून भरकटते. या प्रत्येक टप्प्यावर व्यक्तीच्या  'स्व' सोबत जोडलेल्या गुणवैशिष्ट्यांचा टप्प्याटप्प्याने ऱ्हास होत जातो आणि व्यक्ती केवळ एक घटक उरतो. नैसर्गिक स्वातंत्र्याचा विचार करतानाही  'स्व' ही संकल्पना सामाजिक आणि सांस्कृतिक संचिताचा भार असलेली मांडण्यात आली आहे. फक्त खुल्या संधींतून व्यक्तीला  'स्व' विकासाची संधी देणे पुरेसे नाही.

तर लोकशाही समता स्थापन करण्याच्या प्रयत्नात निर्माण होणाऱ्या समस्येमुळे तर व्यक्तीतील उरलीसुरली गुणवैशिष्ट्येही संपुष्टात येतात.

मायकेल सँडेल यांच्याप्रमाणे मायकेल वाल्झर यांनीही आपल्या समुदायवादी टीकेतून अमेरिकन तत्वज्ञानाचा परामर्श घेतला आहे. वाल्झर यांनी आपल्या टीकेचा केंद्रबिंदू हा वर्तमान उदारमतवादाने न्यायाचा सिद्धांत प्रतिपादन करतांना अंगिकारलेल्या 'पद्धतीशास्त्रास' बनवले आहे. न्यायाचा सिद्धांत निर्माण करत असलेल्या या पद्धतीशास्त्र बाबत विचार होणे महत्त्वाचे आहे. न्यायाबाबत वाल्झर यांनी बहुलवादी दृष्टिकोन (Pluralist Approach) स्वीकारला आहे. उदारमतवादी अभ्यासकांनी स्वीकारलेल्या वैश्विक दृष्टिकोनातून निर्माण होणारा 'न्याय' हा समाजातील सर्व घटकांना समान पद्धतीने कसा लागू करता येईल? असा प्रश्न वाल्झर यांनी उपस्थित केला आहे. वाल्झरच्या मते, न्याय ही मानवनिर्मित संकल्पना असल्याने समाजातील सर्व घटकांचा विचार करू शकेल असा न्याय सिद्धांत प्रस्थापित करणे काहीसे कठीण आहे. आपण न्यायाची वस्तूनिष्ठ आणि सर्वमान्य तत्वे प्रस्थापित करू शकत नाही. रॉल्सच्या सामाजिक न्याय सिद्धांतात मांडलेल्या नैसर्गिक अवस्थेत, आपल्या ध्येय- उद्दिष्टांबाबत काहीही माहिती नसलेली व्यक्ती कोणता निर्णय घेईल याविषयी मत मांडतांना मायकेल वाल्झर यांनी म्हटले आहे कि, आपण अशा परिकल्पेनेचा आधार घेऊन न्यायासाठीचे अमूर्त नियम ठरवू शकत नाही. प्रत्येक समुदाय आणि समुदायातील प्रत्येक व्यक्ती यांनी चांगले जीवन याविषयी आपली स्वतंत्र मते तयार केली आहेत. समुदायातील स्तरांच्या (जसे कि जातीय उतरंड) चांगल्या जीवनाबाबत वेगवेगळ्या धारणा असू शकतात. वेगळ्या भाषेत सांगायचे झाल्यास चांगले जीवन ही संकल्पना व्यक्ती आणि समुदायसापेक्ष आहे. अशावेळी सामाजिक न्यायाच्या वितरणासाठी रॉल्सने प्रतिपादन केलेली वितरणात्मक न्यायाची पद्धती अपुरी पडते. यावर उपाय म्हणुन वाल्झर याने 'जटील समते'चे तत्व (Complex Equality) सांगितले आहे.

## ३.४ सदगुण नितीमुल्ये (अलास्डेयर मॅकइन्टायर)

समुदायवादाच्या प्रारंभिक समर्थकामध्ये अलास्डेयर मॅकइन्टायर यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. त्यांचा After Virtue हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. मॅकइन्टायरच्या मते, व्यक्तीच्या हितामध्ये त्याच्या संपुर्ण मानवी जीवनाचा विचार असतो. त्यामध्ये मुल्यांना (Virtue) विशेष महत्व आहे. मुल्यांशिवाय व्यक्तीच्या चांगल्या जीवनाची कल्पनाच करता येत नाही. उदारमतवादी दृष्टीकोनातील 'व्यक्ती हा स्वायत्त नैतिक घटक आहे' हा युक्तिवाद मॅकइन्टायर याने हाणुन पाडला आहे. व्यक्तीला सामाजिक परिघातून बाहेर ठेवत स्वायत्त नैतिक घटक बनवणे शक्य नाही. व्यक्तीचा सर्वांगिण विकास हा केवळ सामाजिक परिघातच होऊ शकतो. सहिष्णुतेचा पुरस्कार करतांना उदारमतवाद हा नैतिकतेबाबत सापेक्षतेची भुमिका स्विकारते. त्यामुळे नैतिकमुल्ये ही जगभरात प्रस्थापित करतांना स्थानिक संस्कृती आणि इतिहास विचारात घ्यावाच लागतो. त्यामुळे न्यायाबाबत उदारमतवादी कठोर भुमिका स्विकारू शकत नाही. याचाच परिणाम असा कि, उदारमतवाद समाजघटकांसाठी ठोस नैतिक दायित्वांची आणि खऱ्या अर्थाने समुदायाची रचना करु शकले नाहीत. सुरवातीला मॅकइन्टायर याने उदारमतवादी सहिष्णुतेवर तोंडसुख घेतले असले तरी नंतर त्यांचे कौतुक केल्याचेही दिसते.

## ३.५ समारोप

समुदायवाद ही नजिकच्या काळातील विचारप्रणाली असून यात मायकेल सँडेल, मायकेल वाल्झर, अलास्डेयर मॅकइन्टायर इ विचारवंतांचे मोलाचे योगदान आहे. जॉन रॉल्स याने आपल्या Theory of Justice या पुस्तकातून मांडलेल्या सामाजिक न्यायाच्या सिद्धांतावर विविध प्रतिक्रिया उमटल्या. यात मायकेल वाल्झर याने सादर केलेला जटील समतेच्या तत्वाचा सिद्धांत हा महत्वपुर्ण आहे. समुदायवाद हा राज्याच्या तटस्थेबाबत आक्षेप घेत असून व्यक्तीच्या अनिर्बंध स्वातंत्र्यास आक्षेप घेतो.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

- मायकेल सँडेलच्या समुदायवादी विचारांची थोडक्यात चर्चा करा
- अधिकार विरुद्ध चांगले जीवन या द्वंद्वाचा परामर्श घ्या.
- टीपा लिहा-
    - समुदायवाद
    - अनिर्बंध स्व

## ३.७ संदर्भ


- Contemporary Political Theory: A Reader- Collin Ferrelly (Sage Publication)
- An Introduction to Political Theory- O. P Gauba (Mayur Paperbacks)


munotes.in

❋❋❋❋❋❋❋

४

# राष्ट्रवाद

**घटक रचना**

4.1 उद्दिष्टे

4.2 राष्ट्र राज्य संकल्पना

4.3 राष्ट्र राज्याचे घटक

4.4 सारांश

4.5 आपण काय शिकलो ?

4.6 संदर्भ सूची

## 4.1 उद्दिष्टे

राष्ट्रवाद एक आधुनिक व बहुचर्चित संकल्पना आहे 19व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादाचा विकास झाला. राष्ट्रवाद ही एक प्रेरक व लढाऊ राजकीय संकल्पना मानली जाते. जॉन एच रॅन्डॉल यांनी या संदर्भात म्हटले आहे की, 'राष्ट्रवाद ही अशी एकमेव कल्पना वा विचार आहे की जिच्या करीता आजही अनेक लोक आत्मसमर्पण करावयास तयार असतात.' तर हॅन्स कोहन यांनी यासंदर्भात असे प्रतिपादन केले आहे की, 'राष्ट्रवाद ही प्रथमतः व मुख्यतः मानसिक अवस्था आहे. आत्मियतेच्या जाणिवेची ती कृती आहे.' तर आल्फ्रेड डी. ग्राझीया यांनी राष्ट्रवाद हा धर्माप्रमानेच मानवी सहज प्रवृतीशी सलग्न असल्याचे प्रतिपादन केले आहे. एकंदरीत राष्ट्रवाद ही एक सामाजिक पर्यावरणात आविष्कारीत होणारी समाज घटकातील एक भावना वा मानसिक स्थिती आहे. या घटकामध्ये आपण राष्ट्रवाद ही संकल्पना अभ्यासताना राष्ट्रवादाचा विकास, राष्ट्र-राज्य व्यवस्था, राष्ट्र-राज्य व्यवस्थेचे घटक व राष्ट्रवादाचे प्रकार याची मांडणी करणार आहोत. ज्यामुळे राष्ट्रवाद या मानवी जीवनास व्यापक अर्थाने प्रभावित करणाऱ्या कल्पनेचा व विचारधारेचा आपणास संपूर्ण परिचय होऊ शकेल.

## 4.2 राष्ट्र - राज्य संकल्पना

राष्ट्र - राज्य संकल्पना पुढील घटकांच्या आधारे आपणास अधिक अवलोकन करता येईल.

राष्ट्रवाद संकल्पनेचा अर्थ :

राज्यशास्त्रीय परिभाषेमध्ये राष्ट्र , राष्ट्रक शब्दाना विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला दिसतो. Nation हा शब्द लॅटिन भाषेतील Neutus या शब्दापासून आलेला असून त्याचा अर्थ वंश वा जन्म असा होतो. याचाच अर्थ राष्ट्र या संकल्पनेचा वंश व जन्म या घटकाशी जवळचा



munotes.in

संबंध आहे. जर्मनी मध्ये या पद्धतीच्या भावनेचा प्रथम उच्चार झाला असे मानले जाते. 'आमच्या भूमीवर रोमन सम्राटाचे वर्चस्व आम्हास मान्य नाही ते आम्ही झूगारून देऊ' अशी प्रखर भावना जर्मन क्रांतीकारकांनी व्यक्त केली. त्याचीच पूनरावृत्ती यूरोपातील व क्रमाने जगातील इतर राष्ट्रंमध्ये ही झाली.

**राष्ट्रवादाची व्याख्या :-**

राष्ट्रवाद ही संकल्पना पुढील व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल .

1. हंसर

   'समान भाषा वा समान वंश या घटकामुळे नव्हे तर लोकांच्या एकत्र जीवन व्यतीत करण्याच्या इच्छे मुळे निर्माण होते.'

2. बर्जेस

   'अखंड भौगोलिक प्रदेशावर वास्तव्य करणारी व वांशिक एकतेच्या बंधनाने एकसूत्रात बांधली गेलेली जनता वा बांधला गेलेला लोकसमुदाय म्हणजे राष्ट्र होय.'

3. ब्राइस

   'राष्ट्र हे राष्ट्रक आहे ते स्वत:ला राजकीय संघामध्ये संघटित करून घेणारे व स्वतंत्र झालेले अगर स्वतंत्र होऊ इच्छिणारे असते.'

4. बार्कर

   'लोकसमुदायात ऐक्याची भावना निर्माण करणारे सर्वच घटक अस्तित्वात असले पाहिजेत, असे नाही. उदा. वंश, भाषा, संकृती, धर्म वैगेरे. हे स्पष्ट करून बार्कर असे म्हणतात की जेंव्हा एखादा लोकसमुदाय स्वतःला राष्ट्र म्हणून संबोधतो तेव्हा त्याचे राष्ट्र बनते.'

5. ग्रॉस

   'राष्ट्रवाद ही अशी भावनात्मक राजकीय कल्पना आहे की जी सत्ता ताब्यात घेण्याच्या प्रयत्नांशी निगडीत असून राज्याच्या व्यक्तिगत अस्तित्वावर भर देते व शासन आणि कायद्यातील विविधता, समान भावना व तत्वावर आधारित गटांची पृथकता मान्य करते.'

6. आल्फ्रेड डी ग्राझीया

   'राष्ट्रवाद स्वदेशासाठी प्रेम व विदेशाविषयी जागरूकता निर्माण करतो.'

7. प्रा. लुई स्नायडर

   "राष्ट्रवाद हा इतिहासाच्या विशिष्ट अवस्थतेतील राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि बौद्धीक घटकांचा परिणाम आहे. निश्चित स्वरूपाच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या, समान भाषा बोलणाऱ्या, राष्ट्राच्या भावना व्यक्त करणारे साहित्य असणाऱ्या, समान रूढी आणि परंपरांनी प्रभावित झालेल्या, क्वचित समान धर्म असणाऱ्या, आपल्या

राष्ट्र पुरुषांचा गौरव करणाऱ्या लोकांची भावनात्मक अथवा मानसिक अवस्था म्हणजे राष्ट्रवाद होय."

**राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये :-**

वरील व्याखांच्या आधारे राष्ट्रवादाची प्रमुख तत्वे वा वैशिष्ट्ये पुढील प्रमाने सांगता येतील.

1. मानसिक अवस्था:- राष्ट्रवाद ही समाज मानसात वसणारी एक भावना वा मानसिक अवस्था आहे. झँगवॉल यासंदर्भात म्हणतात, "राष्ट्रवाद ही एक राजकीय वास्तवाशी संबंधित असलेली मानसिक अवस्था आहे. या मानसिकतेत जसे स्वकियांबद्दल प्रेम, आस्था आहे त्याचवेळी परकीय व परराष्ट्रे याबाबत तिरस्कार, साशंकता व परकेपणाची भावना असते.

2. स्वतंत्र राजकीय अस्तित्व:- राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरित झालेला प्रत्येक राष्ट्रीय लोकसमूह हा स्वतंत्र राजकीय अस्तित्वाची अपेक्षा ठेवतो. उदा. ज्यू हा अनेक वर्ष राष्ट्राच्या निर्मितीकरीता प्रयत्नशील होता. तो दुसऱ्या महायुध्दानंतर इस्त्राईलच्या स्वरूपात राज्य स्थापन करून यशस्वी झाला.

3. स्वंयनिर्णमयाचे तत्व :- राष्ट्रवादामध्ये स्वयंनिर्णयाच्या तत्वाचे अस्तित्व असते. राष्ट्रीय भावनेने भारलेला लोकसमूह जर परकिय राजवटीच्या नियंत्रणा खाली असेल तर तो स्वंयनिर्णमयाची मागणी करतो.

4. राष्ट्रीय स्वातंत्र्यास प्रथम स्थान :- राष्ट्रवादामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्यास प्रथम स्थान दिले जाते. राष्ट्रीय स्वातंत्र्य नसेल तर ते परत प्राप्त करण्यासाठी तीव्र प्रयत्न केले जातात.

5. राष्ट्राप्रती श्रद्धा:- लोकजीवनामध्ये धर्म या घटकास जे श्रद्धा स्थान असते तेच स्थान राष्ट्रीय जीवनात राष्ट्रवादास आहे.

6. त्यागाची भावना :- राष्ट्रवादाची संकल्पना ही त्यागाशी निगडीत आहे. धर्मासाठी ज्या प्रमाणे व्यक्ती त्याग करतात त्याप्रमानेच राष्ट्रासाठी व्यक्ती त्याग किंवा प्रसंगी आत्मबलिदानही करतात. उदा. फ्रांन्स राष्ट्राच्या निर्मिती करिता जॉन ऑफ आर्क यांनी केलेले बलिदान .

7. आकर्षक स्वरूप :- राष्ट्रवाद ही आजच्या काळातील सर्वाधिक आकर्षक तत्व प्रणाली आहे. राष्ट्रीय ऐक्य, शिस्त, सामर्थ्य, संपन्नता यांचा पुरस्कार ती करते व त्याचा स्वीकार समाज घटक आनंदाने करतात.

**राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे :-**

राष्ट्रवादाची भावना वाढीस लागल्यास काही प्रमुख घटना व घडामोडी कारणीभूत झालेली दिसतात, त्यांची मांडणी पुढील मुद्यांच्या आधारे करता येईल.

1. **प्रबोधन चळवळ :-**

धर्मयुद्धे, ज्ञानाचे पुनरुज्जीवन, धर्म सुधारणा व प्रबोधन या घटकांमूळे यूरोपमध्ये मध्ययुगीन सरंजामशाही व्यवस्था लोप पावली. त्याची जागा अनियंत्रित व केंद्रीय राजकीय सत्तांनी घेतली. या राजसत्तांच्या स्थापनेनंतर राजनिष्ठेच्या भावनेतून जनतेच्या मनात राज्यनिष्ठा व देश प्रेम निर्माण झाले व राष्ट्रवादाच्या उद्या करिता सर्वांगीण अनुकूल पार्श्वभूमी निर्माण झाली. धर्म सुधारणा प्रक्रियेतून 'राष्ट्रीय चर्च' सारख्या संस्था निर्माण झाल्या. त्यांनी राष्ट्रीय विचारास प्रोत्साहन मिळाले.

2. **वैज्ञानिक शोध व औद्योगिक क्रांती:-**

यूरोपमध्ये वैज्ञानिक शोध, नवतंत्र व यंत्र निर्मिती, यंत्राच्या सहाय्याने मोठ्या प्रमानावर उत्पादन यातून श्रौदयोगिक क्रांती झाली. अतिरिक्त उत्पादनाकरीता नव्या बाजारपेठांचा शोध, व्यापारी शहरांचा उदय या घटकां मुळे व्यापारी क्रांती घडून आली.त्यातूनच भौगोलिक एकात्मतेची निवड झाली. इटली,जर्मनी ही राष्ट्रीय याच प्रक्रियेचीच निर्मिती होय.

3. **भाषा व साहित्याची भूमिका :-**

यूरोप मध्ये ग्रीक व लॅटिन भाषा यांचा दीर्घकाळ प्रभाव होता. या दोन भाषातंर्गत इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश इ. भाषा मोठ्या प्रमाणात विकसित झाल्या. त्यातूनच भाषिक अस्मिता व पर्यायाने स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली.या विविध भाषांमधून मुद्रणकलेच्या शोधानंतर मोठ्या प्रमाणात साहित्य निर्माण होऊ लागले, या साहित्यातून सांकृतिक ऐक्य व राष्ट्रवाद निर्माण होण्यास पोषक परिस्थिती निर्माण झाली.

4. **संस्थात्मक शिक्षण प्रणाली:-**

मध्ययुगात युरोपमध्ये औपचारिक शिक्षणाकरीता संस्थात्मक प्रणाली विकसित झाली. या संस्थात्मक शिक्षण प्रणालीतून उदारमतवादी मूल्य व विचारांची रुजवात मोठ्या प्रमाणात झाली. या उदारमतवादी मूल्यांनीच राष्ट्रवादास वैचारिक अधिष्ठान व राष्ट्रवादाच्या प्रसारास पोषक परिस्थिती निर्माण झाली.

5. **अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध बंड :-**

यूरोप मध्ये अनियंत्रित राजसत्तांविरोधात जे बंड, क्रांती केली त्यातून लोकशाही शासनव्यवस्थांचा स्वीकार मोठया प्रमाणान घडून आला. उदा. इंग्लंडमध्ये वैभवशाली राज्यक्रांती घडून आली व तिने मर्यादित राजसता वा संसदीय लोकशाहीचा पाया घातला तर फ्रान्समधील राज्यक्रांतीने लोकशाही प्रजासत्ताकाची पायाभरणी केली. या बाबत लार्ड ॲक्टन असे म्हणतात, "राष्ट्रवाद ही अनियंत्रित सत्तेची एक जबरदस्त प्रक्रिया व प्रतिक्रिया आहे. राष्ट्रवाद क्रांतीतून प्रतिध्वणीत झाला तरी तो त्यातून निर्माण झालेला नाही.

6. **नव्या भूमींचा शोध:-**

औध्योगिक क्रांतीच्या नंतर यूरोपियन राष्ट्रांनी नव्या बाजारपेठांच्या शोधा करीता मोहिम हाती घेतली. त्यातून अमेरिका, भारत या देशांचा नव्याने यूरोपियन राष्ट्रांना परिचय झाला. या नव्या भूमीमध्ये वसाहती स्थापण्यावरून यूरोपियन राष्ट्रांनी स्पर्धा सुरू केली तर दुसऱ्या बाजूने या वसाहतींच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी तेथील नागरी समूहानी आंदोलने उभारली त्यातून राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली.

7. **स्वंयनिर्णयाचे तत्व :-**

पहिल्या महायुध्दानंतर व्हर्सायचा तह घडून आला. या तहामध्ये अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी 14 मार्गदर्शक तत्वे मांडली होती. त्यातील 'स्वंयनिर्णयाचे तत्व' हे एक महत्वाचे कलम होते. त्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की "एका राष्ट्रीयत्वाच्या लोकांचे एक राज्य असावे व आपले स्वतःचे शासन स्वतः चालविण्याचा अधिकार प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रीयत्व असलेल्या समाजास असला पाहिजे." या तत्त्वाच्या स्वीकाराने युरोपमध्ये नव्याने अनेक राष्ट्र-राज्य उदयास आली. त्यामुळे राष्ट्रवाद राष्ट्र आणि राष्ट्र राज्य या संकल्पना प्रसारास जोराची चालना मिळाली.

8. **विचारवंताचा प्रभाव:-**

विचारवंताचा प्रभाव हा घटक ही राष्ट्रवादाच्या विकासात महत्वाचा ठरलेला दिलतो. उदा. मॅझिनी यांनी लोकशाहीला पोषक अशा प्रगतीसाठी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यांनी शांतता, सह जीवन, सह अस्तित्व तसेच वांशिक, भाषिक व धार्मिक ऐक्य यावर आधारीत राष्ट्रवादाचा आग्रह ठरला तर जे. एस. मिल. वुड्रोविल्सन यांनी एक राष्ट्र एक राज्य, स्वयम् निर्णयाचा अधिकार याचा आग्रह धरला.

9. **जागतिक संघटनांची स्थापना :-**

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेला राष्ट्र संघ व दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेले संयुक्त राष्ट्रे यांनी स्वतंत्र राष्ट्र राज्याचा आग्रह धरल्यामुळे राष्ट्रवादास एक प्रकारे जागतिक मान्यता प्राप्त झाली.

10. वंशवादाचा वाढता प्रभाव :-

राष्ट्वादाच्या भावने मध्ये वंश हा घटक सर्वाधिक प्रभावी राहिलेला दिसतो. आधुनिक युगामध्ये ही वंशवाद हा राष्ट्रवादाच्या विस्तारात महत्वाची भूमिका पार पाडतांना दिसतो आहे. उदा. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर बोस्निया, युगोस्लाव्हियात, हर्जेगोव्हिएन्स, क्रोटस इ. राष्ट्रवादी संघर्ष याची ठळक उदाहरणे आहेत.

**राष्ट्र - राज्याचा विकास :-**

आधुनिक राज्य ही राष्ट्र - राज्य मानली जातात. राष्ट्र राज्य स्वरूप धारण करण्याअगोदर राज्यास दीर्घकालीन प्रवास करावा लागलेला आहे. राज्य एक प्रकारे अनेक शतकांच्या

क्रमिक विकासाचा परिणाम होत. बर्गेस यासंदर्भात म्हणतात, राज्य अपूर्व तथा अव्यवस्थित रूपाने आरंभ होऊन संत गतीने विकसित होताना मानव जातीचे पूर्ण तथा विश्वव्यापी संघटनेचे घेत रुप आहे. राष्ट्र - राज्याचा विकास पुढील प्रमाने स्पष्ट करता येईल.

1) **भटक्या टोळ्या:-**

भटकणारी रानटी टोळी ही राज्याची प्राथमिक अवस्था मानली जाते. प्रत्येक टोळी ही स्वयंपूर्ण असे व टोळीतील घटकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम टोळीचे प्रमुख करीत असत. प्राथमिक अवस्थेतील मानवाच्या राजकीय जीवनाच्या दृष्टीने विचार करता ही होळीची नियंत्रणावस्या पुरेशी होती. मानवाचे भटके जीवन संपून ज्यावेळी स्थिर जीवनास प्रारंभ झाला त्यावेळी ही नियंत्रणे व राजकीय यंत्रणा अपूरी पडू लागली. त्यामुळे स्थिर जीवनात प्रारंभ झाल्या बरोबर होळीच्या अधिपत्या खालील जमीन निश्चित झाली. त्यातून कुटुंब निष्ठा रक्तसंबंधनिष्ठा व टोळीशी निष्ठा यांच्याबरोबर भू निष्ठेचा सामुदायिक बंध किंवा हितसंबंध निर्माण झाला. त्यातूनच एक नवीन प्रादेशिक निष्ठा जन्मास आली. रक्त संबंध व प्रादेशिक निष्ठा याच्या समन्वयातून प्रादेशिक राज्य निर्माण झाले.

या कालखंडात टोळीच्या सरदारास सत्ता बहाल करण्याकरीता एक सभा कार्यरत असे. ही सभा आदिवासी आप्तजन समूहांवर आधारलेली असे, तर काही टोळ्या जात, धर्म व आर्थिक हितसंबंधांमुळे एकत्र जोडले गेले होते व शत्रूचा मुकाबला करण्यासाठी एकजूटीने लढत असत. आस्ट्रेलियातील आदिवासी संघटना या स्वरूपातील राज्याचे उत्तम उदाहरण प्रस्तुत केले जाते.

2) **प्राचीन भारतातील गणराज्य:-**

प्राचीन भारतामध्ये गणराज्याचे अस्तित्व निसंशय स्वरूपात मान्य केले जाते. मात्र त्यांचे स्वरूप नेमके काय होते याबाबत मात्र पुरेशी स्पष्टता आढळत नाही. प्राचीन भारतामध्ये गणराज्याचे अस्तित्व होते हे आपणास बुद्ध वाङ्मय, महाभारत, कौटिल्याचे अर्थशास्त्र, पानिनीचे व्याकरन, ग्रीक इतिहासकारांचे वाङ्मय इत्यादीच्या आधारे स्पष्ट होते. प्रो. अळतेकर व अग्रवाल यांनी या संदर्भात अलिकडच्या काळात मूलगामी स्वरुपाचे संशोधन केल्याचे आढळते. त्यांच्या मते "भारतातील प्राचीन गणराज्य व ग्रीकांची नगरराज्य यांचात साम्य होते. तथापि भारतातील गणराज्यां विषयी ग्रीक नगरराज्याच्या तुलनेत फारच कमी माहिती उपलब्ध आहे. मात्र दोन्ही ठिकाणी धर्मबंधनातून निर्माण होणारी एकता अस्तित्वात होती. राज्याच्या कारभारामध्ये भाग घेण्याची संधी दोन्ही ठिकाणी समाजातील फार मोठ्या वर्गास मिळत नव्हती. ग्रीक नगरराज्यात स्त्रिया, मुले, गुलाम व परकीय यांना मताधिकार नव्हता. भारता मध्ये क्षत्रिय स्वायत्त जमातीन ब्राम्हण व वैश्यांना स्थान नसावे व क्षुद्रतर सर्वत्र वगळले जात. भारतीय गणराज्याच्या विस्तारा बाबत निश्चित काही सांगता येत नाही. ग्रीकांची नगरराज्ये ही किल्ल्याच्या सभोवती वसवली जात. भारतातील नगरे तटबंदीच्या आत वसवली जात.

3) **ग्रीक नगरराज्य:-**

ग्रीस हा देश डोंगराळ व बेटांचा प्रदेश आहे. ग्रीस मधील विशिष्ट भौगोलिक परिस्थिती मुळे टोळ्यांचे विविध भागात वास्तव्य होते. त्या भागावरच टोळ्यानी कालांतराने आपले राज्य निर्मान केले. त्यालाच नगरराज्य असे संबोधले जाते. ग्रीसमधील नगर राज्य ही साधारणतः एक- एका शहरापुरती मर्यादित होती. तत्कालिन ग्रीस मध्ये 150 हुन अधिक नगरराज्य अस्तित्वात होती. अथेन्स व स्पार्टा ही नगरराज्य सर्वार्थाने संपन्न नगरराज्य म्हणून ओळखली जातात. ग्रीस नगर राज्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

i) ग्रीक नगर राज्य क्षेत्रफळ व लोकसंख्या या दोन्ही दृष्टीने मर्यादित होते.

ii) नगरराज्याच्या कामकाजात भाग घेणाऱ्या व्यक्तिनांच नागरिकत्वाचा दर्जा प्राप्त होता. स्त्रिया, गुलाम, लहान मुले यांना नागरिकत्वाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते.

iii) ग्रीस मध्ये नगर राज्यात जनतेचे नागरीक गुलाम व परकीय असे तीन वर्ग होते. यातील परकिंय या गटास काही मर्यादित स्वरूपाचे अधिकार होते. मात्र गुलामांना मात्र कोणताही अधिकार नव्हता.

iv) ग्रीक नगर राज्यात शासन संस्थेचे प्रतिमान म्हणून राजसत्ता, लोकसत्ता व उमराव सत्ता असे तीन प्रकार प्रचलित होते.

v) ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रतिमान प्रचलित व लोकप्रिय होते.

अशा पद्धतीची नगरराज्ये इ.स. पूर्व चौथ्या शतकात अस्तित्वात होती, परंतु मर्यादित भूप्रदेश, कमी लोकसंख्या, नगरराज्यांची स्वंयकेंद्री वृत्ती, त्यांच्यामधील एकतेचा अभाव, स्वातंत्र्याच्या अतिरेकी कल्पना यासारख्या कारणामुळे ही नगरराज्य दुर्बल ठरली व मॅसिडोनियाच्या प्रबळ सत्तेपुढे ही नगरराज्ये नामशेष झाली.

4. **पौर्वात्य साम्राज्य:-**

शेतीच्या शोधामुळे मानवी जीवनात अनेक क्रांतीकारक बदल घडून आले त्यास राज्य हा घटक ही अपवाद करता येणार नाही. शेतीच्या शोधामुळे वालुकामय व डोंगराळ प्रदेशातील मानवी वस्ती नदी काठच्या भूप्रदेशात स्थायिक झाल्या. त्यातूनच युक्रेटिस, तैग्रीस, नाईल, गंगा, सिंधु, यांगल्सी व पीत नद्यांच्या खोऱ्यामध्ये मानवी वस्ती मोठ्या प्रमानात वाढली. त्यातूनच शहरे निर्माण झाली. अनेक नगरराज्य निर्माण झाली. त्यातूनच कर्तृत्ववान गणराज्य प्रमुखांनी शेजारच्या नगरराज्यावर आक्रमण करून आपल्या राज्याचा विस्तार वाढविला. दुर्बल व लहान नगरराज्ये त्यांनी पादाक्रांत केली. गणराज्याचे रूपांतर साम्राज्यात झाले. ही साम्राज्य मानवी संस्कृतीची केंद्रे बनली. शासन व्यवस्था, सैनिकी व्यवस्था, साहित्य, कला इत्यादी बाबतीत ही साम्राज्ये श्रेष्ठ ठरली. सुमेरियन, पर्शियन, इजिप्शियन, बॅबिलोनियन, चिनी, भारतीय साम्राज्य याचीचं उदाहरणे होत.

या साम्राज्यांमध्ये सम्राटाची सत्ता ही एकमेव होती. अशा साम्राज्यातील समाजात जाती व सामाजिक भेद निर्माण झाले. मंदिर पूजेला महत्व प्राप्त झाले. पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला. सामान्य जनतेची राहणी व दर्जा सुधारण्याबाबत सम्राटानी काहीही कृती केली नाही. शिवाय राजकीय व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करावयास ही साम्राज्य अपयशी ठरली. त्यातच साम्राज्यांमध्ये सत्तास्पर्धा निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणून साम राज्यांमध्ये परस्पर युद्धे होऊ लागली. या साम्राज्याने संकुचित व स्थानीय स्वरूप नष्ट केले व लोकांमध्ये प्रादेशिक सत्तेशी निष्ठावंत रहाण्याची सवय निर्माण केली.हे पौर्वात्य साम्राज्याचे एक योगदान मानावे लागेल.

5) **रोमन विश्वसाम्राज्य**

राज्याचा विकासामध्ये रोमन साम्राज्याचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते, इ. स. पूर्व 500 च्या सुमारास रोम हे एक छोटेस नगरराज्य होते. कालांतराने रोममध्ये राजसत्ता आली. रोमच्या राजाने साम्राज्यविस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. इटलीमधील भौगोलिक परिस्थितीमुळे रोमन नगर राज्य रोमच्या नेतृत्वाखाली संघटित झाली. रोमन सत्ताधारी वर्गाने युद्धात जिंकलेल्या सर्वच नगर राज्यातील नागरिकांना नागरिकत्व दिले. त्यामुळे सर्वच राज्यांमध्ये एकता निर्माण झाली. दरम्यानच्या काळात ख्रिश्चन धर्माचा प्रसार ही मोठ्या प्रमाणात झाला व रोमन सम्राट ईश्वराचा प्रतिनिधी आहे, त्याची आज्ञा म्हणजे ईश्वराची आज्ञा ही विचारसरणी मान्यता पावली. या रोमन साम्राज्याचा विस्तार युरोप, आशिया व आफ्रिका खंडात झाला. निरनिराळ्या प्रदेशातील लोकांना एकाच राज्याच्या नियंत्रणाखाली आणण्याचे कार्य रोमन साम्राज्याने केले. शासन संस्थेचे केंद्रीकरण, विधी नियमांची समानता, सुसंघटीत राज्यव्यवस्था, नागरिकत्व व स्थानिक कारभाराच्या संस्था व सार्वभौमत्व याबाबत अनेक चांगल्या बाबी रोमन साम्राज्यात निर्माण झाल्या. विश्व साम्राज्याची कल्पना काही प्रमाणात रोमने सत्य स्वरूपात आणली. रूम सारखे विशाल व अनेक देशातील अनेक लोकांचे साम्राज्य सुस्थिर तसेच सुव्यवस्थित स्वरूपात चालू शकते हे रोमन साम्राज्याने सिद्ध केले. सार्वभौम सत्ता, राजकीय विधी नियमांची समानता व राजकीय एकता ही तत्वे रोमन साम्राज्याने जगास दिली. गेटेल रोमन साम्राज्याचे महत्त्व अधोरेखित करताना म्हणतात, “ ग्रीकांनी एक ते शिवाय लोकशाहीचा विकास केला परंतु रोमन साम्राज्याने लोकशाही शासना शिवाय लोकांमध्ये ऐक्य निर्माण केले.”

6) **सरंजामी राज्य :-**

रोमन साम्राज्य ई.स. पाचव्या शतकामध्ये लयास गेले व नवीनच अशी सरंजामी राज्यपध्दती तीच वाट आली. ती पुढे पंधराव्या शतकापर्यंत म्हणजे जवळपास एक हजार वर्ष अबाधित होती. रोमन साम्राज्याच्या अध:पतनानंतर सरजामशाहीचा विकास झाला. रोमन सम्राटाने मांडलिक राज्यांना सत्ता व अधिकार दिले होते. मांडलिक राज्य रोमन साम्राज्याशी एकनिष्ट होती. मांडलिक राज्यांनी शाशनाच्या सोयीकरीता आपल्या प्रदेशाचे लहान- लहान विभाग पाडले. त्या विभागाचा प्रमुखास

सरंजामदार असे म्हणत. सरंजामदारांच्या वर्गामध्ये लष्करी अधिकारी, संरक्षणासाठी नेमलेले अधिकारी व धर्मगुरू यांचा समावेश होता. सरंजामदार मांडालिक राजांच्या मध्यस्थीने सम्राटास जबाबदार होते. रोमन साम्राज्यशाही नष्ट होताच सरजामदारांमध्ये सत्तास्पर्धा सुरु झाली व त्यातूनच सरंजामशाही निर्माण झाली.

सरंजामशाही राज्यामध्ये समान नागरिकत्व व समान विधिनियमांचे अस्तित्व नव्हते त्यामुळे सरंजामशाही व्यवस्थेस राज्य ही संज्ञा वापरता येणार नाही अशी ही टिका केली जाते. सरंजामशाहीच्या काळात अनेक स्तरावर संघर्षात वाढ झाली. मालक व भुदास, धर्मसत्ता व राज्यसत्ता यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष सुरु झाले. परिणामी सरंजामशाही व्यवस्थेमध्ये गोंधळ, विस्कळितपणा व एक सूत्र तेचा अभाव इत्यादी कारणामुळे सरंजामशाहीचा शेवट झाला.

7) **राष्ट्र-राज्य व्यवस्था :**

15 व्या व 16 व्या शतकापासून यूरोपमध्ये राष्ट्र राज्याचा उदय घडून येण्यास प्रारंभ झाला. तत्कालिन परिस्थिति मध्ये जमीनदार व धर्मगुरूंची सत्ता क्षीण झाली व नव्या आर्थिक संबंधा बरोबरच लोक राष्ट्रीयत्व, भाषा सांस्कृतिक एकता तसेच देशाच्या भौगोलिक सीमा इत्यादीच्या विचाराने एकसंध अशा स्थायी स्वरूपाच्या समूह हात परस्परांशी जोडले गेले. अशा पद्धतीने प्रथमतः फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, स्वित्झर्लंड, नेदरलँड, रशिया व कालांतराने जर्मनी व इटलीमध्ये राष्ट्र राज्याचा विकास झाला. प्रारंभीच्या राष्ट्र-राज्यात राजेशाही प्रचालित होती. ज्यामध्ये सर्व सत्ता राजा अथवा सम्राटाच्या हातात केंद्रित झालेली असे. परंतु 18 व्या शतकात यूरोपात संविधानिक शासनाचा उदय झाला. इंग्लंडमध्ये हे स्थित्यंतर शांततामय रित्या तर फ्रान्समध्ये ते क्रांती द्वारे घडून आले.

18 व्या 19 व्या शतकामध्ये यूरोपमधील प्रमुख राष्ट्रांनी आपापले राष्ट्र प्रबळ केल्यानंतर आर्थिक समृद्धी करीता वाहतवादाचा आधार घेतला. या स्पर्धेमध्ये ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगाल इत्यादी देशांनी आशिया, अफ्रिका व दक्षिण अमेरिकेत आपल्या वसाहतवादाचे जाळे पसरवून त्या देशांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले.

दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र वसाहतवादाच्या पतनास प्रारंभ झाला. 20 व्या शतकाच्या मध्यावर त्यातूनच अनेक नवी राष्ट्रीय जगाच्या नकाशावर अवतरली. या नव्याने स्थापन झालेल्या राष्ट्रांना अनेक राजकीय व आर्थिक विकासाच्या गंभीर समस्येचा सामना करावा लागला. या नव्याने स्थापन झालेल्या राष्ट्र-राज्यांची प्रमुख समस्या म्हणजे समाजातील भिन्न जात, धर्म, संस्कृती, भाषा या संकुचित भावनेतून बाहेर काढून त्यांना एका राष्ट्रीयत्वाच्या धाग्यात बांधावे लागेल यासाठी त्यांच्या भाव - भावनांचा विचार करूनच हे साध्य करता येईल.

**राष्ट्र-राज्य व्यवस्थेतील समकालीन पेच :-**

मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांमध्ये भिन्न स्वरूपाच्या राजकीय व्यवस्था अस्तित्वात आल्या; परंतु यातील कोणतीही व्यवस्था लोकांस स्थायी स्वरूपाची शांतता व सुरक्षा

प्रदान करू शकली नाही. प्राचीन ग्रीक नगर राज्यापासून सरंजामशाही व्यवस्थेपर्यंत विश्वासास पात्र ठरल्या नाहीत. समकालिन राष्ट्र-राज्य यवस्थेस मानवतेस सुरक्षा व शांतता प्रदान करण्यात मध्ययुगीन व्यवस्थेपेक्षा कार्यक्षम असल्याचे सिद्ध झाले आहे. तरीही बदलत्या काळात व बदलत्या परिस्थितीमध्ये आपल्या भूमिका पार पाडण्यात राष्ट्र राज्य व्यवस्थेस ही मर्यादा पडत आहेत हे स्पष्टपणे दिसते. त्यामुळेच 21 व्या शतकामध्ये नव्याने विश्व राज्याची संकल्पना मांडली जात आहे जी मानवतेच्या आशा व आकांक्षा ची पूर्तता करण्यात अधिक कार्यक्षम ठरेल. परंतु राज्याचे भावी स्वरूप कसे असेल या संदर्भात अद्यापही निश्चित मांडणी होताना दिसत नाही.

समकालीन काळामध्ये सर्वसाधारणतः राष्ट्र व राज्यास मध्यवर्ती मानली जाते परंतु अशी अनेक उदाहरणे सांगता येतील यामध्येही दोन्ही घटीते भिन्न स्वरूपाची आहेत. आज जगामध्ये अनेक भागांमध्ये असे समुदाय आहेत जे समाज संस्कृती, भाषा व धर्माच्या आधारे एकत्वाचा अनुभव घेतात व राष्ट्रीय जाणिवेचा उदघोष करतात. परंतु ते स्वतःस एका राज्याच्या या स्वरूपात संघटित करू शकत नाहीत. उदा. कुर्द लोक इराण इराक व तुर्कस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात विखुरलेले आहेत. मात्र तरीही ते स्वतःस एक राष्ट्र मानतात. शिवाय समकालीन संदर्भात हेही वास्तव आहे की, अशी अनेक राज्य आहेत ज्यामध्ये भिन्न भिन्न समूहांचे सह अस्तित्व आहे. मात्र ते स्वतः एका राष्ट्रात परावर्तित करू शकलेले नाहीत. लेबनान व सायप्रस याचे महत्त्वाचे उदाहरण होय.

आपल्या देशातील नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणे हे राष्ट्र राज्याचे प्रधान कार्य होय. परंतु राष्ट्र राज्याच्या या प्रमुख कार्यावर ही आधुनिक शस्त्रास्त्रांच्या विकासामुळे मर्यादा आलेल्या दिसतात. हवामान बदल, प्रदूषण, एड्स, कोरोना सारख्या महामारी यामुळे राष्ट्र राज्यावर मर्यादा पडत असताना दिसतात. समकालीन संदर्भामध्ये दळणवळणाच्या साधनांमध्ये झालेली वाढ ही एका बाजूस विकसनशील देशांच्या विकासास सहाय्यभूत ठरत असतानाच् दुसऱ्या बाजूने बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या या वाढत्या प्रभुत्व वास व विकसनशील राष्ट्रांच्या सूचना ही कारणीभूत ठरत आहे.

एकंदरीत सद्य परिस्थितीमध्ये राष्ट्र राज्याच्या क्षमता बऱ्याच प्रमाणात सीमित झालेल्या दिसून येतात. त्यामुळे मानव व त्याचे संरक्षण व सुख शांतते करिता वैश्विक पातळीवर अशा संघटनेची निर्मिती अपेक्षित आहे जी भिन्न राष्ट्रात जवळचे संबंध प्रस्थापित करू शकेल व संपूर्ण विश्वासमोर संकट म्हणून पुढे आलेल्या विनाशकारी शक्तींवर विजय प्राप्त करील.

## 4.3 राष्ट्र राज्याचे घटक

राष्ट्रवादाचे प्रेरक घटकः- राष्ट्रवादाचा उदय, विकास व विस्तार यास अनेक घटक कारणीभूत झालेले दिसतात. कालखंड, प्रदेश व समाज परत वीर राष्ट्रवाद निर्मितीमध्ये हे घटक वेगवेगळे व एकत्रितपणे कार्य करताना आढळतात. यातील प्रत्येक घटक महत्त्वाचा असला तरी तो अपरिहार्य असेलच असे नाही. या प्रेरक घटकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

1) **भौगोलिक एकता:-**

भौगोलिक एकता व समान भूगोल हा घटक राष्ट्रवादाच्या प्रेरक घटकांमध्ये प्रमुख घटक मानला जातो. प्रो. बर्जेस यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की," भौगोलिक रिक्त असलेल्या प्रदेशात वस्ती करणार व वांशिक एकता असलेला लोक समुदाय म्हणजे राष्ट्र होय. याचाच अर्थ समुहात राष्ट्रवादाची भावना उत्पन्न करून ती विकसित करण्यात समान भूप्रदेशाची भूमिका महत्त्वाची असते. भौगोलिक एकतेमुळे समाजात भौगोलिक दृष्ट्या मानसिक एकता निर्माण होते. कारण साधारणतः विशिष्ट भूप्रदेशात वसाहत करणाऱ्या लोकांची शरीरयष्टी, मानसिक प्रवृत्ती व स्वभाव व गुणवैशिष्ट्ये यावर त्या भूप्रदेशाची नैसर्गिक रचना, हवामान व उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्री यांचा परिणाम होत असतो.

भौगोलिक एकता व भूमी हे राष्ट्रवाद संस्काराचे प्रतीक ठरलेले दिसते. मात्र ही भूमी सलग असावी की मिलन याबाबत राज्य शास्त्रज्ञांमध्ये मतमतांतरे आढळतात. समान भूप्रदेशातून वा सलग भूमी मुळे राष्ट्रीय भावना निर्माण होऊन विकसित होते हे खरे असले तरी सलग भूमी मध्येच फ्रान्स, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल ही भिंत राष्ट्र राज्ये व त्यातील भिन्न राष्ट्रवाद निर्माण झालेला दिसून येतो. याउलट इंग्लंड व जपान हे राष्ट्रे बेटांचा समुदाय आहेत. आहेत तरी त्यांचा एक राष्ट्रवाद विकसित झाला आहे. रेनान यासंदर्भात असे प्रतिपादन करतात की, " केवळ भूमी मुळे राष्ट्र तयार होत नाही. ही माणूस हा राष्ट्रवादाचा आत्मा आहे. राष्ट्र हे एक अध्यात्मिक तत्व आहे. इतिहासाच्या गुंतागुंतीच्या घडामोडींचा तो परिणाम आहे. आहे एक अध्यात्मिक एक कुटुंब आहे. हे केवळ जगाच्या भौगोलिक रचनेने ठरलेला समूह म्हणजे राष्ट्र नव्हे." याचे प्रबळ उदाहरण म्हणून ईस्त्राईल चा दाखला दिला जातो. पॅलेस्टाईन ची भूमी उपलब्ध नसतानाही दुसऱ्या महायुद्धापूर्वी ज्यूं चे राष्ट्र व राष्ट्रवाद अस्तित्वात होता. भूमी प्राप्त झाल्यानंतर त्यांचे राष्ट्र राज्य साकार झाले.

2 ) **वांशिक एकता:-**

समान वंश वा वांशिक एकता हा राष्ट्रवादाचा सर्वात प्राचीन घटक मानला जातो. समान वंशाच्या लोकांमध्ये परस्पर आपुलकीची भावना नैसर्गिकरीत्या निर्माण होते. या घटकामुळेच स्वकीयांबद्दल आत्मीयता व परकीयांबाबत परकेपणाची भावना निर्माण होते. झिमर्न, बर्जेस व लिकॉक यांनी वंश या घटकास राष्ट्रवादीचा मुख्य प्रेरक घटक मानले आहे. तर ब्राईस, मॅझिनी, रेनान सारखी विचारवंत मात्र राष्ट्रवादाचा प्रेरक घटक म्हणून वांशिक एकतेस दुय्यम स्थान देतात. या विचारवंतांच्या मते, आधुनिक समाजात वंश संकर वाढीस लागल्याने वांशिक एकता घटक दुय्यम मानावा लागेल. प्रो. हेस यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, ' की आज जर कुठे वांशिक शुद्धता असेलच तर ती असंस्कृत टोळ्यांमध्येच शक्य आहे."

वंशी भिन्नता हा घटक आजही अनेक मध्ये संघर्षाचे प्रमुख कारण ठरते आहे. सायप्रस मधील ग्रीक व दुर्ग, रशियामधील स्लॉव्ह व बोस्नियन, अमेरिकेतील काळे व गोरे, भारतातील आर्य व द्रविड ही याचीच उदाहरणे होत. त्यामुळे राष्ट्र राज्यात वांशिक एकता या घटकास दुर्लक्षित करून चालणार नाही हे ही तेवढेच खरे.

3) **भाषिक एकता:-**

राष्ट्रवाद ही एक मानसिक अवस्था व भावना मानली जाते. भाषा हे भावना अभिव्यक्ती करण्याचे प्रधान साधन होय. त्यामुळे राष्ट्रवादाच्या भावनेचा प्रसार वेगाने घडून येण्यात भाषा या घटकाचे स्थान महत्त्वाचे आहे. भाषिक एकता असणाऱ्या लोकांमध्ये भावनिक व वैचारिक आदान-प्रदाना ची प्रक्रिया गतिमान असते व ती त्यांच्यात एकत्वाची भावना निर्माण करण्यात उपयुक्त ठरते. प्रो. रॅस्मे मूर म्हणूनच राष्ट्र निर्मितीच्या कार्यात भाषेची एकता या घटकास महत्त्वपूर्ण स्थान देतात. भाषा या घटकाचे राष्ट्रवादाच्या जडणघडणीतील योगदान स्पष्ट करताना जोसेफ असे म्हणतात की, " समान भाषेमुळे नीतिमूल्ये, चालीरीती, परंपरा इ. बाबतीत केवळ समान आदर्श निर्माण होतात. एवढेच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राचा मानसिक पिंडच एकात्म करू शकतो."

भाषिक एकता या तत्त्वाचे राष्ट्रवादाच्या उभारणीतील स्थान युरोपियन राष्ट्रांच्या राष्ट्रउभारणीत प्रकर्षाने प्रत्ययास येते. उदा. इंग्लंडमध्ये केल्टा, नॉर्मन, सॅक्शन, जर्मन असे वांशिक मिश्रण असले तरी इंग्रजी या समान भाषेमुळे इंग्लिश अस्मिता तयार झाली व इंग्लंड हे राष्ट्र-राज्य निर्माण झाले. फ्रांस, इटली, जर्मनी, स्पेन ही राष्ट्र-राज्य ही भाषिक आधारावरच निर्माण झालेली आहेत. तर भाषिक विभिन्नता राष्ट्राचे विघटन घडवून आणू शकते हे पाकिस्तानच्या विभागणीतून जगाने बांग्लादेशच्या स्वरूपात अनुभवले आहे. तरीही आधुनिक समाजामध्ये राष्ट्रवादाची प्रमुख प्रेरणा म्हणून भाषा या घटकाकडे पाहिले जात नाही. तो अगदीच अपरिहार्य घटक आहे असे वाटत नाही. भारत व स्विझरलँड याचे उत्तम उदाहरण होय.

4) **धार्मिक एकता:-**

धर्म हा मानवी जीवनाच्या प्रतेक टप्प्यावर प्रभावी घटक म्हणून कार्यरत असलेला दिसतो. धर्म ही व्यक्ती आणि समाज यातील एक आस्थेची बाब मानली जाते. मध्ययुगामध्ये विशेषता युरोपियन देशांमध्ये राष्ट्रवादाची प्रेरक शक्ती म्हणून धर्म या घटकाने महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. युरोपमध्ये प्रारंभीच्या काळात राष्ट्र राष्ट्रवाद निर्मितीस ख्रिश्चन धर्म व संप्रदाय हे घटक प्रेरक राहिलेले दिसतात. ज्यू धर्मीयांची इस्त्राईली भावना या राष्ट्रवादाचे प्रखर उदाहरण होय. पाकिस्तानच्या निर्मिती असलेली इस्लामची भूमिका, श्रीलंकेत बौद्ध धर्माचे असणारे स्थान राष्ट्रवादाच्या उभारणीत धार्मिक एकतेच्या तत्वाची ताकद दाखविण्यास पुरेशी आहेत.

आधुनिक काळामध्ये मात्र धर्म या घटकास राष्ट्रवादाची प्रमुख प्रेरणा मानले जात नाही. समान धर्म हा राष्ट्रवादाची प्रेरक शक्ती म्हणून सहाय्यक ठरू शकत असला तरी तो अपरिहार्य घटक मात्र ठरू शकत नाही हे जगभरातील विविध देशांच्या अनुभवातून प्रत्ययास येते. समकालीन संदर्भात तर धर्मनिरपेक्ष राज्याचे प्रतिमान



munotes.in

अधिक गतिमान व उपयुक्त ठरत असल्याचे दिसते. प्रो. हेस या संदर्भात म्हणतात, " बहुतेक आधुनिक राष्ट्रीय समाज धार्मिक विश्वासाचा आणि व्यवहारांचा आग्रह न धरता विकास पावतात."

5) **सांस्कृतिक एकता:-**

समाजशास्त्रज्ञ राष्ट्रवाद हा सांस्कृतिक संकल्पना मानतात. समाजातील सांस्कृतिक एकता ही राष्ट्रवादाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो. समाजामध्ये सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यात समाजाच्या स्वीकृत रूढी, परंपरा, चालीरीती, साहित्य, लोकवाङ्मय, महाकाव्य, कला अविष्कार, तंत्रज्ञान, शिक्षण व नीतिनियम यांची महत्त्वाची भूमिका असते. या सर्व घटकातील समान स्वीकृत बंधामुळे परस्पर आपुलकी, अभिमान, सहजीवन व दृष्टी प्राप्त होते जी राष्ट्रवादाची भावना वाढीस लावण्यास उपयुक्त ठरते. सामाजिक संस्कृती राजकीय संस्कृती घडवीत असते. व राजकीय संस्कृतीच्या प्रभावात राजकीय व्यवस्था कार्यरत राहतात. राष्ट्रीय अस्तित्व अबाधित ठेवण्याकरिता व्यवस्था सामाजिक संस्कृती हेतूपुरस्पर घडवितात. त्याकरिता राष्ट्रीय शिक्षण, साहित्य, कला, नैतिकता, परंपरा व प्रथा यांचा आग्रह राष्ट्र राज्य धरतात. याचाच एक भाग म्हणून प्रत्येक देशात राष्ट्रीय दिन, राष्ट्रीय खेळ, राष्ट्रीय घटनांचे महोत्सव इत्यादी चा उपयोग राष्ट्रवादाची भावना सतत सतेज ठेवण्याकरिता केला जातो.

6) **समान इतिहास:-**

इतिहास हा राष्ट्रवादाच्या प्रेरणा घटकांमध्ये महत्त्वाची भूमिका घडवतो. इतिहासामध्ये समाजात भूतकाळात घडलेल्या घटना, चळवळी, निर्माण झालेले विचार प्रवाह, लागलेले शोध, इत्यादीची कालमानानुसार नोंद केलेली असते. इतिहास हा राष्ट्रीय संस्कृती निर्माण करणारा महत्त्वाचा घटक ठरतो. इतिहासातील घटना व घडामोडींनी, त्यांच्या वाचन व मननाने तरुणांना प्रेरणा प्राप्त होतात. यातून राष्ट्र व राष्ट्रवाद विकसित होतो. रॅम्मे मूर या संदर्भात म्हणतात की, " ऐतिहासिक पराक्रम, वीरश्री ने सोसलेली संकटे आदींमुळे राष्ट्रीय भावनेच्या सुदृढ वाडीस खतपाणी घातले जाते." तर जे. एस. या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, " राष्ट्राचा गौरवपूर्ण इतिहास व त्यासंबंधी स्मृती, ऐतिहासिक घटना संबंधी वाटणाऱ्या अभिमान आणि अपमान, सुख आणि दुःख अशा सामुदायिक भावना या राष्ट्रवादाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतात." एकंदरीत इतिहासामुळे राष्ट्राभिमान, राष्ट्रीय प्रेम निश्चितच द्विगुणित होतो. त्यामुळेच राष्ट्र राज्य आपापल्या राजकीय व्यवस्थेस अनुकूल असे इतिहासाचे पुनर्लेखन करून घेताना आढळतात.

7) **समान आर्थिक हितसंबंध:-**

समान आर्थिक हितसंबंध हा घटक आधुनिक काळात राष्ट्रवादाचा प्रेरक घटक म्हणून प्रामुख्याने पुढे आलेला दिसतो. आर्थिक संबंध जपण्यासाठी एकत्र कृती करण्यातून एक विशिष्ट अस्मिता घडण्याची प्रक्रिया पार पडते. ती विशिष्ट राष्ट्रीय

भावना विकसित होण्यास पूरक ठरते. ' अमेरिका राष्ट्रवाद' याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची मुख्य प्रेरणा ही समान आर्थिक हितसंबंधच होती. वंश, व, धर्म, संप्रदाय यामध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता असूनही या सर्व प्रतिकूल घटकांवर मात करून अमेरिकन राष्ट्रवाद विकसित झाला त्याची मुख्य प्रेरणा समान आर्थिक हितसंबंध हीच होती. स्वित्झर्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया या राष्ट्र राज्यास ही आज आर्थिक घटकच राष्ट्रवादाचे मुख्य प्रेरक घटक म्हणून सहाय्यक ठरताना दिसतात. अर्थात राष्ट्रवादाचा प्रेरक घटक म्हणून आर्थिक हितसंबंधातील समानतेचे तत्व सार्वत्रिक स्वरूपात मान्य होऊ शकत नाही. रेनॉन यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की," आर्थिक हितसंबंधाच्या एकात्मते मुळे जमातींचा संघ निर्माण होतो राष्ट्र नव्हे." युरोपियन महासंघ व तत्सम आर्थिक आधारावर निर्माण झालेले संघ याचे उदाहरण म्हणून आपल्यासमोर आहेत. या व्यापारी संघामुळे सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक संबंध निर्माण झालेले असते तरी प्रत्येक राष्ट्राचे अस्तित्व व अस्मिता अबाधित आहे.

8) **समान राजकीय आकांक्षा:-**

आपली स्वतःचे स्वतंत्र राष्ट्र असावे या आकांक्षेतून लोक ज्यावेळी एकत्र येतात त्यातून त्यांच्यात ऐक्याची भावना अधिक तीव्र होते. लोकांमध्ये धर्म, वंश, भाषा, संस्कृती इत्यादी बाबतीत भिन्नता असली तरी त्यांच्यामध्ये समान राजकीय जीवन जगण्याची भावना निर्माण होऊ शकते. हा समकालीन कालखंडातील सार्वत्रिक अनुभव आहे. अशा परिस्थितीत लोक जर पारतंत्र्यात असतील तर स्वातंत्र्य प्राप्ती करणे हाच त्यांच्या राष्ट्रीय ऐक्याचा मूलाधार ठरतो. लोक साम्राज्यवादास विरोध करतात. झिमर्न यांनी या संदर्भात असे म्हटले आहे की, " राजकीय दडपशाहीमुळे राष्ट्रवादी भावना बळावते व स्वातंत्र्य चळवळीला प्रोत्साहन मिळते. समान राजकीय आकांक्षा व हितसंबंध निर्मितीस दुसरा पूरक घटक म्हणून समान शासन व्यवस्थेच्या घटकाचा उल्लेख केला जातो. एकाच शासनाच्या अंमलाखाली असणे, त्या शासनाचे एकच राजकीय धोरण, कायदा, प्रशासन, न्याय यामुळे देखील राष्ट्रवादाच्या भावनेस पूरक परिस्थिती निर्माण होऊ शकते. अर्थात समान शासनव्यवस्थेचे अस्तित्व असूनही राष्ट्रवाद ऐवजी अलगाव वाद फोफाऊ शकतो. याचा अनुभव पाकिस्तान, सोव्हिएट रशिया, सायप्रस या देशांच्या विघटनातून मिळतो.

सारांश, राष्ट्रवादाच्या प्रेरक घटकांच्या या मांडणीतून हे स्पष्ट होते की, भूप्रदेश, वंश, भाषा, धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा तसेच राजकीय व आर्थिक हितसंबंध यापैकी काही घटक एकाच वेळी राष्ट्रवाद निर्मितीस होतातच असे नाही. या घटकांच्या बरोबरीने समाज घटकात एक सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवन जगण्याची तीव्र इच्छा असणे ही अनिवार्य असते. त्यामुळेच टॉयन्वी यांचे पुढील विधान संयुक्तिक वाटते, " एक राष्ट्रीय जीवन जगण्याची इच्छा हाच राष्ट्रवादाचा सर्वात प्रमुख घटक होय."

**राष्ट्रवादाचे प्रकार:-**

राष्ट्रवादाच्या प्रकाराबाबत विचारवंतांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद आढळतात. राष्ट्रवादीचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1. जॅकोबीन राष्ट्रवाद :**

जी. पी. गुच यांनी राष्ट्रवाद आस फ्रेंच राज्यक्रांती चे अपत्य अशी उपमा दिली आहे. कारण प्रबोधन व धर्मसुधारणा चळवळ यांनी राष्ट्रवादाची आवश्यक पार्श्वभूमी तयार केली असली तरी राष्ट्रवादाचा खरा उदय 18 व्या शतकामध्ये फ्रेंच राज्यक्रांती च्या माध्यमातून खऱ्या अर्थाने झाला असे मानले जाते. फ्रेंच राज्यक्रांतीने राजसत्ताक फ्रान्सचे रूपांतर लोकसत्ताक राष्ट्र राज्यांमध्ये केले. त्यानंतर सत्तेवर आलेल्या नेपोलियन बोनापार्टने जी युद्धे केली त्यामुळे राष्ट्रवादास नवे स्वरूप, दिशा व परिणाम प्राप्त झाले. फ्रान्समधील या राष्ट्रवादास हेस यांनी 'जॅकोबीन' राष्ट्रवाद असे संबोधले. जॅकोबीन या शब्दाचा अर्थ ' जहाल विचारांचे लोक' असा होतो. जॅकोबीन राष्ट्रवादाचे प्रारंभिक स्वरूप हे लोकशाहीशी सुसंगत होते मात्र पुढे त्यास हुकुमशाही स्वरूप प्राप्त झाले. कारण नेपोलियन बोनापार्ट ने राष्ट्रवादाचा झेंडा हातात घेऊनच युरोपियन जनतेवर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न केला व त्यास प्रतिक्रिया म्हणून नेपोलियन पासून मुक्तता मिळविणाऱ्या गटांनी देखील पारंपरिक राष्ट्रवादाचाच आधार घेतलेला दिसतो.

**2. उदारमतवादी राष्ट्रवाद:-**

राष्ट्रवादाच्या प्रकारांमध्ये उदारमतवादी राष्ट्रवाद महत्त्वाचा मानला जातो. औद्योगिक क्रांती नंतर नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाने व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही व राष्ट्रवाद याचा आग्रही पुरस्कार केला. परिणामी 19 व्या शतकात राष्ट्रवादाचा भौगोलिक विस्तार लोक समर्थन व्याप्ती विस्तृत होऊन त्यांची वैचारिक बैठकही बळकट झाली. याच आधारावर उदारमतवादी राष्ट्रवादाची उभारणी झाली. व्यक्ती विकास व व्यक्ती स्वातंत्र्य प्राप्तीसाठी उदारमतवादी राष्ट्रवादाची उभारणी झाली. व्यक्ती विकास व व्यक्ती स्वातंत्र्य प्राप्तीसाठी राजकीय संस्थांची निर्मिती, लोक भावनांची कदर यासारख्या घटकांना उदारमतवादी राष्ट्रवादात महत्त्व दिले गेले.

उदारमतवादी राष्ट्रवादाच्या स्वीकारा मुळे इटलीचे तसेच जर्मनीचे 19 व्या शतकात एकीकरण घडून ती बलवान राष्ट्र राज्य बनली. ग्रीस, बेल्जियम, पोलंड, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी युरोपियन राज्याबरोबरच अमेरिका खंडातील स्पेन व पोर्तुगाल च्या वसाहतींमध्ये ही राष्ट्रवाद लोकप्रिय झाला. या दरम्यानच्या काळात भारत व अन्य आशिया खंडातील देशातही राष्ट्रवादी चळवळीचा उदय झाला. 19 व्या शतकातील हा राष्ट्रवाद प्रामुख्याने उदारमतवादी मानला जातो. कारण हा राष्ट्रवाद स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, शांतता या मूल्यांना महत्त्व देणारा होता. 20 व्या शतकामध्ये या राष्ट्रवादाचा पाया अधिक व्यापक झाला व हा राष्ट्रवादाचा प्रकार

अधिकच लोकप्रिय झाला. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या व्हर्सायच्या तहात वुड्रो विल्सन यांच्या पुढाकाराने 'स्वयम् निर्णयाचे तत्व' स्वीकारले गेले व अनेक राष्ट्र राज्य नव्याने अस्तित्वात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या व त्यांनीही उदारमतवादी राष्ट्रवादाचा स्वीकार केला. सारांश, उदारमतवादी राष्ट्रवाद जगातील प्रभावी राष्ट्रवादाचा एक प्रकार होय.

3) **सर्वंकष राष्ट्रवाद:-**

पहिल्या महायुद्धानंतर सर्वंकश राष्ट्रवाद प्रामुख्याने विकसित झाला. युरोपमध्ये इटली, जर्मनी, रशिया, स्पेन, पोर्तुगाल या प्रमुख देशांमध्ये सर्वंकष वादी शासन व्यवस्था अस्तित्वात आल्या. आशिया खंडामध्ये ही जापान या विकसित देशात निरंकुश शासन व्यवस्था कार्यान्वित झाली. या सर्व सत्ताधीशांनी एक राष्ट्र, एक नेता, एक विचार, राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय व्यापार, राष्ट्रीय सैन्य, राष्ट्रीय वैभव या कल्पनांचा पुरस्कार करून त्यासाठी व्यक्तीने त्याग करावा अशी भूमिका घेतली. त्यामुळे उदारमतवादी राष्ट्रवादाचे प्रतिमान मागे पडून सर्वंकष वादी राष्ट्रवादाचे आकर्षण वाढीस लागली. व्यक्तिस्वातंत्र्य, समता व बंधुत्व या उदारमतवादी मूल्यां ऐवजी राष्ट्रासाठी कर्तव्य पालन, शिस्त व प्रसंगी आत्मबलिदान ही करावे अशी नवी मुल्ये पुरस्कारीली गेली. राष्ट्र विकासात व्यक्तिविकास समाविष्ट आहे व तो प्राप्त करण्याकरिता व्यक्तीने त्यागास सिद्ध राहावे असा आग्रह धरला जाऊ लागला.

पहिल्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात रशियामध्ये बोल्शेव्हिक क्रांती होऊन साम्यवादी सत्ता प्रस्थापित झाली होती. सोव्हिएट रशिया ने साम्यवादाचे विस्ताराचे धोरण दुसऱ्या महायुद्धानंतर अधिक आक्रमकपणे राबवले. त्यातूनच पोलंड, हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया, युगोस्लॉव्हिया, अल्बानिया, रुमानिया आदि पूर्व युरोपीय देशात तर चीन, उत्तर कोरिया, व्हिएटनाम, लाओस या आशियाई देशात व अमेरिका खंडातील क्युबा सारख्या देशात साम्यवादी सत्ता प्रस्तापित झाल्या तर काही आफ्रिका, आशिया खंडात लष्करी सर्वंकष सत्ता अस्तित्वात आल्या. या सर्व सत्तानी एकपक्षीय अथवा गटाच्या राजवटी खालील आपल्या देशात सर्वंकष राष्ट्रवाद जोपासला.

सर्वंकष वाद हा वंश श्रेष्ठत्व, लष्कर वाद, एकाधिकारशाही, युद्ध यांचा पुरस्कार करून लोकशाही, उदारमतवाद, शांतता यास विरोध करतो. आज त्यात धर्म पुनरुज्जीवन वादी प्रतिगामी राष्ट्रवादाची भर पडली आहे. दुसऱ्या महायुद्धात फॅसिस्ट प्रवृत्ती पराभूत झाल्या व अलीकडील काळात सोव्हिएट रशियातील साम्यवादी राजवट संपली तरी नव फॅसिस्टवाद साम्यवादी पुनरुज्जीवन पुन्हा डोके वर काढत आहे व उदारमतवादी राष्ट्रवादास आव्हान देत आहे.

सर्वंकष राष्ट्रवादास आक्रमक राष्ट्रवाद असेही म्हटले जाते. कारण राष्ट्र वैभवा करिता सैन्य उभारणी, युद्ध सज्जता साम्राज्य प्रस्थापना यांचा आग्रह धरला जातो. युद्धज्वर निर्माण करण्यासाठी वंश, धर्म, संकृती श्रेष्ठत्वाच्या कल्पना

समाजापुढे ठेवल्या जातात. उदा. नाझी जर्मनीत हिटलरने ' आर्य वंश श्रेष्ठत्वाची' कल्पना पुरस्कारून जर्मन समाजात आक्रमक राष्ट्रवाद रुजविला तर इटलीत मुसोलिनीने ' इटलीने साम्राज्य विस्तार करावा अथवा सर्वनाशास सिद्ध व्हावे' असा इशारा देऊन इथिओपियावर आक्रमण केले. जापान च्या सर्वंकष वादाला विस्तार वादा बरोबरच आर्थिक उद्दिष्टांची जोड दिली गेली होती.

4) **विकसनशील देशातील राष्ट्रवाद :-**

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, हॉलंड, पोर्तुगाल, स्पेन व बेल्जियम इत्यादी युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यवादाला आशिया, आफ्रिका अमेरिका खंडात आव्हाने निर्माण झाली. आव्हाने वसाहतीतील एतद्देशीय राष्ट्रीय चळवळींनी निर्माण केली. दुसऱ्या महायुद्धात विजय होऊनही कमकुवत झालेल्या युरोपीयन साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य बहाल करावे लागले. आशियात भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया, इजिप्त तर आफ्रिकेत केनिया, नायजेरिया, युगांडा यांना व लॅटिन अमेरिकेत ब्राझील, चिली, पेरू इत्यादी अशी अनेक नवी राष्ट्र-राज्य वसाहत मुक्त झाल्याने निर्माण झाली.

ही नवोदित राष्ट्रे आर्थिक व लष्करी दृष्ट्या दुर्बल असल्याने शीत युद्ध काळातत्यातील काही राष्ट्रे अमेरिका का व रशिया यांच्यात अंकित झाली. लष्करी तांत्रिक अथवा आर्थिक मदतीच्या आमिषाना ती राष्ट्रे बळी पडली. परंतु भारत, इजिप्त, इंडोनेशिया व युगोस्लाव्हिया यांच्या नेतृत्वाखाली बहुसंख्य राष्ट्रीय अलिप्तता वादी बनली व आपली राष्ट्रीय अस्मिता टिकवती झाली. भारताचे याबाबत उदाहरण घेतले जाते. अमेरिकेकडून आपल्या आर्थिक विकास आर्थिक मदत घेत असतानाच अमेरिकेचा हस्तक्षेप अथवा दबाव भारताने काश्मीर, बांगलादेश निर्मिती, पृथ्वी क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम, अनुचाचणी बंदी करार या प्रश्नांसंबंधी चालू दिला नाही. स्वतंत्र राष्ट्रवादी व राष्ट्रीय अस्मिता जोपासली.

विकसनशील देशांच्या राष्ट्रवादाची वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक वंश, भाषा, धर्म इत्यादी घटकांपेक्षा समान राजकीय आकांक्षा, सर्वांगिन विकास, समान सांस्कृतिक वारसा, विविधता असूनही एक राष्ट्रीय जीवन जगण्याची दृढ इच्छा या घटकांना महत्त्व दिले गेले. या राष्ट्रात धर्मनिरपेक्ष स्वीकारली गेली असली तरी धर्म पुनरुज्जीवन वाद तेथे डोके वर काढू लागलेला आहे आहे.

5) **प्रागतिक राष्ट्रवाद:-**

जोसेफ मॅझिनी प्रणित राष्ट्रवाद 19 व्या शतकामध्ये विकसित झाले त्यास शुद्ध राष्ट्रवाद व प्रागतिक राष्ट्रवाद असे संबोधले जाते. प्रागतिक राष्ट्रवादाचे प्रमुख तत्त्व म्हणजे तो अनाक्रमण वादी आणि सहजीवन सहअस्तित्व तसेच समान वंश, भाषा, धर्म इ. चा पुरस्कर्ता आहे. त्यात लोकशाहीवादी वृत्ती आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, धर्मनिरपेक्षता या सारख्या मूल्यांचा तो स्वीकार करतो. जागतिक ऐक्य, शांतता, सहजीवन व सहकार्य यावर प्रगतिवादी राष्ट्रवादाचा विश्वास आहे. तसेच



munotes.in

उन्नत व उदात्त समाजव्यवस्था व सामाजिक संघटना यांच्या निर्मितीबद्दल आग्रह धरतो. बुद्धिवाद व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारा बरोबरच मानवतावादासही महत्त्व देतो. या राष्ट्रवादाचे चांगले उदाहरण इंग्लंड मधील राष्ट्रवाद.

6) **प्रतिगामी राष्ट्रवाद :-**

प्रतिगामी राष्ट्रवादास आक्रमक वाह प्रतिक्रियावादी राष्ट्रवाद असेही संबोधले जाते. या राष्ट्रवादाचा पुरस्कार प्रथम मॅकेव्हलीने केलेला दिसून येतो. मॅकेव्हलीने जे आक्रमक तत्वज्ञान मांडले त्याचा परिपाक म्हणजे फॅसिस्ट इटलीचा निर्माता मुसोलिनी यांनी इटलीच्या राष्ट्रवादात साम्राज्यविस्तार, सैनिकीकरण, युद्ध सज्जता, युद्ध यांचा केलेला पुरस्कार. मुसोलिनीने आक्रमक राष्ट्रवादी तत्त्वज्ञ मांडताना म्हटले होते की इथली पुढे दोनच पर्याय आहेत. इटलीने साम्राज्यविस्तार केलाच पाहिजे अथवा नष्ट झाले पाहिजे. या आक्रमक राष्ट्रवादाचे बीज औद्योगिक क्रांतीनंतरच्या अतिरिक्त उत्पादनास नव्या बाजारपेठा शोधण्याच्या प्रयत्नात आढळते.

प्रतिगामी राष्ट्रवादाने आर्थिक विकासाकरिता विस्तार वादाचा आणि सीमा विस्तारा करीता युद्धाचा आधार घेतलेला दिसून येतो. प्रतिगामी राष्ट्रवाद आत समाज घटकांच्या मनात राष्ट्रीय अहंकार रुजवून व्यापक करण्याकरिता वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक, तांत्रिक, लष्करी श्रेष्ठत्वाचा कुशलतेने वापर करून घेतला जातो. यूरोपमध्ये व आशियात प्रतिगामी राष्ट्रवादाच्या प्रसाराचा परिणाम दोन जागतिक महायुद्धात झाला. प्रतिगामी राष्ट्रवाद आत एकाधिकारशाही प्रवृत्तीचे नेतृत्व उदयास येते. फॅसिस्ट इटलीतील मुसोलिनी, नाझी जर्मनीतील अॅ डोल्फ हिटलर, स्पेन मधील जनरल फ्रँको, पोर्तुगालमधील डॉ. सालाझार हे याचे उत्तम उदाहरण होय. प्रतिगामी राष्ट्रवादाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे प्रतिगामी राष्ट्रवाद विभूती पूजेस महत्त्वाचे स्थान देतो. ' मुसोलिनी कधीच चुकत नाही' हे इटलीतील वचन याचेच एक उदाहरण होय. एकंदरीत, प्रतिगामी राष्ट्रवादास लष्करी करण, आक्रमण व आर्थिक साम्राज्यवाद असे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

एकंदरीत राष्ट्रवादाचे विविध प्रकार जगामध्ये प्रचलित आहेत. विचारवंतांमध्ये ही याबाबत मूलगामी स्वरूपाचे मतभेद आढळतात. जसे की, हॅन्स कोहेन यांनी प्रादेशिक व सांस्कृतिक आधारावर पाश्चात्त्य व पाश्चात्त्येत्तर असे राष्ट्रवादाचे मांडले आहेत. प्रो. हॅन्स यांनी तात्विक स्वरूपानुसार मानवतावादी, पारंपरिक, जॅकोबिन, उदारमतवाद व एकात्म राष्ट्रवाद असे प्रकार सांगितले आहेत. तर क्विंन्सी राईट यांनी राजकीय व्यवस्था स्वरूपानुसार मध्ययुगीन, राज्यसत्ताक, क्रांतिकारक, उदारमतवादी व सर्वंकष राष्ट्रवाद असे प्रकार स्पष्ट केले आहेत. राजकीय प्रक्रियेच्या आधारे एकीकरण घडविणारा, विघटन करणारा, आक्रमक व विद्यमान राष्ट्रवाद या प्रकारची मांडणी प्रो. स्नायडर यांनी केली आहे. फ्रेडरिक ग्रॉस हे लोकशाहीवादी, पारंपरिक, उदारमतवादी, एकात्म वादी राष्ट्रवाद असे राष्ट्रवादाचे प्रकार कल्पितात.

## सारांश :

एकंदरीत राष्ट्रवादाने एक विचारप्रणाली म्हणून स्वत:ची अशी काही गुणवैशिष्टये निर्माण केलेली आहेत. राष्ट्रवादाने सामाजिक राजकीय ऐक्य घडविण्यास प्रेरणा दिली. तसेच अनेक राजकीय संघटना व सस्था निर्माण करून त्या बलवान होण्यासाठी सामर्थ्य दिले. राष्ट्रवादाने समाज घटकांची अस्मिता जागृत केल्याने मातृभूमी इतिहास, परंपरा, धर्म, भाषा, वंश, साहित्य संस्कृती, कला इ. विषयी अभिमान निर्माण होऊन त्या जतन करण्याकडे कल निर्माण झाला. त्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदतच झाली. राष्ट्रवादाने समाजात राष्ट्रीयत्वाची भावना रुजविल्या मुळे प्रत्येक राजकीय समाजास ' राष्ट्रीय स्वातंत्र्याची' आस लागली. त्यातून नवनवी स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र राज्य जन्मास येऊन जगाचा राजकीय नकाशा पार बदलला.

राष्ट्रवादाची तत्वप्रणाली मानवी जीवनावर काही प्रमाणात प्रतिकूल प्रभाव टाकताना ही दिसते. संकुचित व आक्रमक प्रतिगामी राष्ट्रवादामुळे राष्ट्राराष्ट्रा मध्ये परस्पर मारक स्पर्धा निर्माण झाली अतिरेकी राष्ट्रवादने राष्ट्रप्रतिष्ठा, वैभव याकरिता युद्ध सज्जता, सैनिकीकरण, शस्त्रास्त्र स्पर्धा व लष्कर वाद जोपासला गेल्याने यूरोपमध्ये सततची युद्ध मालिका सुरू झाली. प्रबळ यूरोपियन राष्ट्रांनी साम्राज्यवादी धोरण स्वीकारून दुर्बल राष्ट्रांना आपल्या वसाहती बनविले, त्यांचे आर्थिक शोषण केले. त्याविरुद्ध राष्ट्रीय जागृती होऊन स्वातंत्र्य चळवळी उभ्या राहिल्या. साम्राज्यवादी राष्ट्रीय विरुद्ध वसाहतवादी राष्ट्रीय असे संघर्ष होऊ लागले. जागतिक शांतता भंग पावली. आज राजकीय वसाहतवाद संपलेला असला तरी आपल्या राष्ट्रीय स्वार्था करता आर्थिक व सांस्कृतिक वसाहतवाद सुरू झाला आहे. हे सर्व दोष दूर व्हावेत याकरिता उदार राष्ट्रवाद व मानवतावादी आंतरराष्ट्रीयवादाचा पुरस्कार केला जातो. मानव जातीच्या उज्वल भविष्या करता व कल्याणासाठी वैश्विक दृष्टीकोन असलेला उदार राष्ट्रवाद विकसित करणे अपरिहार्य ठरते.

munotes.in

## आपण काय शिकलो?

प्र. 1 ला राष्ट्रवाद ही संकल्पना स्पष्ट करून राष्ट्रवादाचे प्रेरक घटक लिहा.

प्र. 2. रा राष्ट्रवादाचा विकास सविस्तर लिहा.

प्र. 3. रा राष्ट्र-राज्य ही संकल्पना स्पष्ट करून राष्ट्र राज्याचा विकास सविस्तर लिहा.

प्र. 4. था राष्ट्रवादाची प्रमुख प्रकार लिहा.

प्र. 5 वा राष्ट्रवाद विकसित होण्यामागील प्रमुख घटक सविस्तर लिहा.

**टिपा लिहा:-**

1) उदारमतवादी राष्ट्रवाद

2) सर्वंकष वादी राष्ट्रवाद

3) राष्ट्रवादाचे प्रेरक घटक

4) विकसनशील देशातील राष्ट्रवाद

## संदर्भसूची


1) आधुनिक राजकीय विचार प्रणाली - प्रा. अ. ना.कुलकर्णी

2) समाजशास्त्रीय कोश - स. मा. गर्गे

3) राजकीय विचारांचा इतिहास - पा. श्री. घारे

4) राजकीय विचारांचा इतिहास - ना. य. डोळे

5) राज्यशास्त्राची मूलतत्वे - प्रा. चि. ग. थांगरेकर

6) उच्च तर आधुनिक राजकीय सिद्धांत - डॉ एस बी फड

7) राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण डॉ भा. ल. भोळे


❄❄❄❄❄❄❄

munotes.in